सोलापूर तरुण भारत
आसमंत

अमेरिकेत 'चले जाव' सुरू

घुसखोरांची समस्या ही तर जागतिक डोकेदुखी. भारत असो वा अमेरिका, कोणताही देश त्याला अपवाद नाही. अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अवैध घुसखोरांवर कठोर कारवाईचे आदेश दिले. 'मिशन डिपोर्टेशन' असे त्या मोहिमेचे नाव. या मोहिमेंतर्गत एक कोटींहून अधिक अवैधरित्या अमेरिकेत वास्तव्यास असलेल्यांवर कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे. ट्रम्प यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्याबरोबरही अमेरिकेत अवैधरित्या वास्तव्यास असलेल्या भारतीयांना परत मायदेशी पाठविण्याविषयी चर्चा केली होती. त्यानुसार भारतानेही अशा प्रवाशांना स्वीकारण्याची तयारी दर्शविली आहे.

लक्ष्यवेध

ओंकार मुळ्ये

भारतीय अमेरिकेच्या सैन्य विमानाद्वारे २०५ भारतीयांना मायदेशी पाठवण्यात आले आहे. या अगोदर अमेरिकेच्या सैन्य विमानाद्वारे ग्वाटेमाला, पेरू आणि होंडूरासमधील अवैध नागरिकांना मायदेशी धाडण्यात आले होते. 'प्यू रिसर्च सेंटर'नुसार, अमेरिकेत तब्बल ७.२५ लाख भारतीय अवैधरित्या वास्तव्यास आहेत. अवैधरित्या परदेशांत राहणाऱ्या नागरिकांमध्ये भारतीयांची संख्या ही तिसऱ्या क्रमांकावर आहे, तर सर्वाधिक अवैध घुसखोरीत मॅक्सिको पहिल्या क्रमाकांवर, तर सल्वाडोरवासीय दुसर्या क्रमांकावर आहेत.

'मिशन डिपोर्टेशन' हा राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी राबविलेला हद्दपारीचा कार्यक्रम अमेरिकेच्या आजवरच्या इतिहासातील सर्वांत मोठी कारवाई मानली जाते. यासाठी अमेरिकेच्या सैन्याचीही मदत घेतली जात आहे. सैन्याच्या विमानाद्वारे टप्प्याटप्प्याने त्या त्या देशांत अवैध नागरिकांना पाठवले जाईल. ट्रम्प यांनी निवडणुकांपूर्वीच अमेरिकेतील बेकायदेशीर स्थलांतरितांवर कारवाईचे आश्वासन यापूर्वीच दिले होते. त्यानुसार, त्यांनी राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारताच कारवाईचा धडाकाच लावला. पण, आता अमेरिकेतून बाहेरचा रस्ता दाखवल्या जाणाऱ्यांना चिंता सतावते आहे ती, त्यांची मालमत्ता, आर्थिक संसाधने आणि इतर मौल्यवान वस्तूंचे काय होणार याची!

अमेरिकेसाठी बेकायदेशीरपणे आपल्या राष्ट्रात प्रवेश करणारा व व्हिसाच्या नियमांचे उल्लंघन करणारा हा अवैध घुसखोरच ठरतो. अशा घुसखोरांना मग अनेक पद्धतीत विभागले जाऊ शकते. जे लोक अनधिकृतपणे देशात प्रवेश करतात, त्याला 'बेकायदेशीर इमिग्रेशन' म्हणतात. हे सहसा सीमा ओलांडण्याशी संबंधित असते, विशेषत: मेक्सिको किंवा कॅनडाशी संबंधित. यामध्ये सागरी सीमा ओलांडून अमेरिकेत दाखल होणार्या लोकांचाही समावेश आहे.

काही व्यक्ती अमेरिकेत कायदेशीररित्या प्रवेशही करतात. परंतु, त्यांचा व्हिसा 'ओव्हरस्टे' केला जातो, अशांच्या संख्येत अलीकडे अमेरिकेत वाढ झालेली दिसते. अशाप्रकारे व्हिसाची मुदत उलटूनही अमेरिकेत वास्तव्य करणाऱ्यांची संख्याही तितकीच मोठी आहे. तसेच ज्यांना 'पॅरोल' मंजूर केला जातो, परंतु, 'पॅरोल'ची मुदत संपल्यानंतरही ते तुरुंगात परतत नाही, त्यांनादेखील अवैध स्थलांतरितच मानले जाते.

अमेरिकेच्या कायद्यांनुसार, ज्यांना एकेकाळी तिथे वास्तव्याचा कायदेशीर अधिकार होताही, परंतु हा अधिकार आता संपुष्टात आला आहे किंवा त्यांचे कायदेशीर संरक्षणच गमावले आहे, जसे की 'ग्रीन कार्ड'चे नूतनीकरण न करणे, अमेरिकन व्यक्तीपासून घटस्फोट घेणे, यांसारख्या परिस्थितींमध्ये जोडीदारालाही अवैध स्थलांतरितदेखील मानले जाते. एवढेच नाही तर या बेकायदेशीर स्थलांतरितांना अमेरिकेत 'बेकायदेशीर एलियन'देखील म्हटले जाते.

अमेरिकेत सर्वाधिक अवैध स्थलांतरित लॅटिन अमेरिकेतून दाखल होतात. म्हणूनच मेक्सिको, ग्वाटेमाला, होंडुरास आणि एल साल्वाडोरसारख्या राष्ट्राच्या प्रमुखांना ट्रम्प यांनी कडक संदेश दिला आहे. 'प्यू रिसर्च सेंटर'च्या मते, २०२३ सालापर्यंत अमेरिकेत अवैध स्थलांतरितांची संख्या ही ११ दशलक्ष इतकी होती. वेगवेगळ्या संस्था हा आकडा वेगवेगळा सांगतात. मात्र, हा आकडा एक ते दोन कोटींच्या दरम्यान आहे.

अहवालानुसार, अमेरिकेत बेकायदेशीररित्या वास्तव्यास असणाऱ्या एकट्या मेक्सिकोमधील नागरिकांचीच संख्या ४० ते ५० लाखांच्या आसपास आहे. भारतातही बांगलादेशी आणि अवैध घुसखोरांची समस्या कायम आहे. ट्रम्प यांच्याप्रमाणे भारतही लवकरच बांगलादेशी अवैध घुसखोरांबाबत असाच काहीसा कठोर निर्णय घेईल, असा विश्वास आहे. त्यामुळे घुसखोरीचे ग्रहण सुटेल, अशी आशा...

डोनाल्ड ट्रम्प यांनी विमाने भरभरून अमेरिकेत बेकायदा राहणार्या परदेशी नागरिकांना त्यांच्या मूळ देशात नेऊन सोडण्याचा सपाटा लावला आहे. ट्रम्प हे करू शकतात, कारण त्यांच्याकडे तशी राजकीय इच्छाशक्ती आहे. त्याचा त्यांना राजकीय लाभही जरूर मिळेल. त्यांच्या या निर्णयावरून भारतासारख्या देशाने धडा शिकण्याची गरज आहे. कारण भारतात बेकायदा राहणाऱ्या परदेशी नागरिकांच्या वास्तव्याला केवळ व्यावसायिक नव्हे, तर धार्मिक पैलूही असून तो सर्वात धोकादायक आहे.

अमेरिकेत बेकायदा किंवा निवासाची मुदत अर्थात व्हिसा संपल्यावरही मुक्काम ठोकणाऱ्या लोकांमध्ये, भारतीयांचाही समावेश आहे. आता अलिकडेच अमेरिकेचे एक लष्करी विमान, अशाप्रकारेच बेकायदा अमेरिकेत राहणाऱ्या काही भारतीयांना घेऊन अमृतसरच्या विमानतळावर उतरले आहे. या विमानातून आलेले सर्वजण हे मूळ भारतीय नागरिकच आहेत का? याची खातरजमा केली जात आहे. कारण, काही पाकिस्तानी किंवा बांगलादेशी आणि श्रीलंकेचे नागरिकही, स्वत:ला भारतीय म्हणवून घेत असण्याची शक्यता आहे. अशा प्रकारे आपल्या देशात बेकायदा वास्तव्य करणार्या परदेशी नागरिकांना हुडकून काढून, त्यांची मूळ देशात घरवापसी करणे हे वेळखाऊ आणि खडतर काम असते. पण ट्रम्प यांनी ते तडीस नेण्यास प्रारंभ केला, ही कौतुकास्पद बाब म्हटली पाहिजे. भारताला ट्रम्प यांच्या या निर्णयापासून शिकण्यासारखे खूप काही आहे. भारतात सर्वाधिक बेकायदेशीररित्या राहणाऱ्या नागरिकांमध्ये, बांगलादेशी नागरिकांचा समावेश आहे. अलीकडच्या काळात त्यात रोहिंग्यांची भर पडली आहे. लाखो रोहिंगे आणि अन्य बांगलादेशी भारतात राहतात हे उघड सत्य असतानाही, केंद्र सरकारकडून या बेकायदा नागरिकांचा शोध घेण्याचे आणि त्यांची मूळ देशात परत पाठवणी करण्याचे पुरेसे प्रयत्न करायला हवेत. भारताने तर अमेरिकेच्या अनेक पटीने, या परदेशी नागरिकांना त्यांच्या मूळ देशात पाठविण्याचे प्रयत्न करण्याची गरज आहे. याचे कारण हे परदेशी नागरिक भारतीयांच्या पोटावरच पाय देतात असे नव्हे, तर ते त्यांच्या सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनातही ढवळाढवळ करीत आहेत. त्यामुळे भारतीय समाजात ताण निर्माण होऊन, कायदा-सुव्यवस्थेची समस्या उभी राहात आहे. भारताच्या नैसर्गिक संसाधनांवर अपरिमित ताण पडतो आहे, ते वेगळेच. भारतात बेकायदा राहणारर्या नागरिकांमध्ये, सर्वाधिक वाटा शेजारी मुस्लीम देशांचा आहे. आर्थिकदृष्ट्या दिवाळखोर आणि राजकीयदृष्ट्या उद्ध्वस्त झालेल्या देशांनी, भारताला चहुबाजूंनी घेरले आहे. चीन सोडल्यास भारताचे सर्व शेजारी (पान ४ वर)

केरळमध्ये हिंदू लोकसंख्येत घट

नुकताच प्रसिद्ध झालेल्या 'सीपीएस' या संस्थेच्या अहवालामधून, एक धक्कादायक खुलासा करण्यात आला आहे. यामध्ये केरळ राज्यातील मुस्लीम समुदायामधील जन्मदर हा कमालीचा वाढलेला असून, हिंदू आणि ख्रिश्चनांचा जन्मदर सातत्याने घटत आहे. तसेच मृत्युदरामध्येही मुस्लीम धर्मीयांचा दर हा हिंदू आणि ख्रिश्चन यांच्यापेक्षा कमीच आहे.

समाजभान

पार्थ कपोले

सेंटर फॉर पॉलिसी स्टडीज' अर्थात 'सीपीएस' या थिंक टँकने, दि. ३० जानेवारी २०२५ रोजी एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालाचे नाव आहे, 'भारतातील धार्मिक लोकसंख्याशास्त्र: वाढते धार्मिक असंतुलन.' या अहवालात २००८ ते २०२१ सालापर्यंत, केरळमधील हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन आणि इतर समुदायांच्या डेटावर संशोधन करण्यात आले आहे. या अहवालात नवीन जन्म, मृत्यू आणि या समुदायांमधील लोकसंख्येवर त्यांचा होणारा परिणाम, याबद्दल चर्चा केली आहे.

अहवालात असे आढळून आले की, अलीकडच्या काळात केरळमधील मुस्लीम लोकसंख्या झपाट्याने वाढली आहे. केरळमध्ये हिंदू लोकसंख्येच्या अधार असलेला मुस्लीम समुदाय, सर्वाधिक मुले जन्माला घालत असून, हाच ट्रेंड अजूनही सुरूच आहे. केरळमध्ये जन्माला येणारी, सुमारे ४४ टक्के मुले मुस्लीम आहेत. हिंदूंची लोकसंख्या दुप्पट असूनही, मुले जन्माला घालणाऱ्या लोकांचे प्रमाण सुमारे ४१ टक्केच आहे.

दुसरीकडे, मुस्लिमांमध्ये मृत्यूची संख्याही त्यांच्या लोकसंख्येच्या तुलनेत खूपच कमी आहे. दरवर्षी लाखो नवीन बालकांच्या जन्मामुळे, मुस्लीम समुदायात वाढ होताना दिसत असल्याचेही, या अहवालामधून समोर आले आहे.

'सीपीएस'च्या विश्लेषणात असे आढळून आले की, २०१६ सालापासून केरळमधील मुस्लीम समुदायात सर्वाधिक मुले जन्माला येत आहेत. २०१६ साली केरळमध्ये दोन लाख, सात हजार हिंदू मुले जन्माला आली. तर याच काळात, २ लाख, ११ हजार मुस्लीम मुले जन्माला आली. २०१७ मध्येही अशीच परिस्थिती होती. तेव्हा २ लाख, १० हजार, ७१ हिंदू मुले जन्माला आली होती. परंतु, मुस्लीम मुलांची संख्या २ लाख, १६ हजार, ५२५ होती. हा ट्रेंड २०२० सालापर्यंत चालू राहिला.

२०२१ सालचे हे एकमेव वर्ष होते जेव्हा, हिंदू मुलांची संख्या वाढली होती. २०१६ सालापासून केरळमध्ये, हिंदूंचा जन्मदर सातत्याने कमी होत आहे. राज्यात हिंदू लोकसंख्या सुमारे ५५ टक्के आणि मुस्लीम लोकसंख्या अंदाजे २७ टक्के असतानाही हे घडत आहे. जर दोन्ही आकडे एकत्र केले आणि त्याचा सखोल तुलनात्मक अभ्यास केला तर हे स्पष्ट होते की, अर्धी लोकसंख्या असूनही, मुस्लीम हिंदूंपेक्षा जास्त मुले जन्माला घालत आहेत. २०१६ सालापूर्वी जेव्हा हिंदू मुलांची संख्या सतत कमी होत होती, तेव्हा हा बदल हळूहळू होत होता. अहवालामध्ये २००८ सालापासूनच्या आकडेवारीचाही आढावा घेण्यात आला आहे. त्यानुसार, २००८ साली केरळमध्ये जन्मलेल्या बालकांपैकी, ४५ टक्के हिंदू होते, तर ३६ टक्के मुस्लीम होते. (पान ४ वर)

सहकार क्रांती: आर्थिक लोकशाहीचा नवा अध्याय

देशात सहकाराचा विकास व्यवस्थित झाला असता, तर निश्चितच देशाच्या ग्रामीण भागाची स्थिती आज काही वेगळी असती. मात्र, सहकराला सोन्याचे अंडे देणारी कोंबडी समजण्याचा राजकारण्यांचा स्वार्थ, आज देशाच्या प्रगतीमधील बाधा ठरली आहे. मात्र, सहकार मंत्रालयाच्या माध्यमातून सहकार क्षेत्राने भरारी घेण्यास सुरुवात केली आहे.

विशेष

अभिषेक चौधरी

खऱ्या अर्थाने आर्थिक लोकशाही म्हणजे काय? केवळ जीडीपी वाढ, बाजारातील कार्यक्षमता की, सरकारच्या कल्याणकारी योजना? का प्रत्येक नागरिकाला अर्थव्यवस्थेचा भाग बनवणे? भारताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, या प्रश्नाचे उत्तर शोधले आहे, सहकार मॉडेलच्या माध्यमातून.'सहकार' ही केवळ आर्थिक संकल्पना नाही. मुळात 'सहकार' हा गांधीजींच्या 'ट्रस्टीशिप' तत्त्वज्ञानाचा, दीनदयाळ उपाध्याय यांच्या 'अंत्योदय' आणि 'एकात्म मानववादा'चे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या विचारांचे मूर्त स्वरूप आहे. दि. ६ जुलै २०२१ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, सहकार मंत्रालयाची स्थापना करण्यात आली आणि देशाच्या पहिल्या सहकारमंत्र्यांच्या रूपाने अमित शाह यांची नियुक्ती झाली. हे मंत्रालय केवळ धोरणात्मक पातळीवर कार्यरत नाही, तर 'सहकारातून समृद्धी' या विचारसरणीला मूर्त स्वरूप देत आहे. 'मास प्रॉडक्शन'च्या संकल्पनेला मागे टाकत, 'मासेसद्वारे प्रॉडक्शन' या तत्त्वावर आधारित अर्थव्यवस्था उभारण्याचा हा प्रयत्न आहे.

गेल्या दहा वर्षांत पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने, ६० कोटी नागरिकांचे जीवनमान सुधारले आहे. ३० कोटी घरे, अन्नसुरक्षा, १२ कोटींहून अधिक एलपीजी गॅस कनेक्शन, पाणीपुरवठा, वीज, शौचालये यांसारख्या मूलभूत गरजांची पूर्तता झाली आहे. पण या टप्प्यानंतर मोठा प्रश्न येतो की, या नागरिकांचे योगदान देशाच्या जीडीपी गणितामध्ये कसे समाविष्ट करून घेता येईल? याचे उत्तर आहे, 'सहकार' मॉडेल. हे मॉडेल केवळ क्रेडिट किंवा कर्जपुरवठ्यावर आधारित नाही, ते संस्थात्मक आर्थिक सक्षमीकरणाचे उदाहरण आहे, जे नागरिकांना आर्थिक निर्णयांमध्ये सहभागी बनवते.

अमित शाहंच्या सहकार मंत्रालयाने केवळ तीन वर्षांतच, ५६ महत्त्वाच्या योजना राबवल्या आहेत. यामुळे देशभरातील जवळपास आठ लाख सहकारी संस्थांना, बळकटी मिळाली आहे. 'आंतरराष्ट्रीय सहकारी परिषद ग्लोबल कॉन्फरन्स २०२४' चे आयोजन प्रथमच भारतात करण्यात आले. सहकाराच्या १३० वर्षांच्या इतिहासामधील ही ऐतिहासिक घटना ठरली. याचवेळी पंतप्रधानानी, संयुक्त राष्ट्रसंघाच्या २०२५ साली 'आंतरराष्ट्रीय सहकार वर्षा'चीही सुरुवात केली.

सहकार मंत्रालयाने ग्रामीण भारताला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी, अनेक योजना राबवल्या आहेत. पंतप्रधान मोदींनी जागतिक स्तरावरील, सर्वात मोठी धान्यसाठवण योजना सुरू केली आहे. ११ राज्यांतील ११ प्रायमरी ॲग्रिकल्चरल क्रेडिट सोसायटींमध्ये प्रायोगिक प्रकल्प सुरू झाले आहेत. ५०० नवीन गोदामे आणि १८ हजार क्रेडिट सोसायटींचे संगणकीकरण करण्यात आले आहे. आज क्रेडिट सोसायटी या केवळ पतसंस्था राहिलेल्या नसून त्या बहुउद्देशीय केंद्रांमध्ये रूपांतरित झाल्या आहेत, जसे की डेअरी, मत्स्यपालन, जनऔषधी केंद्रे, पीएम किसान समृद्धी केंद्रे, पाणी समित्या, ड्रोन सेवा इत्यादी.

केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली सहकार क्षेत्रात, मोठ्या आर्थिक सुधारणा केल्या गेल्या आहेत. १५ हजार कोटी रुपयांच्या, प्राप्तिकर वादाचा निकाल लावण्यात आला आहे. ४६ हजार कोटी रुपयांचे नवे कर कमी करून, उद्योगांना दिलासा दिला आहे. 'राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ' अर्थात एनसीडीसीच्या माध्यमातून, दहा हजार कोटी रुपयांचे कर्ज सहकारी साखर कारखान्यांना दिले आहे. यामुळे इथेनॉल युनिट्स उभारण्यात मदत झाली आहे. या आर्थिक सुधारणांमुळे, सहकार संस्था आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम बनल्या आहेत.

राष्ट्रीय सहकारी डेटाबेसच्या माध्यमातून, ८.१९ लाख सहकारी संस्थांची माहिती संकलित करण्यात आली आहे. हा डेटाबेस पारदर्शकता सुनिश्चित करत आहे आणि धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी, उपयुक्त ठरत आहे. याशिवाय, नवीन राष्ट्रीय सहकार धोरण तयार करण्यात येत आहे, जे आगामी काळात सहकार चळवळीला अधिक बळकट करेल. (पान ४ वर)

बांगलादेशी घुसखोरी थांबविण्याकरिता वेगवेगळ्या घटकांची जबाबदारी

राष्ट्रवक्षा
ब्रि. हेमंत महाजन
भ्र. ९०९६७०१२५३

राज्यात दोन लाख बांगलादेशी रोहिंग्यांचे जन्म दाखल्यासाठी अर्ज

राज्यभरात दोन लाख बांगलादेशी रोहिंग्यांनी जन्म दाखल्यासाठी अर्ज केल्याची माहिती भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी दिली आहे. २४ जानेवारी रोजी नागपूर, यवतमाळ, अकोला दौऱ्यावर त्यांनी नागपूरमध्ये माध्यमांशी संवाद साधला. किरीट सोमय्या म्हणाले की, बांगलादेशी नागरिकांना जन्म प्रमाणपत्र देण्यासाठी स्थानिक राजकीय नेत्यांनी दबाव आणला. हे सगळे प्रकरण आता बाहेर येत असून त्यांना अनधिकृतरीत्या जन्म प्रमाणपत्र देण्यात आले आहेत. आतापर्यंत ज्या सव्वा लाख लोकांना जन्म प्रमाणपत्र देण्यात आले, त्याचा तपास करण्याची विनंती मी मुख्यमंत्र्यांना करणार आहे. राज्य सरकारने या प्रकरणाची गंभीर दखल घेत मालेगाव येथील तत्कालीन तहसीलदार नितीनकुमार देवरे आणि नायब तहसीलदार संदीप धारणकर यांना निलंबित केले आहे. राज्यात बांगलादेशींना देण्यात येणारा जन्म प्रमाणपत्र घोटाळा चर्चेत असताना आता यवतमाळ जिल्ह्यात जन्म प्रमाणपत्रासाठी ११ हजारांहून अधिक अर्ज आल्याची माहिती किरीट सोमय्या यांनी दिली. बालादेशी आणि रोहिंग्यांना देण्यात आलेल्या जन्म दाखला घोटाळ्याचे प्रकरण आता अकोल्यापर्यंत पोहोचले आहे. अकोला जिल्ह्यात १५ हजार ८४५ बांगलादेशी, रोहिंग्यांना जन्म प्रमाणपत्र देण्यात आल्याची माहिती पुढे आली आहे.

तामिळनाडू राज्यातील कोईम्बतूरच्या दहशतवादीविरोधी पथकाने बांगलादेशी घुसखोरांची तपासणी करीत असताना ३१ बांगलादेशी घुसखोरांना अटक केली. एटीएसने तिरूपूर आणि कोईम्बूतर जिल्ह्यातून त्यांना पकडण्यात आले. शिवाय त्रिपुराम ध्ये बांगलादेशींकडून होणाऱ्या शस्त्रांची तस्करी करण्यात आल्याचे उघडकीस आले आहे तसेच तीन बांगलादेशींना अटक करण्यात आली आहे. दिल्लीम ध्ये सध्या निवडणुकीची धामधूम सुरू आहे. अशातच आता दिल्ली पोलिसांनी आम आदमी पक्षाचे आमदार महेंद्र गोयल यांच्याविरोधात नोटीस जारी केली असून त्यांना चौकशीसाठी बोलाविले आहे. अवैध बांगलादेशी नागरिकांच्या कागदपत्रांशी संबंधित प्रकरण असून आमदार गोयल यांनी कागदपत्रांवर स्वाक्षरी केली आहे.

पर्यटक असल्याचे सांगत बांगलादेशी नागरिकांची भारतात घुसखोरी

देशाची राजधानी दिल्ली येथे बांगलादेशी नागरिकांनी पर्यटक असल्याचे सांगत घुसखोरी केली आहे. व्हिसा संपल्यानंतरही ते भारतात अनेक दिवसांपासून वास्तव्य करीत होते. यामध्ये महिलांचाही समावेश आहे. असे अनेक व्हिसा संपल्यानंतरही भारतात राहात आहे. ही घटना शुक्रवार ३ जानेवारी २०२५ रोजी घडली आहे. उत्तर प्रदेशातील रायबरेली येथे हजारो रोहिंग्या आणि बांगलादेशी घुसखोरांच्या जन्म दाखल्यांची बनावट कागदपत्रे उघडकीस आली आहेत. आता या प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून एकूण ५२ हजारांहून अधिक बनावट अधिक बनावट जन्मदाखले असल्याची माहिती समोर आली आहे. या फसवणुकीत पाकिस्तान, बांगलादेश आणि नेपाळसह अनेक राज्यातील नागरिकांच्या प्रमाणपत्रांचा समावेश आहे.

बांगलादेशी हद्दपार करण्यासाठी सरकार 'ॲक्शन मोड'वर

मुंबई आणि परिसरात बेकायदा राहणाऱ्या बांगलादेशी घुसखोरांना हद्दपार (डी-पोर्ट) करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिवाळी अधिवेशनात केली होती. त्यानंतर राज्यातील पोलिस यंत्रणा सतर्क झाली असून बेकायदा वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशींचा शोध घेण्यास पोलिसांनी सुरुवात केली आहे. २२ डिसेंबर रोजी भिवंडीत दहशतवादविरोधी पथक आणि ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने एका महिलेसह आठ बांगलादेशींना अटक केली.

दरम्यान, धुळे शहरातील एका लॉजमधून चार बांगलादेशी घुसखोरांच्या मुसक्या बांधण्यात आल्या. वरील आकडेवारीमुळे हे लक्षात आले असेल की, आपल्या देशात अनेक भ्रष्टाचारी लोक आहेत की जे पैशाकरिता काहीही करू शकतात. अनेक संस्था, राजकीय पक्ष असे पण आहेत की, जे मतपेटीच्या राजकारणाकरिता देशाला विकूही शकतात. बांगलादेशी घुसखोरी हा भारताला लागलेला कॅन्सर आहे. ही घुसखोरी थांबविण्याकरिता आपल्याला मोठ्या प्रमाणात प्रयत्न करावे लागतील. आज ७०-८० लाख बांगलादेशी राज्यात असावे. जर त्यांना पकडायचे असेल राज्यातील सगळ्यांना एकत्र येऊन काम करावे लागेल.

बांगलादेशी घुसखोरी थांबविण्याकरिता वेगवेगळ्या घटकांची जबाबदारी

बांगलादेशी घुसखोरी थांबविण्याकरिता काही महत्त्वाच्या जबाबदाऱ्या वेगवेगळ्या समाजघटकांकडे वाटण्याचा प्रयत्न केला गेला आहे. हे घटक असे

- सरकार-राज्यकर्ते, राजकीय पक्ष, नोकरशाही, न्यायालये, सामाजिक संस्था इत्यादींची जबाबदारी.
- मीडिया (वृत्तपत्रे, टीव्ही, रेडिओ, समाजम ाध्यम) ची जबाबदारी
- पोलिस आणि अर्धसैनिक दले, बीएसएफची जबाबदारी.
- सामान्य नागरिक म्हणून जबाबदारी.

बांगलादेशी शोध अभियान युद्धस्तरावर आखून त्याची अंमलबजावणी करावी. समाजात सगळ्या घटकांना बांगलादेशी शोध मोहिमेत सामील करावे. बांगलादेशी घुसखोरीग्रस्त भागात ग्राम सुरक्षा दले, होमगार्ड, पोलिस, अर्धसैनिक दलाची संख्या वाढवून सामान्य नागरिकांना सुरक्षा द्यावी. बांगलादेशी घुसखोरींना समर्थन देणाऱ्या संस्थांवर बंदी घालावी. राष्ट्रविरोधी, बांगलादेशी घुसखोरी समर्थक लेख लिहिणाऱ्या लेखकांवर, बोलणाऱ्यांवर लक्ष असावे. बांगलादेशी घुसखोरी समर्थक पुस्तके, मासिके, पोस्टर्स, संकेत स्थळे यांवर कायदेशीर कारवाई करावी. पकडलेल्या बांगलादेशी घुसखोरीविरुद्धचे न्यायालयातील खटले एक महिन्यात निकाली काढावे. पोटा आणि स्पेशल कायदे पण तयार करावे. न्यायालयांच्या काही विचित्र निर्णयांमुळे अनेक बांगलादेशी घुसखोरी समर्थक संस्थांना बळ मिळते आहे. त्यावर फेरविचार करावा, संविधानाचे रक्षण ही न्यायालयाची पण जबाबदारी आहे. विनाकारण खटले प्रलंबित ठेवणाऱ्या वकिलांवर कारवाई करावी. बांगलादेशी घुसखोरांच्या मानवी हक्कांच्या मर्यादा निश्चित कराव्या.

१९७० पासून बांगलादेशी घुसखोरी होत आहे. १९७० पासूनचे मंत्री, नोकरशाही, पोलिस जे सेवानिवृत्त झाले आहेत, त्यांना आपल्या चुकीचे प्रायश्चित्त म्हणून त्या भागात बांगलादेशी घुसखोर शोधण्याकरिता, सामान्य जनतेची सेवा करायला पाठवावे. स्थानिक नागरिकांना बांगलादेशी घुसखोरांची गुप्त माहिती देण्यासाठी एक टोल फ्री फोन क्रमांक दिला पाहिजे. जेणेकरून सामान्य नागरिक त्यांच्याकडील माहिती जलद पोलिसांपर्यंत पोहोचवू शकतात. त्यांच्या नावांविषयी मात्र गुप्तता बाळगली पाहिजे. बांगलादेशी घुसखोरांकडून स्त्रिया, लहान मुले आणि इतर सामान्यांवर अत्याचार होतात. त्यावर नजर ठेवून त्यांना शिक्षा देणे.

बांगलादेशी समर्थकांवर सामाजिक बहिष्कार

राजकीय पक्षांनी व्होट बँकेसाठी बांगलादेशींना जवळ केले आहे. या बोटचेप्या भूमिकेमुळे बांगलादेशी घुसखोरी फोफावत आहे. राष्ट्रीय एकात्मता कशी निर्माण करता येईल, याचा विचार करणे आवश्यक आहे. यासाठी देशातील सर्वांनी गट-तट विसरून एकत्र आले पाहिजे. मेणबत्त्या जाळून किंवा घोषणा देऊन बांगलादेशी घुसखोरीविरोधी अभियानात यश मिळणार नाही. त्याकरिता कृतिशील कारवाईची गरज आहे. बांगलादेशी घुसखोरीविरुद्धची लढाई ही अशी अनेक आघाड्यांवर आणि दीर्घकाळ लढावी लागणार आहे. बांगलादेशी घुसखोरीग्रस्त भागाच्या बाहेर असलेल्या नागरिकांनी सरकारला वैचारिक लढाई लढण्यास मदत करावी. बांगलादेशी घुसखोरीवादी विचारवंत आणि समर्थकांशी वैचारिक लढाई आमने-सामने, वृत्तपत्रांना पत्रे लिहून, टीव्हीवर चर्चेत भाग घेऊन करावी. काही राजकीय नेते, वाट चुकलेले विचारवंत, तज्ज्ञ देशविरोधी वक्तव्ये करून मनोबल खच्ची करण्याचा प्रयत्न करतात. सगळे पक्ष एकदिलाने सरकारच्या बाजूने उभे ठाकल्याचे दाखवतील, पण प्रत्यक्षात अनेक नतद्रष्ट नेते त्यात खोड्या काढतात. बांगलादेशी घुसखोरीच्या विरुद्ध लढण्यास तयार नाहीत, असे राजकीय पक्ष व नेत्यांना जनतेने मतदान न करून धडा शिकवायला हवा.

मीडिया (वृत्तपत्रे, टीव्ही, रेडिओ, समाजमाध्यम) ची जबाबदारी

बांगलादेशी घुसखोरीविरुद्ध लढाई लढण्यास मीडिया मदत करू शकतो. देशद्रोही संघटना आणि विचारवंतांविरुद्ध अन्वेषक तपासणी करून (खर्पीशींळसरींळींश गेंीपरश्रळीा) त्यांच्या देशद्रोही कारवाया उघडकीस आणल्या पाहिजेत. मीडियाने राजकारणी, क्रिकेट, सिनेमा, हिंसाचार आणि सिलेब्रिटीवरचे लक्ष कमी करून बांगलादेशी घुसखोरीग्रस्त भागात थोडे लक्ष केंद्रित केले तर सर्वांचाच फायदा होईल. लेखाच्या पुढच्या भागामध्ये आपण बांगलादेशी घुसखोरी थांबविण्याकरिता अर्ध सैनिक दले, पोलिस आणि सामान्य नागरिकांनी काय करावे याविषयी विचार करू. (लेखक संरक्षणविषयक तज्ज्ञ आहेत.)

संत प्रबोधन
प्रा. डॉ. हरिदास आखरे

धर्म रक्षावयासाठी। करणे आटी आम्हासी।।

ज्ञानासारखी दुसरी पवित्र वस्तू जगात कोणतीही नाही, असे भगवान श्रीकृष्णांनी गीतेत सांगितलेले आहे. न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते। आत्मज्ञान प्राप्त करून मनाने आत्मस्वरूपाशी (ब्रह्मस्वरूपाशी) एकरूप होणे, हा माणसाचा एवढा सर्वश्रेष्ठ धर्म आहे की, त्यापुढे व्यक्तीला अनेक प्रकारांनी मर्यादित करणारा आणि स्वर्ग-नरकाच्या अपेक्षेने किंवा भीतीने पाळला जाणारा कर्म धर्म हा गौण ठरतो. निरहंकार वृत्तीने परम्यात्म्याशी अनन्यशरण होऊन जीवनाची उच्चतम अवस्था प्राप्त करावी. हा प्रत्येक माणसाचा निजधर्म, सर्वश्रेष्ठ स्वधर्म होय.

(धुंडा महाराज देगलूरकर, पसायदान, पृ. ९४.) संतांनी निजधर्माचा हाच भाव खालील अभंगातून व्यक्त केलेला दिसतो. **भूती भगवद् भाव । मात्रासहित जीव। अद्वैत ठाव । निरंजन एकला ।। ऐसी गर्जती पुराणे । वेदवाणी सकळ जन ।। संत गर्जतील तेणे । अनुभवे निर्भय ।। माझे तुझे हा विकार। निरसंता एकंकार ।। न लगे काही फार । विचार चि करणे ।। तुका म्हणे दुजे हे तो नाही सहजे । संकल्पाच्या काजे आपें आप वाढले।। अवघी एकाचीच वीण । तेथे कैचे भिन्नाभिन्न ।। वेदपुरुष नारायण । तेणे केला निवाडा ।।** वेदाची ही शिकवण अंतःकरणामध्ये साठवावी. स्वकल्याणासाठी ईश्वराला शरण जावे. हाच भागवत धर्म आहे. याच धर्मासाठी आमचे अवतारकार्य आहे, असे संत तुकाराम महाराज सांगतात. **धर्म रक्षावयासाठी । करणे आटी आम्हासिं ।। वाचा बोलों वेदनीती । करू संती केले ते ।।** मानवसेवा हीच ईश्वरसेवा समाज राष्ट्राचा पाया आहे. त्याचप्रमाणे कुटुंबाची पाठशाळाही आहे. कुटुंबात राहणारा प्रत्येक माणूस राष्ट्राचा नागरिक समता, बंधुता, एकता या जीवनमूल्यांचा अंगीकार करून त्यांनी लोकांची सेवा केली. त्यामध्ये कधीही भेद केला नाही. सर्व माणसे ईश्वराची लेकरे आहेत. सर्वाठायी त्या सर्वशक्तिमान ईश्वराचा अंश आहे. या भावनेतून त्यांनी मानवसेवा हीच ईश्वरसेवा मानली. पापाच्या निवृत्तीकरिता व परमसुखाच्या प्राप्तीकरिता त्रिविध तापाने ग्रस्त असणाऱ्या सकल मानवजातीला सुख, शांती व मोक्ष मिळण्याकरिता साधा, सोपा भक्तिमार्ग जो भगवान श्रीकृष्णांनी गीतेमध्ये सांगितला आहे, तोच देवाचा दिव्य संदेश पोहोचविण्याचे कार्य आम्ही जन्मोजन्मी करीत आलो आहोत, असे ते म्हणतात. **मार्गाधारे वर्तावे । विश्व हे मोहरे लावावे ।। अलौकिक नोहावे । लोकांप्रति ।।** संत ज्ञानेश्वरांच्या या ओवीप्रमाणे संत तुकारामांची कार्यप्रणाली आहे.

भक्तिभाव या पातळीवर त्यांनी भेदाभेद न करता आध्यात्मिक लोकशाही प्रस्थापित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. अशा प्रकारे माणसातच खरा देव शोधण्याची संतवृत्ती आहे. समाजामध्ये जी विषमता, व्यभिचारी वृत्ती, दोष, दुष्कृत्ये यांचा संचार होता. त्यांचा संत तुकारामांनी आपल्या अभंगांतून चांगलाच समाचार घेतला आहे. या सर्व समाज वैगुण्यांची त्यांना प्रचंड चीड होती. ढोंगी लोक, पाखंडी समाजकंटकांनाही त्यांनी सोडले नाही. त्यांनासुद्धा प्रसंगी शब्दांचे फटकारे मारीत वठणीवर आणण्याचे कार्य केले व सामान्य माणसांना भगवद्भक्तीचा सोपा मार्ग दाखविला. 'बहुजन हिताय-बहुजन सुखाय' या ब्रीदाप्रमाणे त्यांनी वास्तवावर आधारित कार्य केले. समाजाला नीती, आचार, विचार शिकविण्याचे कार्य तुकोबांनी केले. त्यामधूनच त्यांनी फक्त मानवता मूल्याचाच प्रचार केला नाही, तर मानवतेच्या समतेचा प्रचार केला. सर्वांना समान लेखन, उच्चनीच भाव काढून सर्वांना आध्यात्मिक अधिष्ठान देण्याचा प्रयत्न त्यांच्या अभंग वाङ्मयातून केला आहे.

माणसा- माणसांमध्ये त्यांनी आत्मोन्नतीची प्रेरणा जागृत केली. त्यासाठी त्यांनी शूद्रातिशूद्रांना, रूढींनी गांजलेल्यांना खालच्या थरातून वर काढण्याचे कार्य केले. त्याचप्रमाणे उच्चवर्णीयांनाही धर्मपाशातून मुक्त करण्याचे महत्त्वाचे कार्य केले. **नका घालू दूध जयामध्ये सार । ताकाचे उपकार तरी करा ।। नेदा तरी हे हो नका देवू अन्न । फुकाचे जीवन तरी पाजा ।।** मानवसेवा हीच ईश्वरसेवा करताना त्यांनी समाजाला परोपकारधर्म, उदारतामूल्य, निःस्पृहताधर्म, सौजन्यशीलता, सत्यभक्ती, सहिष्णुता हे वेदाचरण या महान अशा जीवनमूल्यांची शिकवण दिली. समाजाच्या उन्नतीकरिता सामाजिक जीवनमूल्यांचे पालन करावे, असा महत्त्वपूर्ण उपदेश त्यांनी आपल्या अभंग वाङ्मयातून पदोपदी केल्याचे आढळते. आतिथ्य, परोपकार, दान व दया हे सर्वोत्तम सद्गुण अंगी असल्याने सर्वात्मक भाव वाढीस लागतो. त्यातूनच अंतरीचा परमात्मा जोडला जातो. वैराग्य प्राप्तीसाठी वनात जाण्याची गरज नाही तर त्यासाठी सदाचरण हाच सर्वोत्तम उपाय आहे, असे ते सांगतात. **नामसंकीर्तन साधन पै सोपे । जळतील पापे जन्मांतरीची ।। न लगे सायास जावे वनांतरा । सुखे येतो घरा नारायण ।। ठायींच बैसोनी करा एकचित्त । आवडी अनंत आळवावा ।।** प्रपंचामध्ये राहूनही परमार्थ साधता येतो. फक्त त्यासाठी प्रपंच व परमार्थ यांचा उत्तम समन्वय साधता आला पाहिजे. प्रपंचामध्ये राहताना आसक्ती नसावी. माझे-माझे करताना आपण सर्वस्व हिरावून बसतो. प्रपंचाला सोडू नका, परंतु त्यामध्ये गुंतूनही जाऊ नका. **परउपकारी नेणें परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी माया ।। भूतदया गाईपशूचे पालन । तान्हेल्या जीवन वनामाजीं ।। शांतिरूपे नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्त्व वडिलांचे ।। तुका म्हणे हेचि आश्रमाचें फळ । परमपद बळ वैराग्याचें ।।** संतानी समाजजीवनामध्ये माणसांना अभ्यासतानाच त्याच्या कौटुंबिक जीवनाचेही सूक्ष्म निरीक्षण केले आहे. दुसऱ्याला पीडा देण्याचे कार्य करणाऱ्याला त्यांनी 'दावेदार' संबोधले आहे. समाजकंटकांची निर्भर्त्सना करतानाच त्यांनी कुटुंबातील कामासक्त, व्यसनाधीन पुरुषांचाही चांगला समाचार घेतला आहे. घरे फोडणाऱ्या स्त्रियांच्या प्रवृत्तीला ते 'घातकी प्रवृत्ती' म्हणतात. **वेगळे निघता संसार करीन । नाही तरी प्राण देते आता ।। तुका म्हणे झाला कामाचा अंकित । सांगे मनोगत तैसा वर्ते ।। तुका म्हणे केला रांडेने गाढव । मनासवे धाव घेतलीसे ।।** (तु. गा. ४२२४) पत्नीच्या दुर्विचाराने वागून एकत्र कुटुंबापासून वेगळे राहणारा बाईलवेडा पुरुष कुटुंबाचा शत्रू होतो. कुटुंबाला दुर्गती आणतो. ही अवस्था टाळण्यासाठी ते (पान ६ वर)

सिनेजगत
देवेंद्र प्रभुणे

एक प्रदीप्त विश्वजयी अभिनय यात्रा!

नवीन सहस्रकात, मनोरंजन व प्रदर्शनी कलांच्या जाणिवा व आस्वादप्रक्रियेत आमूलाग्र बदल झाला. तंत्रज्ञानाची प्रगती व त्याचे सुलभीकरण या बाबी या बदलास विशेषत्वाने कारणीभूत झाल्या. मुख्य म्हणजे, हे तंत्रज्ञान व तंत्रसामग्री सर्वसाम ान्य रसिकांच्या आर्थिक आवाक्यात आल्या. या तंत्र-बदलाची सुरुवात १९८० च्या दशकात प्रविष्ट झालेल्या व्हीसीआर व १९९० च्या दशकात घराघरांत पोहोचलेल्या केबल दूरचित्रवाणी व खाजगी वाहिन्यांकडून झाली. संगणक व आंतरजाल हा एक महत्त्वपूर्ण पडाव अल्पावधीतच पार करून विश्व, भ्रमणध्वनी व त्यातल्या त्यात 'स्मार्ट तंत्रज्ञानाकडे' झेपावले व सामूहिक करमणुकीकडून आपण केव्हा स्थल-काल-बंधनविरहित वैयक्तिक करमणूक व आस्वादाकडे वळलो, हे आपल्याला समजलेदेखील नाही.

हिंदी चित्रपटांचा उद्गम, विकास व सर्वंकष वाटचालीवर या सदरात प्रत्यही लेखन करून हिंदी चित्रपटसृष्टीच्या विविधांगी स्वरूपावर चर्चा करत असताना, एक बाब प्रकर्षाने लक्षात आली की, समस्त भारतीयांच्या प्रदर्शनी कलांकडून ज्ञानापेक्षा रंजन होण्याच्या माफक अपेक्षा असतात. मनास विरंगुळा प्राप्त होणे ही भारतीय जनमानसाची प्राथमिकता असतेच असते. तसेच संदिग्ध, धूसर व विचारप्रवृत्त करणारी प्रदर्शनी कला भारतीयांना फारशी भावत नाही. अशाच प्रदर्शनी कला जनसामान्यांच्या मनात व हृदयात घर करतात, ज्यामध्ये एक सुरुवात, मध्य व सुखांत शेवट आहे. चित्रपटात ठाशीव व विशिष्ट-गुण-विशेष युक्त पात्रे असणे भारतीयांना अपेक्षित असतेच असते. त्यामुळेच १९८० च्या दशकापर्यंत तरी विशिष्ट भूमिका, आपले दर्शन व प्रदर्शन याद्वारे रुपेरी पडद्यावर साकारणाऱ्या कलावंतांना बऱ्यापैकी मागणी व समाजात ओळख होती. राजे-महाराजे, नवाब, जहागीरदार अशा पोषाखी भूमिकांसाठी आवश्यक असलेले राजबिंडे व्यक्तिम त्त्व असलेल्या प्रदीपकुमार यांची कारकीर्द या दृष्टीने विशेष लक्षणीय आहे. हिंदी चित्रपटांमध्ये पंजाबी नायक, दाक्षिणात्य नायिका, मराठी तंत्रज्ञ व बंगाली सृजनशील कला विभागातील कलावंतांचा विशेष बोलबाला राहिला आहे. या गृहितकांमध्ये किंवा बृहत-विभागणीमध्ये अजूनही फारसा बदल झालेला नाही. बंगालच्या कलासमृद्ध व साहित्यिक-गुणांनी युक्त चित्रपटांनी एक काळ गाजवला. भारतीय स्वातंत्र्यपूर्व काळात, कलकत्ता येथील चित्रपटसृष्टीने आपल्या कला-जाणिवांना एक मूल्य प्रदान केले होते. भारतीय स्वातंत्र्योत्तर काळातही मुंबईत आलेल्या बंगाली दिग्दर्शक व अभिनेत्यांनी आपले स्थान निर्माण केले होते. प्रदीपकुमार बटब्याल (जन्म ४ जानेवारी १९२५) यांनी बहुसंख्य बंगाली अभिनेत्यांप्रमाणे नाटकात भूमिका करून आपल्या अभिनय कारकीर्दीचा प्रारंभ केला. १९४२ ते १९४७ या कालावधीत बंगाली रंगभूमीवर कार्यरत असलेल्या प्रदीपकुमार यांना चित्रपटात चमकण्याची पहिली संधी मिळाली ती 'अलकनंदा' या बंगाली चित्रपटात. तद्नंतर त्यांनी मुंबईकडे कूच केले. 'फिल्मीस्तान' या बंगाली वरचष्मा असलेल्या चित्रनिर्मिती संस्थेने १९५२ साली निर्माण केलेल्या 'आनंदमठ' या बंकिमचंद्र चट्टोपाध्याय लिखित ओजस्वी कादंबरीवर आधारित त्याच शीर्षकाच्या चित्रपटात त्यांना युवा क्रांतिकारी 'जीवनानंद' ही भूमिका दिग्दर्शक हेमेन गुप्ता यांनी करण्याची गळ घातली. कृष्ण-धवल चित्रपटातही त्यांचे देखणे रूप लपत नव्हते. बंगाली पृष्ठभूमी व वातावरणातील चित्रपट असल्यामुळे त्यांचे बंगाली धाटणीचे सदोष हिंदी फारसे कोणाच्याही लक्षात आले नाही. या चित्रपटामुळे त्यांना मुंबईच्या चित्रपटसृष्टीत स्थिरावण्यास सहाय्य झाले, हे मात्र निश्चित! प्रदीपकुमार यांच्यावर 'राजे-महाराजांच्या भूमिकेत चपखल बसणारा अभिनेता' हा शिक्का बसला तो पुढच्याच वर्षी आलेल्या 'अनारकली' (१९५३) चित्रपटातील शहजादा सलीम या भूमिकेमुळे..! या चित्रपटाच्या यशाचे खरे श्रेय त्याच्या कालजयी अतिमधुर गीत-संगीतास होते, हे निर्विवाद. त्याच वर्षी आलेल्या 'नागीन' चित्रपटात नायक असूनही नायिका व संगीतामुळे प्रदीपकुमारांकडे रसिकांचे फारसे लक्ष गेले नाही. अतिशय भावशून्य प्रस्तुती, सपाट संवादफेक व सदोष हिंदी शब्दोच्चार ही त्यांच्या अभिनयातील ठळक वैगुण्ये. याचवर्षी आलेल्या 'नूरजहाँ', 'बादशाह' या चित्रपटांनी त्यांची हिंदी चित्रपटातील प्रतिमा अशी काही गडद केली की त्यामधून ते कधीच बाहेर पडू शकले नाही. अर्थात, प्रदीपकुमार यांना राजेशाही थाटाच्या भूमिका करताना धर्म, प्रदेश व काळ यांचे बंधन नव्हते. सर्व भूमिकांमध्ये 'केवळ दिसण्यापुरता' अभिनय, हे त्यांचे एकमात्र उद्दिष्ट असायचे.

'अदले-जहांगीर', 'हुर-ए-अरब', 'शिरीं-फरहाद', 'राज हठ', 'दुर्गेशनंदिनी', 'हीर', 'महलोंके ख्वाब', 'बागी', 'बहु-बेगम', 'नूरजहाँ' (१९६७) ही त्याची ठळक उदाहरणे. प्रदीपकुमार यांच्या ऐतिहासिक व प्राचीन परिवेशातील लक्षणीय भूमिका म्हणजे, 'ताजमहल' (१९६३) मधील शाहजहान व 'चित्रलेखा' (१९६४) चित्रपटातील आर्यपुत्र सम्राट बिजगुप्त. हिंदी चित्रपट संगीतातील सर्वोत्तम गीत म्हणून ज्याचा आवर्जून उल्लेख होतो ते 'मन रे तू काहे ना धीर धरे' हे रफीसाहेबांनी गायलेले साहिर व रोशन या गीतकार-संगीतकारांची कमाल असलेले लोकोत्तर गीत त्यांच्यावरच चित्रित झाले होते. ऐतिहासिक व्यक्तिरेखांव्यतिरिक्त त्यांनी 'पोलिस', 'डिटेक्टिव्ह', 'फॅशन', 'गेटवे ऑफ इंडिया', 'हिल स्टेशन', 'मिस इंडिया', 'एक झलक', 'मॉडर्न गर्ल', 'पासपोर्ट', 'रात और दिन' अशा आधुनिक युवकाच्या, शहरी वळणाच्या भूमिकाही केल्या. मीनाकुमारीसोबत सात चित्रपट, मधुबाला व माला सिन्हांसमवेत प्रत्येकी आठ चित्रपटात नायकाच्या भूमिकेत चमकूनही हे चित्रपट त्यातील नायिका व सुश्राव्य गीत-संगीतासाठीच लक्षात राहिले आहेत, ही बाब प्रदीपकुमार यांचे नायक म्हणून नगण्य अस्तित्व व प्रभाव अधोरेखित करते. अर्थात, एक बाब मान्य करावीच लागेल की, हेमंतकुमार व मोहंमद रफी यांनी गायलेली उत्तमोत्तम गीते त्यांच्यावर चित्रित झाली व त्या गीतांना त्यांनी न्याय देण्याचा प्रयत्न केला. 'घुंघट', 'मेरी सूरत तेरी आँखे', 'सहेली', 'भीगी रात', 'जिंदगी और मौत', 'हरिश्चंद्र तारामती' हे त्यांचे १९६० च्या दशकातील नायक म्हणून आलेले इतर चित्रपट. 'वहां के लोग' (१९६७) या विज्ञान-काल्पनिकेत त्यांची हास्यास्पद प्रमुख भूमिका होती. १९७० च्या दशकात ते चरित्र भूमिकांकडे वळले व १९९० पर्यंत कार्यरत होते. बंगाली भाषिक असूनही हिंदी चित्रपटसृष्टीत बऱ्यापैकी ओळख निर्माण करणारे दुसरे ठळक नायक म्हणजे विश्वजित. चित्रपटांची किंवा अभिनयाची पृष्ठभूमी नसताना विश्वजित चॅटर्जी या युवकास बंगाली चित्रपटातील महानायक उत्तमकुमार समवेत चित्रपट पदार्पणाची संधी मिळाली ती १९६० साली. (पान ६ वर)

घ्या झेप... अंधारातून प्रकाशाकडे!

यशाकाठी
डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

१. ७ जुलै १९९२ रोजी आंध्रप्रदेशातील मछलीपट्टणम येथील सीतारामपुरम येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात एका बाळाचा जन्म झाला; पण घरचे सगळे लोक दु:खी होते. कारण त्या बाळाचे दोन्ही डोळे बंद आणि आंधळे होते. गावातील लोकांनी त्यांना सल्ला दिला... 'तुम्ही या बाळाला देवाला वापस करा!' म्हणजेच मारून टाका.' तशी तयारीसुद्धा लोकांनी केली. कारण तेथील बहुसंख्य लोक अशिक्षित होते. आईने मात्र कडाडून विरोध केला. ती म्हणाली, 'माझे बाळ मी कुणाला देणार नाही.' म्हणून त्याचा जीव वाचला. हळूहळू बाळ मोठे होऊ लागले. त्याचे नाव श्रीकांत ठेवण्यात आले. गावातील मुले आंधळा म्हणून त्याची थट्टा करीत. शारीरिक इजा करीत. हातात रुपयाचे नाणे ठेवून भिकारी म्हणून चिडवीत.

गावापेक्षा शहरात शिक्षण चांगले म्हणून त्याला शहरातील एका धर्मादाय-वसतिगृहात ठेवले व जवळच्या शाळेत घातले. पुढे तीन वर्षांनी ज्या वसतिगृहात श्रीकांत बोल्ला राहत होता तेथील भ्रष्टाचाराचा त्याने विरोध केला. त्याला रात्रीच्या वेळीच त्या होस्टेलमधून बाहेर काढले. त्याची रस्त्यावर चालायला मदत करणारी आंधळ्याची काठीसुद्धा काढून घेतली. तो कसाबसा रस्त्यावर ठेचा खात जाताना एका कारवर आदळला. तो खरंच आंधळा आहे हे बघून कुणीतरी जेवून घे म्हणून त्याच्या हातात पैसे ठेवले. त्याला वसतिगृहातून काढले ही माहिती कुणीतरी त्याला शिकवणाऱ्या त्याच्या दिव्या नावाच्या प्रेमळ शिक्षिकेला दिली. ती लगेच आपली स्कुटी घेऊन त्याला शोधायला निघाली. तो सापडल्यावर त्याला ती आपल्या घरी घेऊन आली व त्याच्या पालकांना काय घडले ते सांगितले. त्या शिक्षिकेनेच त्याची पूर्ण जबाबदारी स्वीकारली. श्रीकांत बुद्धीने खूप हुशार होता. शाळेतील शिक्षकसुद्धा त्याची तारीफ करीत. तो ९० टक्के गुण घेऊन मॅट्रिक पास झाल्यानंतर त्याने अकरावीत विज्ञान शाखेत प्रवेश घायचे ठरवले. परंतु तो दृष्टिहीन असल्याने प्रवेश नाकारण्यात आला होता. त्याविरोधात श्रीकांत बोल्ला याने हायकोर्टात खटला दाखल केला. कोर्टातील प्रश्नोत्तरांच्या भागात त्याने आपल्या बुद्धिचातुर्याने ती केस जिंकली आणि सहा महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर त्याला स्वत:च्या जबाबदारीवर बारावी विज्ञान शिकण्याची परवानगी मिळाली. पण विज्ञानाची पुस्तके अंधांसाठी असलेल्या ब्रेल लिपीत उपलब्ध नव्हती. दिव्या मॅडमनी त्याच्या बारावीच्या अभ्यासाला मदत करण्यासाठी सगळी पुस्तके वाचून त्याच्या ऑडिओ कॅसेटस तयार केल्या. मग कानाला हेडफोन लावून श्रीकांतने अकरावी-बारावीचा पूर्ण अभ्यास केला. तेव्हा त्याने बारावीच्या बोर्ड परीक्षेत ९८ टक्के गुण मिळवून वर्गात प्रथम क्रमांक पटकावला. नंतर त्याला इंजिनीअरिंग शिकायचे होते. पण भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) यामध्ये केवळ दृष्टिहीन असल्याने प्रवेश नाकारण्यात आला.

तेव्हा महत्त्वाकांक्षी श्रीकांतने देशाच्या बाहेर अमेरिकेतील प्रथम क्रमांकाच्या विद्यापीठात म्हणजे मॅसेच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये प्रवेश घेतला. प्रवेशपत्र प्राप्त झाल्यावर त्याने विमानाचे तिकीट काढून तो ठरलेल्या फ्लाईटसाठी आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोचला. आंधळा असूनही त्याच्या सोबत कुणी काळजी घेणारी व्यक्ती नाही म्हणून त्याला विमानात बसू द्यायला नकार मिळाला. त्याने त्याच फ्लाईटमध्ये असणाऱ्या विविध स्त्रीपुरुषांना विनंती केली की, 'तुम्ही माझे मदतनीस आहात असे तेथील व्यवस्थापनाला सांगा. फार प्रयत्न करून ही अमेरिकेतील ॲडमिशन मला मिळाली आहे.' पण कुणीही त्याच्या विनंतीला मान दिला नाही. कुठल्याही अडचणींना न जुमानणारा श्रीकांत स्वस्थ बसणारा नव्हता. त्याने तेथील वेटिंग हॉलमध्येच तेथील अधिकाऱ्यांना तो कसा कुणाच्याही मदतीशिवाय आपल्या सीटवर जाऊन बसू शकतो, त्याचे प्रात्यक्षिक सादर केले.

एअर होस्टेस कुठे उभी असणार, त्याचा तिकीट क्रमांक विमानाच्या प्रवेशद्वारापासून किती दूर असणार, कितव्या रांगेत त्याची सीट कुठे असणार आणि तो कसा जाऊन बसणार हे सर्व प्रत्यक्ष करून दाखवले. तसेच विमानाची आपत्कालीन दारे किती व कुठे असणार तेसुद्धा दाखवले. यामुळे तेथे उपस्थित सर्व प्रवासी आणि अधिकारी प्रभावित झाले व त्याला विमानात बसायची परवानगी मिळाली. तेथील सगळ्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला. तो एमआयटीचा पहिला आंतरराष्ट्रीय अंध विद्यार्थी होता. त्या विदेशी कॉलेजात त्याने फक्त अभ्यासच नव्हे, तर खेळात उत्तम प्रावीण्य संपादन केले व अतिशिय लोकप्रिय झाला. त्याच्या या सगळ्या पराक्रमाची माहिती मासिकात वाचून एक स्वाती नावाची मुलगी खूप प्रभावित झाली. पुढे तीसुद्धा शिक्षणासाठी अमेरिकेत आली.

एमआयटीची पदवी प्राप्त केल्यावर अमेरिकेत त्याला मोठ्या कॉर्पोरेट संधी आल्या होत्या, पण भारतात काहीतरी वेगळे नावीन्यपूर्ण करण्यासाठी त्याने नम्रपणे नकार दिला. श्रीकांतने आधीच ठरवले होते की, तो जे काही करेल ते फक्त त्याच्या एकट्यासाठीच न करता त्याच्या कार्याचा फायदा इतर अंध व्यक्तींना पोचायला हवा. मग जगातील विविध व्यापार प्रकारांचा सखोल अभ्यास करून असे क्षेत्र निवडले, ज्यामुळे व्यापारासोबतच पर्यावरणाचेसुद्धा रक्षण होईल. पण विविध प्रकारच्या प्रयत्नांना त्याला सुरुवातीला यश आले नाही. शाळेत असताना एकदा डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या कार्यक्रम

ात एक विद्यार्थी म्हणून मला भारताचा अंध राष्ट्रपती बनायचे आहे, असे श्रीकांत बोलला होता. डॉ. कलाम यांनी त्याचे कौतुक केले होते. ते आठवून श्रीकांतने पुन्हा मार्गदर्शन व मदतीसाठी डॉ. कलाम यांची भेट घेऊन त्यांना त्याला तो अंध असल्यामुळे लोक गुंतवणूक करण्यासाठी विश्वास ठेवत नाहीत, असे सांगितले. सर्व समजून घेतल्यावर तुझ्या उद्योगात मला पूर्ण विश्वास आहे असे म्हणून डॉ. कलाम यांनी २५ लाख रुपये गुंतवले. ही पहिली गुंतवणूक दाखवून श्रीकांतने श्रीरवी यांना त्याच्या कंपनीत गुंतवणूक करण्यास तयार केले व याप्रकारे श्रीकांत बोल्ला याने ७ जुलै १९९२ रोजी एक भारतीय उद्योगपती म्हणून बोलंट इंडस्ट्रीची स्थापना केली.

कारखान्यासाठी त्याने बंद पडलेला एक कारखाना विकत घेतला. त्या जागेत यंत्र लावून काम सुरू केले. कामाचे ऑर्डर मिळायला लागले, पण एक दिवस कारखान्याची वीज कापण्यात आली. कारण जुन्या मालकाने दीड करोड रुपयांचे बिल दिलेले नव्हते. वीज बिलाच्या बद्दल अधिकाऱ्यांना भेटून त्याने समजवायचा प्रयत्न केला, पण ते तयार झाले नाहीत. तिथून ते परत निघणार तेवढ्यात तेथील शिपायाने श्रीकांतला वाकून नमस्कार केला. कारण त्याचा मुलगाही आंधळा होता. श्रीकांतने विज्ञान शिकण्यासाठी जी कोर्ट केस जिंकली होती त्याचा फायदा मिळून त्याच्या मुलाला विज्ञान शाखेत प्रवेश मिळाला. या प्रसंगाने वीज बिल कार्यालयातील अधिकारी प्रभावित झाले व त्यांनी बिल भरण्यासाठी व्याज न घेता एक वर्षाची मुदत दिली. कबूल केल्यानुसार त्यांनी ते बिल तर फेडलेच; शिवाय काही दिवसात त्यांनी आणखी दुसरा कारखानासुद्धा सुरू केला.

पुढे श्रीरतन टाटा यांनी त्याच्या कंपनीला मदत निधी दिला. या निधीतून शेकडो अपंग लोकांना रोजगार मिळाला. रोजगार, आर्थिक

आणि पर्यावरण समस्यांचे संयोजन करून बोलंट इंडस्ट्रिज महानगर पालिकेच्या कचरा किंवा रद्दी कागदापासून पर्यावरणास अनुकूल क्राफ्ट पेपर निर्माण करणे, पुनर्नवीनीकरण केलेल्या कागदापासून पॅकेजिंग उत्पादने बनवणे, वनस्पतींच्या पानांपासून डिस्पोजेबल उत्पादने आणि पुनर्नवीनीकरण कागद निर्माण करणे तसेच भंगारमधील प्लॅस्टिकचा पुनर्वापर करणे आदी कार्ये करत असते.

बोलंटने सुरुवातीपासून महिन्याला सरासरी २० टक्के वाढ दर्शविली आहे आणि २०१८ मध्ये १५० कोटीची उलाढाल केली आहे. यथावकाश श्रीकांतचे स्वातीशीच लग्न होऊन त्यांना मुलगी झाली. इ. स. २००५ पासून ते युवा नेते होते. त्यानंतर ते 'लीड इंडिया २०२० : द सेकंड नॅशनल युथ मूव्हमेंट'चे सदस्य बनले. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांनी 'लीड इंडिया २०२०'ची स्थापना केली होती. यात भारताला २०२० पर्यंत गरिबी, निरक्षरता आणि बेरोजगारीचे निर्मूलन करून विकसित राष्ट्र बनण्याचे ध्येय गाठण्यात मदत कणे असे उद्दिष्ट होते. बोल्ला यांनी २०११ मध्ये 'समनवाई सेंटर फॉर चिल्ड्रेन विथ मल्टिपल डिसॅबिलिटीज'ची सह-स्थापना केली, ज्यामध्ये त्यांनी ब्रेल प्रिंटिंग प्रेस सुरू केली. त्यात आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आणि स्वयं-शाश्वत जीवनासाठी एकाधिक अपंगत्व असलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक, व्यावसायिक, आर्थिक पुनर्वसन करण्यात येते.

श्रीकांत हे सप्टेंबर २०१६ मध्ये स्थापन झालेल्या 'सर्ज इम्पॅक्ट फाऊंडेशन'चे संचालक आहेत. एप्रिल २०१७ मध्ये बोल्लाचे नाव फोर्ब्स मासिकाने संपूर्ण आशियातील ३० वर्षाखालील ३० व्यक्तींच्या यादीत नोंदविले आहे, त्या यादीतील एकूण तीन भारतीयांपैकी बोल्ला एक आहेत.

श्रीकांत बोला यांना मिळालेले पुरस्कार

प्रतिष्ठित युवा सेवा पुरस्कार, तेलुगु फाईन आर्ट्स सोसायटी ऑफ न्यू जर्सीतर्फे युवा उत्कृष्टता पुरस्कार, एनडीटीव्ही इंडियन ऑफ द इयर पुरस्कार २०१५ मध्ये वर्षातील सर्वोत्कृष्ट उद्योजक, एसएमईमधील उदयोन्मुख विजेते- प्राईड ऑफ तेलेगाना पुरस्कार २०१८, बिझनेस लाईन यंग चेंज मेकर अवॉर्ड २०१८, मलेशियाद्वारे उदयोन्मुख नेतृत्व पुरस्कार - २०१६, सीआयआयद्वारे वर्षातील उदयोन्मुख उद्योजक - २०१६, ९३ व्या इंडिया सायन्स काँग्रेसमध्ये दुसरे स्थान व वन यंग वर्ल्डद्वारे २०१९ चा वर्षातील सर्वोत्कृष्ट उद्योजक पुरस्कार, टीव्ही९ २०१९ तर्फे नवनक्षत्र सन्मान पुरस्कार, यंग ग्लोबल लीडर्स २०२१ पुरस्कार.

चित्रपट : २०२२ साली भूषण कुमार, कृष्ण कुमार आणि निधी परमार हीरानंदानी यांनी बोल्लाच्या जीवनावर एक चरित्रपट निर्माण करण्याची घोषणा केली. या चित्रपटात बोल्लाची भूमिका अभिनेते राजकुमार राव यांनी निभावली असून याचे दिग्दर्शक तुषार हीरानंदानी आहेत. हा चित्रपट १० मे २०२४ रोजी 'श्रीकांत' नावाने अक्षय्यतृतीयेच्या मुहूर्तावर प्रदर्शित झाला. यातून काय शिकायचे? अतिगरीब जन्माने आंधळा मुलगा जर विज्ञान विषय घेऊन बारावी करू शकतो, अमेरिकेतील सर्वोच्च इंजिनीअरिंग कॉलेजात उत्तम गुणांनी पास होऊन आपल्या बरोबर इतरांनाही रोजगार देऊ शकतो तर कुणालाही निराश होण्याचे कारण नाही. थोडक्यात काय, ज्याने काही चांगले कार्य हाती घेतले तो जरी लोकांच्या दृष्टीने कमजोर असेल, तरी तो अथक प्रयत्नाने अगदी प्रतिकूल परिस्थितीत गरीब असूनही यशस्वी होऊ शकतो. आज वसंत पंचमी. म्हणजे विद्येची देवता सरस्वतीचा जन्मदिन आहे. सक्षम होण्याचा चांगला संकल्प करून तसा प्रयत्न करणे हीच सरस्वतीची खरी पूजा ठरेल. (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर आहेत.)

सत्कर्माचे फळ । मोक्ष देई ।।

कोणाच्या धनाचा । कोण रे मालक ।।
सत्तेचा चालक । विश्वंभर ।।१।।

भाड्याचे हे घर । विसर पडला ।।
विषयी ग्रासला । उभा जन्म ।।२।।

उधारीचे श्वास । सत्कर्म किराया ।।
परी मोह-माया । मेळ नाही ।।३।।

जप्ती येते घरा । वाढता उधारी ।।
श्वास हा मायारी । काळ नेतो ।।४।।

सावध हो वेड्या । घाल ताळमेळ ।।
सत्कर्माचे फळ । मोक्ष देई ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

सारे जगणेच उधळले...

वाट शोधणारे कित्येक रस्ते
कधी उंबऱ्यात थबकून विरले
तर कधी सैरभैर धावणारे पाय
निव्वळ विसाव्यालाही तरसले
उभा जन्म वाहिलेली बोच कधी
मग शेवटच्या टप्प्यात उमजली
तर कुणी उलगडलेली सत्यताही
आयुष्यभर खंत म्हणून वाहिली
भावनेने आसुसलेले शब्द कधी
बंद ओठांच्या कैदेत अडकले
कधी वाग्बाणांनी घातलेले घाव
अखेर भरायाचेच राहून गेले
कधी नियतीने बांधलेले नाते
त्याच्या अस्तितास्तव झगडले
तर कुणी दिल्या वचना खातर
मग हयातभर स्वत:ला झिजवले
दिल्या घेतल्याचे हिशोब कुणी
सतत उठता बसता गिरवले
तर कुठे कर्तव्याची कास धरत
मग कुणी सारे जगणेच उधळले

धनश्री धावकर

मार्ग

क्रमांवा लागतो ज्याला त्याला
ज्याचा त्याचा मार्ग दूर करीत
रस्त्यातील उपसर्ग वश ठरते पाहून
ज्याची त्याची इयत्ता आणि ज्याचा त्याचा वर्ग
जे जीवन पदरी पडेल ते नरक किंवा मग स्वर्ग.
दृष्टिकोनावर सारे क्रमित राहावा निमूटपणे आपला मार्ग

आशिष देव

मोहिनी महागड्या घरांची आणि कोळंबीची



अर्थोद्योग
महेश देशपांडे

अर्थव्यवस्थेची दिशा दाखवणाऱ्या काही महत्त्वाच्या बातम्या अलिकडच्या काळात समोर आल्या. त्यातून अर्थव्यवस्थेची दिशा आणि दशा उलगडायला मदत झाली. अस्थिर बाजारातही 'सिक्युरिटी ट्रान्झॅक्शन टॅक्स' संकलनात ७५ टक्के वाढ होणे ही यासंदर्भातील पहिली बातमी. एक कोटींपेक्षा जास्त किमतीच्या घरांना जादा मागणी आणि भारतीय कोळंबीची अमेरिका आणि चीनला मोहिनी पडणे या अशाच दोन बातम्या. सरकारच्या लाभाच्या योजनांबाबत स्टेट बँकेने अलिकडे आपली चिंता स्पष्ट केली, हीदेखील आवर्जून नमूद करण्यासारखी एक बातमी.

शेअर बाजारात अस्थिरता असूनही 'सिक्युरिटीज ट्रान्झॅक्शन टॅक्स' (एसटीटी) संकलन १२ जानेवारी २०२५ पर्यंत ७५ टक्क्यांनी वाढून ४४,५३८ कोटी रुपये झाले आहे. २०२४ मध्ये याच कालावधीत ते २५,४१५ कोटी रुपये होते. 'सिक्युरिटीज फ्युचर्स अँड ऑप्शन्स' (एफ अँड ओ) वरील 'एसटीटी' वाढल्यामुळे ही वाढ झाली आहे. ती 'एफ अँड ओ' विभागातील सट्टा क्रियाकलाप नियंत्रित करण्यासाठी लागू करण्यात आली होती.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी २३ जुलै २०२४ रोजी सादर केलेल्या अर्थसंकल्पात १ ऑक्टोबर २०२४ पासून 'एफ अँड ओ'वर 'एसटीटी' दुप्पट करण्याचा प्रस्ताव दिला होता. 'एसटीटी' संकलनात जुलैपासून सातत्यपूर्ण वाढ आहे. सेबी आणि रिझर्व्ह बँकेने 'एफ अँड ओ' विभागातील वाढीबद्दल चिंता व्यक्त केली असताना 'एसटीटी' संकलनात ही वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे 'मॅक्रो इकॉनॉमिक' स्थिरतेला धोका निर्माण होऊ शकतो.

वाढलेल्या 'एसटीटी' संकलनामुळे सरकारच्या महसुलात वाढ झाली असून आतापर्यंत ४४ हजार ५३८ कोटी रुपयांचे संकलन झाले आहे. चालू आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या अंदाजपत्रकातील ३७ हजार कोटी रुपयांपेक्षा ते जास्त झाले आहे. 'सिक्युरिटीज फ्युचर्स आणि ऑप्शन'वरील एसटीटी अनुक्रमे ०.०२ टक्के आणि ०.१ टक्के करण्यात आला आहे. यापूर्वी फ्युचर्स आणि पर्यायांवरील एसटीटी दर अनुक्रमे ०.०१२५ टक्के आणि ०.०६२५ टक्के होते. त्याच वेळी, इक्विटी शेअर्समधील डिलिव्हरी ट्रेडवरील एसटीटी दर ०.१ टक्के आहे.

दरम्यान, भारतात प्रथमच एक कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमत असलेल्या अपार्टमेंट्सनी वार्षिक निवासी विक्रीमध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त योगदान दिले आहे. घर खरेदीच्या प्राधान्यक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल झाल्याचे यातून पहायला मिळते. 'जेएलएल' या रिअल इस्टेट कन्सल्टन्सी फर्मच्या २०२४ च्या अहवालानुसार प्रीमियम (साडेतीन कोटी) आणि लक्झरी (पाच कोटींहून अधिक) विभागांमध्ये मागणीम ध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. तज्ज्ञांच्या मते या वाढीमागील मुख्य घटक म्हणजे 'हाय-नेट-वर्थ इंडिविज्युअल्स.' तीन ते पाच कोटी रुपयांदरम्यानची विक्री ८६ टक्क्यांनी वाढली आहे. २०२४ मध्ये ती एकूण विक्रीच्या ९ टक्के होती. २०२३ मध्ये फक्त ५ टक्के होती. पाच कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमत असलेले लक्झरी घरांचे मार्केट ८० टक्क्यांनी वाढले. या घरांनी २०२३ मधील ३ टक्क्यांच्या तुलनेत २०२४ मध्ये एकूण विक्रीमध्ये ५ टक्के योगदान दिले.

गेल्या वर्षी जवळपास ३० लाख २ हजार निवासी युनिट्स सुरू होणार होती. टॉप-७ शहरांमधील हा सर्वात मोठा वार्षिक निवासी पुरवठा आहे. वार्षिक 'लाँच'मध्ये मुंबई, बंगळुरू आणि हैदराबादचा वाटा ६० टक्के आहे. बंगळुरू, चेन्नई, हैदराबाद आणि पुणे या टेक शहरांमध्ये व्यावसायिक कार्यालयाच्या क्षेत्राच्या विस्तारामुळे २०२४ मध्ये सुमारे ६० टक्के मागणी नोंदविली गेली. देशातील आठ प्रमुख शहरांमध्ये घरांची विक्री १२ वर्षांच्या उच्च पातळीवर गेली तर दिल्ली- एनसीआरमध्ये घट झाली. ऑक्टोबर-डिसेंबर तिमाहीमध्ये आठ प्रमुख शहरांमधील घरांच्या विक्रीत २६ टक्के घट झाली.

अधिक किमतीच्या घरांच्या मागणीत मात्र गेल्या तिमाहीमध्ये ही वाढ १४ टक्के वाटा राहिली. आता एक लक्षवेधी बातमी. माशांच्या निर्यातीमध्ये भारताने पुन्हा एकदा दमदार कामगिरी केली आहे. भारताने २०२४-२५ या आर्थिक वर्षात आतापर्यंत माशांच्या निर्यातीतून ६०,५२३.८९ कोटी रुपये कमावले आहेत. यामध्ये कोळंबीच्या विक्रीतून भारताने सर्वात मोठी कमाई केली आहे. एकूण निर्यातीमध्ये हे प्रमाण सुमारे दोन तृतीयांश भरते. भारतीय सागरी उत्पादनांची गुणवत्ता आणि वाढती मागणी यामुळे अमेरिका आणि चीनसारख्या देशांनी भारतीय समुद्री खाद्यपदार्थ आयात केले आहेत.

सरकारी आकडेवारीनुसार २०२४-२५ या आर्थिक वर्षात भारताने एकूण १.७८ दशलक्ष टन 'सी फूड'ची निर्यात केली. गेल्या वर्षीच्या तुलनेत हे प्रमाण २.६७ टक्के अधिक आहे. भारतीय सागरी उत्पादने ताजेपणा आणि गुणवत्तेसाठी प्रसिद्ध आहेत. त्यांची मागणी सतत वाढत आहे. भारतीय माशांना परदेशात मोठी मागणी आहे. यामुळे देशातून माशांची मोठ्या प्रमाणात निर्यात केली जाते. याचा मोठा फायदा देशाला होत आहे. त्यामुळे मत्स्य पालन क्षेत्राला सरकारने आणखी प्रोत्साहन देण्याची मागणी केली जात आहे. 'सी फूड' निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारने अनेक पावले उचलली आहेत.

विशेषत: कोळंबी आणि मत्स्य खाद्य उत्पादनासाठी वापरल्या जाणाऱ्या निविष्ठांवरील सीमा शुल्क (बीसीडी) ५ टक्के करण्यात आले आहे. 'ब्रूडस्टॉक' आणि 'पॉलीचेट वर्म्स'वर करसूट देण्यात आली आहे. याशिवाय क्रिल मील, फिश ऑईल आणि अल्गल प्राईम (पीठ) यासारख्या निविष्ठांवरील करही कमी करण्यात आला आहे. त्याचबरोबर नैसर्गिक वायूपासून बनवलेल्या सिंगल सेल प्रोटिन आणि कीटकांच्या अन्नावरील करही कमी करण्यात आला आहे. ही सर्व पावले मत्स्य पालन उद्योगाला बळकट करण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारतीय उत्पादने स्पर्धात्मक ठेवण्यासाठी उचलण्यात आली आहेत.

२०२४-२५ या आर्थिक वर्षात अमेरिका हा भारताचा सर्वात मोठा सीफूड आयातदार म्हणून उदयास आला आहे. अमेरिकन बाजारपेठेत सर्वाधिक मागणी असलेली फ्रोझन कोळंबी अमेरिकेच्या एकूण आयातीपैकी ९१.९ टक्के होती. भारतीय सी फूडच्या एकूण निर्यातीपैकी ३४.५३ टक्के अमेरिकेत निर्यात झाली. या यादीत चीन दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा खरेदीदार होता. चीनने १.३८ अब्ज डॉलर किमतीचे ४



लाख ५१ हजार टन सी फूड आयात केले. त्याचबरोबर जपान तिसऱ्या क्रमांकावर आहे. व्हिएतनाम, थायलंड, कॅनडा, स्पेन, बेल्जियम, संयुक्त अरब अमिराती आणि इटली या देशांनीही मोठ्या प्रमाणात भारतीय 'सी फूड' आयात केले आहे. अर्थनगरीत गेल्या आठवड्यामध्ये आणखी एक बातमी लक्ष वेधून घेणारी ठरली.

निवडणुकीच्या वेळी राजकीय पक्ष आपल्या पक्षाचा विजय सुनिश्चित करण्यासाठी अनेक आश्वासने देतात. निवडणूक आली की थेट लाभ हस्तांतरणांसारख्या अनेक योजना जाहीर केल्या जातात; परंतु या योजनांमुळे राज्यांच्या अंदाजपत्रकांवर दबाव येत असल्याची चिंता स्टेट बँकेने व्यक्त केली आहे. तिच्या मते अशा योजनांचा बोजा राज्यांच्या बजेटवर पडतो. महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये नुकत्याच निवडणुका झाल्या. त्या दरम्यान महिलांसाठी थेट लाभ हस्तांतरण योजना जाहीर करण्यात आल्या. तो राजकीय पक्षांच्या निवडून येण्याच्या रणनीतीचा एक महत्त्वाचा भाग होता. याचा फायदा राजकीय पक्षांना झाला आणि त्यांची सरकारेही स्थापन झाली; पण त्याचा दबाव राज्याच्या अर्थसंकल्पावर पडला आहे.

स्टेट बँकेच्या अहवालानुसार, निवडणुकीदरम्यान आठ राज्यांमध्ये महिलांच्या लाभाच्या योजना जाहीर करण्यात आल्या. त्यासाठी १.५ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त तरतूद करावी लागली. ही रक्कम राज्यांच्या उत्पन्नाच्या ३ ते ११ टक्के आहे. या योजनांवर वर्षाकाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जात आहेत. अहवालात कर्नाटकमधील गृहलक्ष्मी योजनेसारख्या योजनांचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यावर सरकारला वर्षाला २८,६०८ कोटी रुपये खर्च करावे लागतात. हे कर्नाटकच्या महसुलाच्या ११ टक्के आहे. या योजना महिलांना स्वावलंबी बनवणाऱ्या असल्या, तरी राज्यांनी त्या जाहीर करण्यापूर्वी वित्तीय तुटीकडे लक्ष दिले पाहिजे. हा प्रघात कायम राहिल्यास भविष्यात केंद्र सरकारवर त्याचा दबाव पडू शकतो, अशी चिंता स्टेट बँकेने व्यक्त केली आहे. (लेखक आर्थिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)

जीवनवेधी कलेचे ज्ञान करून देणारे 'विंदाचे गद्यरूप'

डॉ. सुधीर नरहर रसाळ हे सुप्रसिद्ध समीक्षक आहेत. साहित्यविषयक लेखन, समीक्षा लेखन आणि संपादनात त्यांनी मोठया प्रमाणात लिखाण केले आहे. १० ऑगस्ट १९३४ रोजी जन्मलेले सुधीर रसाळ हे १९९० ते १९९३ या काळात औरंगाबाद विद्यापीठाच्या मराठी भाषा व वाङ्मय विभागाचे प्रमुख होते. त्यांची ग्रंथनिर्मिती बहूअंगी असून त्यांना विंदांचे गद्यरूप या समीक्षात्मक पुस्तकासाठी २०२४ चा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झाला आहे. हा ग्रंथ २०२२ मध्ये प्रकाशित झाला आहे. गोविंद विनायक म्हणजे विंदा करंदीकर हे कवी म्हणून सर्वज्ञात आहेत. मात्र, त्यांनी सर्व कलांपासून वाङ्मय वेगळे काढून 'जीवनवेधी कले'चा सिद्धान्त मांडला होता. याकडे जाणकारांचे जावे तितके लक्ष गेले नाही. सुधीर रसाळ म्हणतात त्याप्रमाणे खरे तर करंदीकरांना जीवनवेधी कलेचा सिद्धान्त मांडून एक नवे काव्यशास्त्रच उभे करायचे होते. त्यांच्या या सार्या मांडणीची व त्यांच्या काव्यशास्त्राची मीमांसा प्रा. रसाळ यांनी या पुरस्कार प्राप्त ग्रंथात केली आहे.

साहित्य शिक्षण
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

बा. सी. मर्ढेकरांच्या लय सिद्धांताची तशी दखल मराठी साहित्य रसिकांनी आणि अभ्यासकांनी घेतली तशी करंदीकरांच्या जीवनवेधी कलेच्या सिद्धांताचे दखल घेतल्या गेली नाही याबाबत विचार करून डॉ. सुधीर रसाळ यांनी विंदांचे गद्यरूप या ग्रंथामध्ये त्यांच्या गद्य लेखनावर भाष्य केले आहे. भाषाविषयक किंवा सिद्धांत विषयक ग्रंथ हे एक प्रकारचे संशोधनच असते त्यामुळे औपचारिक शिक्षणाचे कमी असले तरी अनौपचारिक शिक्षणाचे भांडारच त्या ग्रंथरूपातून लेखकाने वाचकांसाठी खुले केलेले असते. विंदांचे गद्यरूपमध्ये सुद्धा आपल्याला हा अनुभव येतोच.

करंदीकर हे इंग्रजी वाङ्मयाचे प्राध्यापक असल्यामुळे इंग्रजी साहित्या सोबतच इंग्रजी भाषेत उपलब्ध असलेले पाश्चात्य काव्यशास्त्र, सौंदर्यशास्त्र तत्त्वज्ञान व मानसशास्त्र या ज्ञानशाखांचाही त्यांचा व्यासंग होता. त्यामुळे त्यांच्या साहित्य विचारावर या सर्वांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. मात्र, भारतीय साहित्यशास्त्राचा त्यांच्या साहित्य विचारावर प्रभाव दिसत नाही असे आपल्या प्रास्ताविकात डॉ. सुधीर रसाळ म्हणतात. यावरून करंदीकरांची अभ्यास कक्षा त्याच्या अनुभूतीपेक्षा मोठी होती की काय? असा प्रश्न माझ्यापुढे पहिल्यांदा उभा राहिला. आपल्या जीवन अनुभूतीत भारतीय ललित साहित्याचा वावर असला तरी साहित्यशास्त्राचा पाहिजे तेवढा वापर जीवनात होत नाही असे म्हणावे लागेल. मात्र करंदीकरांची अभ्यासाची भाषा इंग्रजी असल्यामुळे इंग्रजी ज्ञानाभ्यासाची कक्षा त्यांच्या साहित्य विचारात प्रवाहित झालेली दिसते. करंदीकर एका ठिकाणी म्हणतात, मला वैज्ञानिकाच्या निर्मितीचे प्रक्रिया आणि कवीच्या निर्मितीची प्रक्रिया यात खूप साम्य दिसते. त्यांच्या या उद्गारातून काव्य निर्मिती ही ललित साहित्याचा एक प्रकार नसून रंजनाच्या पलीकडे जाऊन तो एक संशोधनात्मक भाग आहे, त्यात नवनिर्मिती होत असते. वैज्ञानिकाप्रमाणे त्यात वेगवेगळे प्रयोग करून पहावे लागतात. त्याचप्रमाणे वैज्ञानिकाच्या संशोधित प्रकल्पा प्रमाणे काव्याची निर्मिती ही समाजाच्या उपयोगी पडणारी असते असा त्यांच्या वरील विचाराचा सारासार अर्थ असावा असे वाटते. कवितेची सामग्री असलेल्या जाणिवाच्या घडणीत जशी बौद्धिक प्रक्रिया असते, तशीच ती काव्य निर्मिती प्रक्रियेतही असते असे करंदीकर म्हणतात. काव्य निर्मिती ही जाणीवपूर्वक आणि बुद्धीपुरस्सर होणारी प्रक्रिया आहे म्हणूनच कविता लिहिता लिहिता कवी आपल्या लेखनाची वारंवार तपासणी करत असतो आणि प्रत्येक जाणिवेनुसार तिच्यात इष्ट ते बदल करत असतो. हे सर्व सांगत असताना काव्य निर्मिती हा निव्वळ प्रतिभेचा भाग नसून, अभ्यास आणि व्यासंग यातून ते अधिक प्रगल्भ होत जाते.

करंदीकरांच्या मते काव्य निर्मिती ही अभ्यासाशिवाय सकस आणि दर्जेदार होणे कठीण आहे असे दिसते. आणि ते बरोबर आहे असे मलाही वाटते अर्थात बहिणाबाई चौधरीसारख्या फार क्वचित उदाहरणांचा

अपवाद या ठिकाणी लागू होईलच. मात्र, त्या पलीकडे जाऊन कलाकृतीची निर्मिती रसास्वाद आणि मूल्यमापन यांच्याशी पूर्णपणे असं संबंध असलेल्या संकल्पनाच्याबाबत वाद विवादाचा बुद्धिवादी लोक कीस पडतात असे सुतोवाचही लेखकाने करून ठेवलेले आहे. यातून व्यक्ती तितक्या प्रवृत्ती हा विचार करून आपल्याला योग्य वाटेल ते स्वीकारले पाहिजे. जीवन जगताना प्रत्यक्षात लेखकाला घडणारी जीवनदर्शन, जीवन प्रक्रिया आणि कल्पनाशक्ती या बाबींचा विचार करून एकत्रितरितीने होणारे लिखाण हे जीवन विषयक संदर्भांच्या जवळ जाणारे असते. तसेच साहित्यात कल्पनाजन्य जीवनदर्शनाची निर्मिती असते.

वास्तववाद विवेचन या प्रकरणांमध्ये गो. वि. करंदीकरांनी ललित साहित्याला अन्य ललित कलांपासून वेगळे करत तिला स्वतंत्र जीवनविधी कला मानले आहे. श्री. के. क्षीरसागर यांच्या राक्षस विवाह या कादंबरीत असलेला नायक कॉलेजमधून पदवीधर होऊन बाहेर पडलेला असतो आणि नायिका दहावीच्या वर्गातील विद्यार्थिनी आहे. अशावेळी हे दोघे एकमेकांशी शौपेन हॉवर, नित्शे, आणि युरोपियन साहित्य याबाबत चर्चा करत असतात. ही बाब अशक्य असल्याचे गृहीत धरून मर्ढेकरांनी आपल्या समीक्षेत या बाबीचा उपहास केला आहे. दहावीमधील विद्यार्थिनी इतक्या प्रगल्भपणे साहित्यावर चर्चा करणे, कसे शक्य आहे? असा प्रश्न निर्माण होताच मर्ढेकरांसारख्या सडेतोडस समीक्षेतून वरील बाबीवर प्रश्नचिन्ह उभे राहते. मात्र त्याच वेळी भारतीय शिक्षण प्रणालीवर आपण अविश्वासच दाखवतो आहे असे मला वाटते. एखादी अति सामान्य प्रतिभेची व्यक्ती इयत्ता दहावीत असली तरी स्वतःच्या अभ्यासातून किंवा समोरील व्यक्तीच्या अभ्यासाला पूरक असे स्वतःचे मत मांडू शकते, याबाबत समीक्षकांनीही विचार करायला हवा.

करंदीकरांनी सांगितल्याप्रमाणे साहित्य निर्मिती आणि संशोधन यांना एकाच दृष्टीने पाहिल्यास निरीक्षण आणि आकलन केले जाते, केव्हा वैज्ञानिक वस्तूचा मूळ आकृतीबंध आहे तसाच ठेवून त्यातील मूळची वैश्विक तत्वे ओळखून त्यावर संशोधन करत असतात, त्याचप्रमाणे लेखक वस्तूच्या मूळच्या आकृतीबंधात आपल्या निर्मितीसाठी आवश्यक ते बदल करत असतात. करंदीकरांनी भाषेसंबंधी, भाषा हे माध्यम मुळे मुख्यता कल्पनाधिष्टीत आहे. तसेच भाषेमध्ये तीन सूक्त सामर्थ्य आहेत ते अविष्कारकारक, वस्तूदर्शक आणि आवाहक असे असतात असे विधान केले आहे. भाषा ही ज्ञानाचे माध्यम आहे ही भाषा आत्मविष्कार, आणि संप्रेषण याचे महत्त्वाचे कार्य करते. या शब्दात त्यांनी भाषेचा उल्लेख केलेला आहे. साहित्यकृतीला प्राप्त होणारा घाट अन्य भाषिक आविष्कारापेक्षा तिला वेगळेपण प्राप्त करून देतो. वैचारिक लेखन, इतिहासपर लेखन त्यातूनही जीवनदर्शन होत असते. परंतु साहित्यातील जीवनदर्शन त्याला प्राप्त झालेल्या घाटामुळे अन्य भाषिक आविष्काराहून वेगळे असते असे लेखक म्हणतात. या बाबीचा विचार करता भाषिक आविष्करण आणि भाषेची घडवणूक या बाबी साहित्य निर्मितीसाठी महत्त्वाच्या आहेत आणि त्या अध्ययन अभ्यासाशिवाय सहज साध्य होणाऱ्या नाहीत हे लक्षात घ्यावे लागते.

विंदांचे गद्यरूप यामध्ये साहित्य निर्मितीचा हेतू याबाबत सुधीर रसाळ यांनी समीक्षेतील जटिल आणि वादग्रस्त प्रश्न याबाबत दीर्घ विवेचन केलेले आहे. वाचक साहित्य कोणत्या हेतूने वाचतो? वाचकावर त्याचा काय परिणाम होतो? वाचकाच्या दृष्टीने साहित्याची परिस्थिती काय? याच्या शोधाचे प्रयोजन निश्चित करण्याचे काम महत्त्वाचे असल्याचे सुधीर रसाळ म्हणतात. करंदीकरांच्या जीवनविधी कलांतून जीवनदर्शन घडवणार्या ललित व साहित्याची निर्मिती म्हणजे जीवनदर्शन घडवणे हा साहित्य निर्मितीचा हेतू आहे असे लेखक सांगतात. त्या दृष्टीने जीवनदर्शनातून सुसंस्कृतीचा संस्कार वाचकांवर घडवणे हा उद्देश असतो असे सुधीर रसाळ यांना वाटते. अर्थात हे मत वाचकाला जीवनदर्शन कशासाठी घडवायचे? या प्रश्नाचा उलगडा करून द्यावे लागते. असे सांगून याबाबत आपली मते मांडत वरील प्रश्नाचे उत्तर करंदीकरांच्या भूमिकेत मिळत नाही. असे स्पष्टपणे लेखक सांगत असतात. दर्शन घडवून यातून माणसावर सुसंस्कृततेचा संस्कार होतो भावना अपूर्णतेकडून परिपूर्ण करण्याची प्रेरणा असते असे लेखक म्हणतात. त्यातून त्यांना नेमके काय अभिप्रेत आहे याचा उलगडा सुधीर रसाळ यांनी ज्ञानात्मक आणि नैतिक भूमिका या परिच्छेदा मधून केला आहे.

(पान ६ वर)

पान १ वरून

अमेरिकेत 'चले जाव' सुरू

देश, विलक्षण दारिद्र्यात खितपत पडले आहेत. या गरिबीमुळे त्या देशात स्थिर आणि कायदेशीर शासकीय व्यवस्था कायम राहू शकत नाही. स्वाभाविकच या देशांतील नागरिक अधिक सुरक्षित आणि संपन्न जीवनाच्या ओढीने, भारताचा मार्ग धरतात. कसेही करून भारतात घुसले की, ते भारतात कोठेही जाण्यास मोकळे होतात. या लोकांना भारताची सरहद्द पार करण्यात, काही भ्रष्ट सरकारी कर्मचारीच मदत करतात, यात शंका नाही. त्यामुळे देशात राहणाऱ्या या बेकायदा लोकांची अधिक जबाबदारी ही सरकारी यंत्रणांची आहे.

आपल्या वैयक्तिक फायद्यासाठी, आपण आपल्याच देशात टाईम बॉम्ब लावण्याचे काम करीत आहोत, हे त्यांच्या लक्षात येत नाही. कारण भारतात येणारे हे लोक प्रामुख्याने मुस्लीम असून, ते कट्टर धार्मिक आहेत. भारतातील वास्तव्यात त्यांच्या प्राथमिक गरजा भागल्यावर ते थेट आपला धार्मिक अजेंडा, येथे राबविण्याचा प्रयत्न करतात. भारतात गेल्या काही वर्षांत उसळलेल्या हिंसाचारामागे, याच परदेशी कट्टरवादी प्रवृत्ती होत्या, हे दिसून आले आहे. त्यामुळे ट्रम्प यांच्यापेक्षाही भारतानेच या बेकायदा परदेशी नागरिकांची परत पाठवणी करणे, नितांत गरजेचे आहे. आता निदान ट्रम्प यांच्या कृतीने अन्य देशांनाही हा मार्ग अवलंबिण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

सहकार क्रांती: भारताच्या आर्थिक लोकशाहीचा...

सहकार मंत्रालयाने, साखर उद्योगाच्या पुनरुज्जीवनासाठी ठोस पाऊले उचलली आहेत. मळीवरचा जीएसटीचा दर २८ टक्क्यांवरून, पाच टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. यामुळे ४६ हजार, ५२४ कोटी रुपयांची बचत झाली आहे. दहा हजार कोटी रुपयांचे कर्ज साखर कारखान्यांना मंजूर करून, इथेनॉल उत्पादन प्रकल्प राबवले जात आहेत.

महाराष्ट्र : सहकाराचा केंद्रबिंदू:-

सहकार क्षेत्रातील या सुधारणांचा लाभ जर सगळ्यात अधिक कुठल्या राज्याला होणार असेल, तर तो महाराष्ट्राला होणार आहे. महाराष्ट्र भारतातील सहकार चळवळीचे केंद्र असलेले प्रमुख राज्य आहे. देशातील पहिला सहकारी साखर कारखाना, महाराष्ट्रात सुरू झाला. यामुळे सहकार चळवळीला मजबूत पाया मिळाला. या चळवळीचे प्रणेते म्हणून, विठ्ठलराव विखे पाटील, धनंजय गाडगीळ आणि वैकुंठ मेहता यांची नावे अग्रक्रमाने घेतली जातात. महाराष्ट्राने सहकार चळवळीत केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिक परिवर्तन साधले. त्यांनी सहकार चळवळ केवळ ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी नव्हे, तर समाजाच्या सर्व थरांमध्ये आर्थिक सक्षमीकरणाचे माध्यम म्हणून उभे केले. पण उज्ज्वल इतिहास असलेल्या सहकार क्षेत्राला पुढील काळात उत्तरोत्तर घरघर लागली. महाराष्ट्रात सहकार चळवळ ही केवळ आर्थिक उपक्रम न राहता, राजकीय सत्ता मिळवण्याचे साधन झाली. सहकार चळवळीच्या केंद्रस्थानी सत्ता आली आणि निवडणुकीत वर्चस्व आणि दिल्लीत वजन राखण्यासाठी, काँग्रेस पक्षाने सहकार क्षेत्राची कंबर तोडण्याचे काम सुरू केले. सहकारमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली सहकार मंत्रालयाने, या क्षेत्रातील पारदर्शकता आणि विकासावर भर दिला आहे. सहकार क्षेत्रातील भ्रष्टाचाराचा बिमोड करून, ते पुन्हा ग्रामीण भारताच्या आर्थिक सक्षमीकरणाचे साधन बनवले जात आहे. नवीन सहकार धोरण, सहकारी बँकांचे संगणकीकरण, सहकारी संस्थाचा आपापसातला सहकार आणि आर्थिक सुधारणा, यामुळे सहकार क्षेत्राला नवसंजीवनी मिळाली आहे. सहकार मंत्रालय केवळ एक धोरणात्मक उपक्रम नाही, तर तो भारताच्या आर्थिक लोकशाहीचा कणा म्हणून सिद्ध होत आहे. सहकारातून समृद्धी या संकल्पनेच्या माध्यमातून, आर्थिक शक्ती ही केवळ काही ठराविक लोकांपुरती मर्यादित राहात नाही, तर ती जनतेच्या हातात पोहोचत आहे. आता सहकार चळवळ ही केवळ महाराष्ट्राचीच नव्हे, तर संपूर्ण देशाच्या आर्थिक प्रगतीचे केंद्रबिंदू बनत आहे.

केरळमध्ये हिंदू लोकसंख्येत घट

ख्रिश्चनांची संख्या अंदाजे १७.५ टक्के होती. परंतु, २०२० सालापर्यंत, एकूण जन्मदरामध्ये हिंदू बालकांचा वाटा ४१.४ टक्क्यांपर्यंत कमी झाला, तर त्याच काळात एकूण जन्मदरामध्ये मुस्लीम बालकांचा वाटा ४४ टक्क्यांपर्यंत वाढला. याच काळात, जन्मलेल्या एकूण बालकांमध्ये ख्रिश्चनांचा वाटा सुमारे, १८ टक्क्यांवरून १४ टक्क्यांपर्यंत कमी झाल्याचेही आढळले आहे.

'सीपीएस' अहवालात असेही म्हटले आहे की, गेल्या तीन दशकात केरळमध्ये, एकूण प्रजनन दरात अर्थात टीएफआरमध्येही मोठी घट झाली आहे. १५-४९ वयोगटातील एका महिलेने जन्म दिलेल्या बालकांची संख्या, 'टीएफआर' म्हणून ओळखली जाते. त्याची सरासरी हाच राज्याचा 'टीएफआर' असतो. कोणत्याही समुदायाची लोकसंख्या टिकवून ठेवण्यासाठी, सरासरी 'टीएफआर' २.१ असावा लागतो. २०२३ सालच्या सर्वेक्षणानुसार, केरळमध्ये मुस्लिमांचा 'टीएफआर' अजूनही २.२५ आहे, तर हिंदूंमध्ये तो १.५३ वर पोहोचला आहे. 'सीपीएस' अहवालातून असे दिसून आले आहे की, या सर्व बदलांचा राज्याच्या लोकसंख्येवर मोठा परिणाम झाला आहे. 'सीपीएस'ला असे आढळून आले आहे की, १९५० सालापासून केरळमध्ये मुस्लिमांची लोकसंख्या, सर्वात वेगाने वाढत आहे. २००१ ते २०११ दरम्यान, केरळमध्ये हिंदू लोकसंख्या केवळ २.२३ टक्के आणि ख्रिश्चन लोकसंख्या केवळ १.३८ टक्क्यांनी वाढली. याच काळात मुस्लीम लोकसंख्या १२.८ टक्के वाढली. हा ट्रेंड याआधीही चालू होता. विश्लेषणात 'सीपीएस'ला असेही आढळले आहे की, २००८-२१ सालच्या दरम्यान जन्मलेल्या बालकांमध्ये, मुस्लिमांचा वाटा त्यांच्या लोकसंख्येपेक्षा खूपच जास्त आहे. परंतु, राज्यातील मृत्यूंमध्ये त्यांचा वाटा त्यांच्या लोकसंख्येपेक्षाही कमी आहे. 'सीपीएस' अहवालात असे दिसून आले आहे की, २००८ ते २०२१ दरम्यान केरळमध्ये मृत्युमुखी पडणार्या मुस्लिमांचा वाटा सुमारे २० टक्के होता, जो त्यांच्या २६.५ टक्के लोकसंख्येपेक्षा खूपच कमी आहे. उलटपक्षी, मृत्यूंमध्ये हिंदूंचे प्रमाण सुमारे ६० टक्के आहे. ख्रिश्चनांमध्येही त्यांच्या लोकसंख्येनुसार, मृत्यूची संख्या समान राहिली आहे. अहवालातून असेही दिसून आले आहे की, दरवर्षी केरळच्या लोकसंख्येपैकी सर्वाधिक लोक मुस्लीम समुदायात सामील होत आहेत. केरळमधील प्रत्येक समुदायात दरवर्षीचे जन्म आणि मृत्यू यांचा बालकांमधील फरक मोजून, 'सीपीएस'ने हा डेटा तयार केला आहे.

'सीपीएस'नुसार, २०२१ साली एक लाख, चार हजार नवीन लोक मुस्लीम समुदायात सामील झाले आहेत. याचकाळात हिंदूंची लोकसंख्या केवळ १ हजार, ०९९ संख्येने वाढली आहे. ख्रिश्चन लोकसंख्येत तर ६ हजार, २१८ संख्येने घट झाली आहे. अहवालानुसार, हिंदूंच्या लोकसंख्येतील वाढीचे प्रमाण सतत कमी होत आहे. जर हाच कल सुरु राहिला, तर काही वर्षांत हिंदू लोकसंख्या कमी होऊ लागेल. तथापि, २००८ सालापासून दरवर्षी मुस्लीम लोकसंख्येत एक लाखांहून अधिक लोकांची भर पडत आहे. अहवालात असे दिसून आले आहे की, २०११-२० सालच्या दरम्यान लोकसंख्येतील त्यांचा वाटा २६ टक्क्यांवरून, २९ टक्क्यांपेक्षा जास्त झाला आहे. त्याचवेळी, केरळच्या लोकसंख्येतील हिंदूंचा वाटा कमी होत आहे. येत्या काळात ही तफावत वाढतच राहू शकते, असे अहवालात म्हटले आहे, जी निश्चितच चिंताजनक बाब म्हणावी लागेल.

हळूहळू वर्षसमाप्तीच्या दिशेने निघालेले वर्ष माघामध्ये आणखीनच आल्हाददायक असते. संक्रांतीच्या उत्साही वातावरणापाठोपाठ रथसप्तमीने सूर्याच्या बदलत्या प्रवासदिशेने येणारी समृद्धी दर्शवली तर दुसरीकडे या महिन्यातील श्रीगणेश जयंतीचा भाविकांमध्ये आगळा उत्साह पाहायला मिळतो. थंडीने काढता पाय घेण्याचा हा काळ आगामी बदलाचे संकेत देऊन जातो.

प्रासंगिक
मधुरा कुळकर्णी

आल्हाददायक माघ

माघ महिना हे एक अद्भुत आध्यात्मिक पर्व असते. हा महिना भारतीय संस्कृतीत आणि हिंदू धर्मशास्त्रात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. हा महिना केवळ धार्मिकच नव्हे तर आध्यात्मिक दृष्टिकोनातूनही महत्त्वपूर्ण आहे. कदाचित त्यामुळेच या महिन्याला 'तपश्चर्येचा महिना' असे संबोधले जात असावे. कारण या संपूर्ण महिनाभराच्या काळात भक्तगण तप, जप आणि ध्यानधारणेत रमतात. माघ महिन्याचे आगमन सण-उत्सवांनी गजबजलेले असते तसेच या काळात निसर्गही प्रसन्न असतो. त्यामुळेच एकीकडे आध्यात्मिक आनंद मिळतो तर दुसरीकडे प्रसन्न निसर्गात रममाण होत दैनंदिन जीवनात आनंदाचे क्षण शोधण्याची पर्वणीही साधता येते. या अर्थांनी या महिन्याचे महत्त्व आहे.

माघ महिन्याच्या आध्यात्मिक महत्त्वाबद्दल बोलायचे तर या काळात गंगा, यमुना आणि सरस्वती या नद्यांच्या त्रिवेणी संगमावर स्नान करण्याची परंपरा आहे. या काळात त्रिवेणी संगमात स्नान केल्याने पापांचे क्षालन होते आणि मोक्ष प्राप्तीचा मार्ग सोपा होतो, असे मानले जाते. 'माघस्नाने महापुण्यम' असा उल्लेख शास्त्रांमध्येही आहे. माघ महिन्याच्या पवित्रतेमुळेच कुंभमेळ्याचे आयोजन याच काळात केले जाते. आताही आपण या मंगलपर्वाचा आनंद घेत आहोत. यंदा पवित्र संगमावर लाखोंच्या संख्येने भक्तगण तसेच ऋषिमुनी आणि साधुसंतांचा मेळा रंगला असून त्यांच्या पूजापाठांनी आणि शाही स्नान आणि कर्मकांडांनी वातावरणावर आगळीच जादू केली आहे. प्रचंड मोठ्या संख्येने एकत्र येणारा हा हिंदू समुदाय देशासाठीच नव्हे तर जगासाठीही आश्चर्याचा भाग असून तो बघण्यासाठी जागतिक पातळीवर धनाढ्य, ज्येष्ठ उद्योजक इथे येत आहेत. या सगळ्याचा आध्यात्मिक रंग देशामध्ये जाणवत असून नाशिकच्या पवित्र प्रवाहामध्येही मंगलस्नानाचे मुहूर्त साधण्यासाठी मोठी गर्दी होताना दिसत आहे. माघ महिन्यात अनेक सण साजरे होतात. त्यामध्ये आपल्याला हिंदू संस्कृतीच्या विविध पैलूंचे दर्शन घडते. यातील एक म्हणजे माघ पौर्णिमा. या दिवशी चंद्राच्या पूर्ण तेजाचे दर्शन होते. या निमित्ताने धार्मिक विधी, जप-तप, दानधर्म आणि सत्यनारायण पूजेचा प्रघात आहे.

वसंत पंचमी हा दिवस भारतीय संस्कृतीमध्ये विशेष महत्त्व राखून आहे. हा सरस्वती पूजनाचा दिवस. आजही या दिवशी ज्ञान आणि कलात्मकतेचे पूजन केले जाते. देशभर या दिवसाचे साजरीकरण बघायला मिळते. माघी गणेश जयंती हा दिवस गणेशभक्तांसाठी आस्था आणि श्रद्धेचा असतो. गणपतीबाप्पाच्या जन्माचा हा दिवस विशेष महत्त्वाचा मानला जातो. त्याचप्रमाणे श्रीपंचमी हा सण कृषी क्षेत्राशी संबंधित लोक साजरा करताना दिसतात. त्यामुळेच शेतकरी या दिवसाच्यानिमित्ताने उत्साह पाहायला मिळतो. माघ महिन्यातील निसर्गाची झलक आगळी आणि अत्यंत आल्हाददायक असते. हा महिना हिवाळ्याचा शेवटचा टप्पा असल्यामुळे हवामान अत्यंत सुखद असते. सकाळच्या कोवळ्या उन्हाची ऊब आणि रात्रीचा गारवा एक आगळावेगळा अनुभव देत असतो. झाडाझुडपांवर आलेले नव्या पालवीचे रंग वसंत ऋतूचे स्वागत करण्यास सज्ज होत असतात. वृक्षांवरचा मोहोर वातावरणात नवीन सुगंध पसरवत असतो. त्याकडे झेपावणारा पक्षिगण आपल्या लीलांनी मोहित करत असतो.

शेताशिवारांमध्ये नवचैतन्याची पेरणी होत असते. हुरडा, कोवळा लुसलुशीत हरबरा दुपारच्या खाण्याची लज्जत वाढवत असतो. एकंदरच निसर्गप्रेमींसाठी हा महिना कोणत्याही पर्वणीपेक्षा कमी नसतो. असा हा माघ महिना अध्यात्मातील संदेश देऊन जातो. तो आपल्याला तप, संयम, शिस्त आणि आध्यात्मिकतेचे महत्त्व शिकवतो. हा महिना ध्यानधारणेसाठी उत्तम मानला जातो. शरीर, मन आणि आत्म्याचे शुद्धीकरण करण्यासाठी या महिन्याचे वेळापत्रक आखण्याची प्रथा आहे. माघ महिना पवित्र हो, सृष्टीचा सुंदर साज, निसर्गही हसतो, होतो नवजीवनाचा आगाज गंगेच्या तीरावर भक्तांची होते गर्दी, सात्त्विकतेने भरलेला, प्रत्येक दिवस आनंदी तप-जपाचे पर्व, संतांची वाणी घेऊन येते, मनाला शांतता देणारे, माघ हृदयाला भेटे... या ओळी या महिन्याचे महत्त्व पटवून देण्यास पुरेशा आहेत. निसर्ग, संस्कृती, परंपरा आणि अध्यात्माचा सुंदर मिलाफ असणारा हा काळ प्रत्येकाने आनंदाने व्यतित करायला हवा. या महिन्यात विविध क्षेत्रांमधून भारतीय जीवनशैलीची संपन्नता प्रकर्षाने दिसून येत असल्यामुळे त्याची माहिती घ्यायला हवी. कदाचित यातूनच आपल्याला जगण्यातील नवनवीन पैलूंची ओळख होऊ शकते. त्यामुळेच केवळ साधू-संतच नव्हे, तर सामान्यजनदेखील या मासामध्ये माघस्नानाचा संकल्प पाळतात. पवित्र नद्यांमध्ये सूर्योदयापूर्वी स्नान करण्याची प्रथा आपापल्या ठिकाणच्या प्रवाहांमध्ये स्नान करत यथाशक्ती, यथाबुद्धी पाळली जाते. अगदी घरातही गंगा, यमुना, नर्मदा, गोदावरी आणि कावेरी यासारख्या पवित्र नद्यांचे नाव घेत स्नान केल्याने विशेष पुण्य लाभते, अशी श्रद्धा भाविकांमध्ये आहे. यामुळे पापांचे शमन होते आणि मोक्षप्राप्तीचा मार्ग सुकर होतो हा विचार त्यांना थंडीच्या कडाक्यातही थंड पाण्याने स्नानादी विधी करण्यास उत्तेजित करतो. शक्य असेल तेव्हा माघ महिन्यात त्रिवेणी संगमावर स्नान करण्यासाठी धाव घेणाऱ्या भाविकांची गर्दीही आस्थेच्या प्रतीकांचे दर्शन घडवून देते. या महिन्यात दानधर्म करणे अत्यंत शुभ मानले जाते. अन्नदान, वस्त्रदान, तूप, तांदूळ तसेच गव्हाचे दान या काळात फार महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळेच माघ मेळा किंवा माघी मेला या उत्सवांच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर दानधर्म केला जातो. यावेळी केलेली साधना, जप आणि ध्यान मनाच्या शांतीसाठी लाभदायक ठरते. विशेषतः एकादशीच्या दिवशी विष्णूची पूजा आणि जप-तप केल्याने त्याचा आशीर्वाद लाभतो, असे मानले जाते. हे सगळे सण केवळ धार्मिक दृष्टिकोनातून महत्त्वाचे नाहीत तर ते सामाजिक एकतेचा संदेशही देतात. ते शिक्षण, ज्ञान आणि संगीताचे महत्त्व अधोरेखित करतातच; खेरीज देशातील पवित्र नद्यांचे महत्त्व आणि जलसंपत्तीचे संरक्षण याबद्दलही जनजागृती करतात. गीतेतही माघ महिन्यातील योग-साधनेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. यातून मिळणारे अध्यात्म, साधना, आणि शिस्तबद्ध जीवनशैलीची शिकवण आयुष्यभर पुरणारी आणि जगण्याला आकार देणारी आहे. यावेळी केलेले प्रत्येक शुभकृत्य भविष्यासाठी लाभदायक ठरते ही भावनाच कार्यप्रवण करणारी ठरू शकते. 'तपस्यायां रतम् माघे, जीवने शुभं फलं' अर्थात, माघ महिन्यात केलेल्या तपस्येमुळे जीवनात शुभ फलाची प्राप्ती होते. त्यामुळेच जीवनातील विविध पैलूंची उंची गाठण्याचा काळ असणाऱ्या माघ महिन्याचे महत्त्व जाणायला हवे. साधनेत रमणे, दानधर्म करणे, सण-उत्सव साजरे करणे आणि निसर्गाचा आनंद घेणे ही या महिन्याची वैशिष्ट्ये पुढील पिढीपर्यंत पोहोचवायला हवी. चला तर मग, आपणही या महिन्याचे महत्त्व समजून घेत जीवनशैलीत सकारात्मक बदल घडवून आध्यात्मिक उन्नती साधू या...

निसर्ग व संस्कृती संपन्न ओरिसा (उत्कल) राज्यातील महाकवी बलरामदास यांनी पुरीच्या मंदिरात, भगवान जगन्नाथासमोर बसून लिहिलेले रामायण म्हणजे 'जगमोहन रामायण'. या रामायणाला 'दंडी रामायण' म्हणूनही ओळखले जाते. हे रामायण उडिया भाषेतील आदि महाकाव्य असून ते गोस्वामी तुलसीदासांच्या 'रामचरितमानस' आधीच्या काळातील आहे. स्वतःला 'मत्त कृपासिद्ध बलराम' म्हणवून घेणारा हा कवी उडियाचा 'राष्ट्रकवी'आहे. हे रामायण १ लाख ९० हजार ओव्यां (दंडी)चे आहे.

लेखांक ५७

ओरिसाचे 'जगमोहन रामायण'

...रघुनंदन
विद्याधर ताठे
भ्र.९८८१९०९७७५

सम्राट अशोकचा एकेकाळचा 'कलिंग' देश म्हणजे आजचे ओरिसा राज्य. 'उत्कल' अशा नावाने या प्रदेशाचा आपल्या राष्ट्रगीतात उल्लेख आहे. भारताला लाभलेल्या समुद्रकिनारी राज्यांपैकी एक सांस्कृती संपन्न राज्य. आपल्या विद्यमान राष्ट्रपती महामहीम द्रौपदी मुर्मू यांचे गृहराज्य. जगन्नाथ रथयात्रेमुळे जगप्रसिद्ध अशा ओरिसाला वैभवशाली भक्तीपरंपरा लाभलेली आहे. सनातन हिंदुंच्या 'चार धाम' तीर्थक्षेत्रांपैकी एक, 'श्रीक्षेत्र जगन्नाथ पुरी' ही ओरिसाची प्राचीन ओळख आहे. त्याशिवाय जगभरातील कलाप्रेमी पर्यटकांचे आकर्षणाचे केंद्रबिंदू असलेले 'कोणार्क सूर्य मंदिर' ओरिसाचा कलागौरव आहे. अशा ओरिसा उर्फ उत्कल उर्फ उडिया प्रदेशात १५ व्या शतकात 'जगमोहन रामायण' लिहिले गेले. या रामायणाला 'दंडी रामायण' म्हणूनही अनेकजण ओळखतात. उत्तर भारतात जसे 'तुलसी रामायण' प्रगाढ श्रद्धेचे निधान आहे तसेच ओरिसा मध्ये 'जगमोहन रामायण' तथा 'दंडी रामायण' लोकश्रद्धेचा-भक्तीचा मेरूमणी आहे. या रामायणाने उत्कल प्रदेशात भक्तीपंथाचा उत्कर्ष झाला व एका नव्या सांस्कृतिक मन्वंतराचा श्रीगणेशा झाला.

'जगमोहन रामायण' लिहिणार्या महाकवीचे नाव आहे संतकवी बाबा बलरामदास! (इ.स.१४७४-१५२२). 'जगमोहन' हे भगवान जगन्नाथाचे-प्रभू श्रीकृष्णाचेच एक विशेषनाम आहे. जगाला मोहून टाकणारा 'जगमोहन'! भगवान जगन्नाथाचे 'पाच प्रमुख सखा' म्हणून पाच वैष्णव कवींना ओरिसामध्ये विशेष मान व स्थान आहे. त्या 'पाच सखां'पैकी पहिले व प्रमुख सखा (मित्र) 'जगमोहन रामायण' कर्ते संतकवी बाबा बलरामदास आहेत. ही या कवीची अध्यात्मिक उंची व थोरवी आहे. कवी बलरामदास हे जन्माने शूद्र होते पण कर्माने-आचरणाने ब्राह्मण होते. साक्षात्कारी थोर ज्ञानोपासक विद्वान होते. त्यांनी भगवद् गीतेवर उडिया भाषेत सुलभ-सोपे भाष्य लिहून ब्रह्मविद्येची उडिया जनमानसात गंगा प्रवाहित केली. जे महान क्रांती कार्य तेराव्या शतकात महाराष्ट्र भूमीत संत तत्त्वज्ञ ज्ञानदेवांनी केले तसेच अपूर्व कार्य संतकवी बलरामदास यांनी ओरिसात केलेले आहे.

थोडक्यात कवी बलरामदास हे ओरिसाचे

'ज्ञानदेव- तुकाराम' यांच्यासारखे युगपुरुष आहेत. आणि एवढे असून ते 'दास' आहेत. हा इष्टदेवतेप्रतीचा दास्यभाव हीच त्याच्या भक्ती थोरवीची साक्ष आहे.

'जगमोहन' रामायणाला अनेक साहित्यिक-समीक्षक 'दंडी रामायण' म्हणून ओळखतात. 'दंडी' हा ओरिसा साहित्यातील एक प्रसादयुक्त छंद आहे. महाराष्ट्रातील अभंग-ओवी प्रमाणेच 'दंडी' एक काव्यविधा आहे. 'जगमोहन रामायण' हे 'दंडी' छंदात रचले असल्यामुळे त्या रचना वैशिष्ट्यावर या रामायणाला 'दंडी रामायण' म्हणून ओळखले जाते.

संतकवी बलरामदास यांना ओरिसामध्ये 'राष्ट्रकवी' मानले जाते. त्यांच्या प्रेरणेने ओरिसात पुढे अनेक कवींचा उदय झाला, म्हणून बलरामदासांना कवींचे कवी असे सर्वोच्च स्थान आहे. खर तर कवी बलरामदास हे भगवान जगन्नाथाचे म्हणजेच श्रीकृष्णाचे एकनिष्ठ भक्त आहेत. त्यांनी जगन्नाथ मंदिरात, जगन्नाथ विग्रहा समोरील मंडपात बसून हे रामाची स्तुती गाणारे रामायण लिहिले. या कृती मागील उदात्त व्यापक विचार, हा सनानत हिंदू 'अद्वैत' दर्शनाचा तत्त्वविचार आहे. ईश्वर एक आहे. राम, कृष्ण व अन्य सारी देव-देवतांची रूपे या एकाच ईश्वराची अनंत रूपे आहेत, असे ते 'अद्वैत' तत्त्व आहे. भक्ती आंदोलनातील सर्वच संतांनी 'अद्वैत' तत्त्वाचा प्रचार करीत सामाजिक ऐक्य समरसता निर्माण करण्याचे राष्ट्रीय कार्य केलेले आहे. कोणाही जीवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर पूजनाचे।

अशा बोधाचा उद्घोष करीत सकलसंतांनी हरि-हर भेद, सगुण-निर्गुण भेद, उंच-नीच भेद अशा सार्या भेदांना मूठमाती देण्याचे ऐतिहासिक कार्य कले, 'जगमोहन रामायण' लिहिणारे संतकवी बलरामदास त्यापैकी एक अग्रणी मानले जातात. ते स्वतःला कृपासिद्ध मत्तबलराम म्हणून घेण्यात धन्यता मानतात. मत्त म्हणजे वेडा. जगन्नाथ भक्तीचा वेडा आणि जगन्नाथांच्या कृपाप्रसादाने सिद्ध म्हणून 'कृपासिद्ध'. 'मत्त' आणि 'कृपासिद्ध' या दोन शब्दात 'दंडी रामायण'कार कवी बलरामदासांची थोरवी दडलेली आहे. मंदिर वास्तुरचनेमध्ये देवतेच्या गाभार्या पुढील मंडपाला 'जगमोहन' म्हटले जाते, ते या बलरामकवीचे चिरंतन स्मरण आहे.

१५ व्या शतकात राजा प्रतापरूद्र देव यांच्या दरबारी सन्मानित कवी बलरामदास यांचे 'जगमोहन रामायण' हे शिवपार्वती संवादरूप आहे. उडिया भाषेतील सर्वश्रेष्ठ महाकाव्य असलेल्या या रामायणात ७ कांडे आहेत. आणि तब्बल १ लाख ९० हजार एवढी प्रचंड संख्येत दंडी (ओव्या) आहेत. एका दंडीत १४ अक्षरे असणारे हे वृत्त आहे. वाल्मिकी रामायणातील पुत्रकामेष्टी यज्ञापासून जगमोहन रामायणाचा श्रीगणेशा होतो. हे रामायण मुद्रित झाले असून ८०० ते १००० पानांचे ७ खंड आहेत. धर्मांध यावनी अत्याचार सोसलेल्या व पाहिलेल्या कवी बलरामदासाने त्या अनुभवाद्वारे जगमोहन रामायणातील 'युद्ध कांड' खूप सविस्तरपणे लिहिले आहे. राम-रावणाच्या युद्धाचे वीररस परिलुप्त वर्णन योध्या रघुवीराचे उत्कट भव्य दिव्य दर्शन आहे. हे 'जगमोहन रामायण' गोस्वामी तुलसीदासांच्या 'रामचरित मानस' रामायणा आधीचे आहे.

जगमोहन रामायण पढे, कहे, सुने।
हनुमान स्वयं दौडे चले आये।।

जगमोहन रामायणामध्ये आदिकांड, अयोध्याकांड, वनकांड, किष्किंधाकांड, सुंदरकांड, युद्धकांड आणि उत्तरकांड नावाची ७ कांडे आहेत. जगमोहन रामायणावर अनेक भाष्य ग्रंथ, संक्षिप्त संकलन ग्रंथ, टीका ग्रंथ आहेत.

'जगमोहन रामायण'कार कवी बलरामदास यांना फक्त ४८ वर्षाचे आयुष्य लाभले. त्यांच्या नावावर लक्ष्मीपुराण, गुप्त गीता (वेदांत सार), अमरकोश गीता, श्रीमद्भगवद् गीता, विराट गीता, गरुड गीता, अनंत गीता, उद्धव गीता, लिंग पुराण, ब्रह्म पुराण अशी विपुल ग्रंथसंपदा आहे. महाकवी बलरामदास हे ओरिसाचे वाल्मिकी ऋषीच आहेत.

।। जय श्रीराम।।

रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

(भाग ३३)

(रवींद्रनाथांची पत्रे...)

थोडं मनातलं
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

रवींद्रनाथ यांनी आपल्या सुमारे ८० वर्षांच्या प्रदीर्घ आयुष्यात अनेक पत्रे लिहिली. त्यांचा जनसंपर्क अतिशय दांडगा होता आपल्याला हे वाचून आश्चर्य वाटेल की त्यांच्या पत्रांचे १२ खंड प्रकाशित झाले आहेत. जेवढी पत्रे त्यांनी अति महत्त्वाच्या व्यक्तींना लिहिली, आहेत तेवढीच पत्रे सर्वसामान्य व्यक्तींना आणि अगदी लहान मुलांना देखील लिहिली. त्यांची पत्रे सामाजिक, राजकीय, कौटुंबिक आणि व्यक्तिगत अशा अनेक प्रकारांमध्ये मोडतात.

रवींद्रनाथांच्या साहित्यामध्ये आपल्याला वास्तवता आणि कल्पकता यांचे सुंदर मिश्रण आढळते. परंतु वास्तवता हे त्यांच्या साहित्यातील प्रमुख वैशिष्ट्य आहे. तेच वैशिष्ट्य त्यांच्या पत्रांमध्ये देखील आपल्याला आढळते. पण पत्र लेखनात सुद्धा वास्तवतेची कास धरताना त्यांनी सत्य आणि सुंदर ही मूल्ये जपली आहेत. त्यांचे साहित्य मग ते कथा, कविता, नाटक किंवा कादंबरी कोणतेही असो आजही ताजे वाटते. तसेच त्यांची पत्रे देखील आजच्या परिस्थितीत सुद्धा आपल्याला कालसुसंगत वाटतात आणि मार्गदर्शक ठरतात.

रवींद्र नाथांना नोबेल पुरस्कार मिळाला आणि विश्वकवी म्हणून ते मान्यता पावले. त्यानंतर तत्कालीन माध्यमांनी त्यांच्या पत्रांना भरभरून प्रसिद्धी दिली. रवींद्रनाथ कितीही व्यस्त असले तरी पत्रलेखन स्वतः करीत. जेवढ्या गांभीर्याने ते राजकीय व्यक्तींना पत्र लिहीत, तेवढ्याच गांभीर्याने आणि आपुलकीने एखाद्या लहान मुलीला देखील पत्र लिहून तिच्याशी संवाद साधत.

रवींद्रनाथ आपल्या वागण्या बोलण्याने समोरच्या व्यक्तीला कायमचे आपलेसे करून घेत असत. त्या व्यक्तींमध्ये चांगले गुण शोधून त्याची तारीफ करीत असत. त्यामुळे प्रत्येकाला रवींद्रनाथांशी आपले संबंध असावेत, त्यांच्याशी आपली ओळख असावी असे वाटत असे आणि एकदा त्यांच्या संपर्कात आलेला माणूस कायमचा त्यांच्याशी जोडला जात असे.

देश विदेशातील नेते, मित्र, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, कलाकार, साहित्यिक, शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर आणि सामान्यातील सामान्य माणसे सुद्धा त्यांच्या मित्र परिवाराचा एक भाग होते. अशा विविध व्यक्तींना ते पत्र लिहीत असत किंवा त्यांच्या पत्रांना न चुकता उत्तरे देत असत. 'भानूसिंहेर पत्रावली, 'पथे वो पथेर पांत्रे', 'चिठ्ठीपत्र' 'छिन्नपत्र' या आणि इतर नावाने त्यांचे पत्रसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांनी आपली पत्नी मृणालिनी देवी यांना लिहिलेली पत्रे चिठ्ठीपत्र या संग्रहात आहेत.

आपली पुतणी इंदिरा चौधरी हिला तसेच राणी मुखर्जी या लहान मुलीला लिहिलेली पत्रे देखील प्रसिद्ध आहेत. त्यांच्या पत्रांमधील बरीचशी पत्रे त्यांनी आपले जमीनदारीचे काम शिलाइदह येथे राहून करीत असताना लिहिली आहेत. अशी त्यांची अनेक प्रकारची प्रक्रिया असली तरी प्रामुख्याने त्यांच्या पत्रांचे वर्गीकरण औपचारिक आणि व्यक्तिगत अशा प्रकारे केले जाते.

स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेसमध्ये वैचारिक मतभेद निर्माण होऊन दोन गट पडले. या दुफळीने रवींद्रनाथ उद्विग्न झाले होते. त्यांनी त्यावेळी प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. जगदीश चंद्र बोस यांना १९०८ मध्ये लिहिलेले हे पत्र काही संदर्भ वगैर तर आजच्या परिस्थितीत सुद्धा जसेच्या तसे लागू पडते. ते आपल्या पत्रात म्हणतात, (काँग्रेसमधील) उभय पक्ष आता एकमेकांवर आरोप- प्रत्यारोप करण्यात दिवस रात्र मग्न झाले आहेत.

फाटाफुटीच्या जखमांवर उभयपक्षांकडून व्यवस्थित मीठ चोळले जात आहे. कोणीही झाले गेले विसरायला तयार नाही आणि कोणी कोणाला क्षमा करायला तयार नाही. आत्मीयतेला परके बनवण्याच्या म्हणून ज्या ज्या तऱ्हा आहेत, त्या-त्या सार्यांचे अवलंबन होते आहे. राजसत्तेबद्दल असंतोषाच्या, क्रोधाच्या, रोषाच्या वार्याची दिशा आता बदलली आहे. स्वतःच्या घराला आग लावून ती अधिकाधिक भडकवण्याकडे त्या वार्याचा उपयोग होत आहे.

'वंदे मातरम' पत्रात स्वातंत्र्याच्या अभयमंत्राने भरलेले चैतन्यपूर्ण लिखाण आजवर आढळायचे पण कित्येक दिवसात तसे वाचायला मिळाले नाही. अथपासून इतीपर्यंत भांडणाच्याच हकीकतीने आजकाल ते भरून गेलेले आढळते. आतापर्यंत देशात दोनच पक्ष होते. आता जहाल, मवाळ व मुसलमान असे तीन पक्ष झाले आहेत. आणखीही एक चौथा पक्ष आहे. गव्हर्मेंट हाऊस मध्ये बसून उपहासाने हसणाऱ्याचा.

भाग्यवानांचा भार भगवान वाहत असतो. आम्हाला नष्ट करायला दुसऱ्या कोणाची आता जरुरी नाही. मोर्लेचीही नाही किंवा किचनेरचीही नाही. स्वतःचा स्वतःच व्यवस्थित नाश करून घेणार आम्ही! 'वंदे मातरमचा' घोष करत आम्ही परस्परांना जमीन दोस्त करणार. हे त्यांचे पत्र पुरेसे बोलके आहे आणि त्यातील बराचसा मजकूर आजही लागू पडतो. (क्रमशः)

जलवायू परिवर्तनामुळे जगभर शेतीमालाचे उत्पादन घटत आहे. एकरी उत्पादकतेत घट हे आता जगासमोरील मोठे आव्हान आहे. या आव्हानाला वेळीच तोंड देऊन रास्त उपाय योजणे ही काळाची गरज आहे. अशा परिस्थितीमध्ये काही प्रयोग हवामान बदलातही शेतीची उत्पादकता वाढवत आहेत, ही आशेची बाब आहे. या प्रयोगांची व्याप्ती वाढविण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.

हवामान बदलात उत्पादन वाढविण्याचे तंत्र

पर्यावरण
मिलिंद बेंडाळे

हवामान बदलामुळे कृषी उत्पादनात घट होत आहे. भारताची लोकसंख्या अंदाजे दीड अब्ज आहे. आता तो जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनला आहे. त्यामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचे शोषण करण्याचा दबावही वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशातील अन्नधान्याची मागणीही वाढली आहे. कारण भारत हा नैसर्गिक विविधता असलेला देश आहे. अशा परिस्थितीत आपण आजही देशातील सव्वाशे कोटी जनतेला पुरेल इतके अन्नधान्य उत्पादन करण्यास सक्षम आहोत; परंतु गेल्या दोन-तीन दशकांत हवामान चक्रात झपाट्याने होत असलेल्या बदलांमुळे शेती आता धोक्यात आली आहे. देशाच्या ज्या भागांमध्ये जून महिन्यात मान्सून सक्रिय असायचा, त्या भागात मान्सून उशिरा सुरू झाल्यामुळे पावसावर अवलंबून असलेल्या पिकांचे उत्पादन झपाट्याने घटले आहे.

पावसाचे प्रमाण कमी होत असतानाच शरद ऋतूतील कमी थंडीमुळे रबी हंगामातील पिकांचे उत्पादन घटले आहे. देशातील केवळ सपाट भागालाच हवामान बदलाचा धोका नाही, तर त्याचा थेट परिणाम डोंगराळ आणि थंड प्रदेशातही दिसून येत आहे. २०२३ मध्ये हिमाचल प्रदेशातील अतिवृष्टीमुळे येथील अनेक जिल्हे पूर्णपणे उद्ध्वस्त झाले होते. आजही देशाची ७० टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे; परंतु हवामान बदलाचे आव्हान, रोजच्या जीवनासाठी संघर्ष आणि व्यस्त दिनचर्या लोकांसाठी गांभीर्याचा विषय बनत नाही. समुद्राच्या वाढत्या पातळीमुळे बाधित किनाऱ्यावरील किंवा बेटावरील भागातील लोक, असामान्य पावसाने किंवा जलसंकटाने त्रस्त झालेले शेतकरी, विनाशकारी समुद्री वादळांचा नाश सहन करणारे किनारपट्टीचे रहिवासी, दुष्काळ आणि पुराच्या भीषण परिस्थितीशी झगडणारे लोक, असामान्य हवामानामुळे होणाऱ्या विचित्र आजारांनी ग्रस्त असलेले लोक असोत की विनाशकारी पुरात त्यांची घरे आणि सर्वस्व गमावलेले लोक; ते संकटामुळे इतर भागात स्थलांतरित होतात. या सर्व लोकांना हवामान बदलाचा फटका बसत आहे. तापमानात वाढ झाल्यामुळे मातीची आर्द्रता आणि पाणी धरून ठेवण्याची क्षमता कमी होत आहे, यामुळे जमिनीतील क्षारता वाढून जैवविविधता कमी होत आहे. दुष्काळ, पूर, भूस्खलन, ढगफुटी आदींमुळे जमिनीची नासाडी होत आहे. हवामानातील बदल आणि तापमानातील वाढ यामुळे पिकांवर कीड आणि रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे.

तापमानवाढीमुळे पिकांचे नुकसान करणाऱ्या कीटकांची प्रजनन क्षमता झपाट्याने वाढत आहे आणि कीटकांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी अत्याधिक कीटकनाशकांच्या वापरामुळे लोकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. हवामानातील बदल आणि तापमानात झालेली वाढ यामुळे पाणीपुरवठ्याच्या समस्या तसेच पूर आणि दुष्काळ वाढला आहे. कोरड्या हंगामात लांबलेला पाऊस आणि पावसाची अनिश्चितता यांचाही पीक उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ लागला आहे. जलस्रोतांच्या शोषणामुळे आणि हवामान बदलामुळे भूजलाचा ऱ्हास होत आहे. सध्या पृथ्वीवर १४० कोटी घनमीटर पाणी आहे. यातील ९७ टक्के खारे पाणी समुद्रात आहे. मानवासाठी फक्त तीन टक्के पाणी शिल्लक आहे. हवामान बदलाचा केवळ पीक उत्पादनावरच परिणाम होत नाही, तर त्याचा जनावरांवरही विपरीत परिणाम होऊ लागला आहे. तापमानवाढीचा थेट परिणाम जनावरांच्या दुग्धोत्पादन आणि प्रजनन क्षमतेवर होत आहे. असा अंदाज आहे की, तापमान वाढत राहिल्यास २०५० पर्यंत १५० दशलक्ष टन दूध उत्पादनात घट होऊ शकते. याशिवाय, संकरित गायी (०.६३ टक्के), म्हैस (०.५० टक्के) आणि स्थानिक जाती (०.४० टक्के) मध्ये सर्वात जास्त घट होईल. कारण संकरित प्रजाती उष्णतेबाबत कमी सहनशील आहेत. त्यामुळे त्यांची प्रजनन क्षमता आणि दूध उत्पादन कमी होईल. हवामान बदलाचा परिणाम देशी प्राण्यांवर कमी दिसून येईल. हवामानातील बदल कमी करण्याआधी, त्याचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी आपल्याला उपाययोजनांचा विचार करावा लागेल. यासाठी शेतात पाणी व्यवस्थापन, सेंद्रिय, नैसर्गिक आणि एकात्मिक शेतीला प्रोत्साहन, पीक उत्पादनाचे शाश्वत आणि नवीन तंत्रज्ञान विकसित करणे, पीक संयोजनात बदल, शेतीच्या पारंपरिक पद्धतींना प्रोत्साहन देऊन हवामान बदलाचे दुष्परिणाम कमी करता येतील.

हवामान चक्रातील बदलांना संबोधित करण्यासाठी शाश्वत शेती आणि जमीन वापर व्यवस्थापनावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. त्यात कृषी पद्धतींमध्ये बदल समाविष्ट आहेत. जसे की मांसाचा वापर कमी करणे, पुनरुत्पादक शेतीचा अवलंब करणे, ओलसर जमीन राखणे आणि गवताळ प्रदेशांचे संरक्षण करणे. मातीची सुपीकता कमी होत असताना आणि हवामानातील बदलांमध्ये शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आणि कृषी उत्पादकता टिकवणे हे सर्वात मोठे आव्हान आहे. जगातील फक्त ४ टक्के ताजे पाणी असलेला भारत जगातील १७ टक्के लोकसंख्येला आधार देतो. ७०-८० टक्के पाणी शेतीसाठी वापरले जात असल्याने हे संकट अधिकच गडद झाले आहे. हवामानातील बदल, अनियमित पर्जन्यमान आणि वाढती लोकसंख्या यामुळे पाणी व्यवस्थापनाच्या समस्या वाढल्या आहेत आणि कृषी यंत्रणांसमोर पाण्याची उच्च मागणी आणि जमिनीची सुपीकता कमी होण्याची आव्हाने आहेत. या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी, भारतीय कृषी अनुसंधान विभागाच्या पाटणा येथील कार्यालयाने 'मल्टिपल यूज ऑफ वॉटर' (एमयूडब्ल्यू) मॉडेल विकसित केले आहे. ते जल व्यवस्थापन आणि शेतीच्या शाश्वततेला चालना देण्याचा एक प्रभावी मार्ग आहे. मृदा आणि जल व्यवस्थापन विभागाचे प्रमुख डॉ. आशुतोष उपाध्याय यांच्या मते, 'एमयूडब्ल्यू' मॉडेल हे हवामानाला आणि पर्यावरणास अनुकूल मॉडेल आहे. ते जलसंवर्धन, भूजल पुनर्भरणास मदत करते. त्यात पाणी आणि खतांचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी ठिबक आणि तुषार सिंचन, फर्टिगेशन आणि संसाधन संवर्धन तंत्रांचा समावेश आहे. या मॉडेलमध्ये, मत्स्य पालन, बदक पालन, मशरूम उत्पादन आणि कृषी-जलीय शेतीच्या जमिनीची रचना वापरून पीक पद्धतीमध्ये विविधता आणण्यात आली आहे. त्यामुळे शेतकरी केवळ भात आणि गहू यावर अवलंबून राहत नाहीत. पाणी व्यवस्थापन सुधारण्यासाठी 'एमयूडब्ल्यू मॉडेल' हा एक प्रभावी उपाय आहे. यामध्ये जलसंचय, भूजल पुनर्भरण आणि स्मार्ट वॉटर मॅनेजमेंट तंत्रांचा समावेश आहे. त्यामुळे जास्तीत जास्त पाणी बचत करण्यात मदत होते. ठिबक आणि तुषार सिंचन यांसारख्या आधुनिक सिंचन तंत्राद्वारे पाणी वापर कार्यक्षमता वाढविण्यात आली आहे. याशिवाय जमिनीची सुपीकता सुधारली आहे. पिकांच्या अवशेषांचे पुनर्वापर आणि कंपोस्टिंग हादेखील या मॉडेलचा एक भाग आहे. त्यामुळे मातीचे आरोग्य राखण्यास मदत होते. शेत तलावातील माशांच्या जाती काळजीपूर्वक निवडल्या जातात आणि त्यांच्या वाढीच्या दरावर लक्ष ठेवले जाते. बदक पालनामुळे मत्स्य पालनासाठी पाण्याची गुणवत्ता राखण्यास मदत होते तसेच बदकांच्या अंडी उत्पादन आणि मांस उत्पादनातून शेतकऱ्यांना नफा मिळतो. या मॉडेलमध्ये मातीची रचना सुधारण्यासाठी बेड तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. त्यामुळे पाणी व्यवस्थापन सुधारते आणि मातीची आर्द्रता टिकवून ठेवते.

(पान ६ वर)

ग्रहसंकेत

(रविवार, ९ फेब्रुवारी ते शनिवार, १५ फेब्रुवारी २०२५)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

* **रविवार, ९ फेब्रुवारी-** भीष्मद्वादशी, गोंदवलेकर महाराज जयंती, भगवानगिरी महाराज भंडारा करंजवडे, मायाक्कादेवी यात्रा ढालगाव, पूर्णानंद महाराज पुण्यतिथी भोगनोळी * **सोमवार, १० फेब्रुवारी-** सोमप्रदोष, कल्पादि, विश्वकर्मा जयंती, श्री दत्त उत्सव भोगनोळी, रघुनाथ महाराज पुण्यतिथी खटाव, श्री भैरवनाथ जागर किसरूळेप * **मंगळवार, ११ फेब्रुवारी-** अंबाखेळती देवी यात्रा बोपोली, श्रीनाथ म्हस्काबा यात्रा वीर, महासिद्ध यात्रा भंडारकवठे, देव काज्रोबा जत्रा केरी- पेडणे * **बुधवार, १२ फेब्रुवारी-** माघ स्नान समाप्ती, संत रोहिदास जयंती, कुलधर्म, खंडोबा शिखराठी यात्रा जेजुरी, वाघजाई यात्रा दिंडोरी, गुरु रवींद्रनाथ जयंती, रेणुका यात्रा सौदंत्ती, श्री दत्त नवरात्रोत्सव समाप्ती, रेवणसिद्ध यात्रा उंब्रज, रथ यात्रा मंगेशी गोवा * **गुरुवार, १३ फेब्रुवारी-** गुरु प्रतिपदा, गाणगापूर यात्रा चार दिवस, नृसिंह सरस्वती श्री शैल्य यात्रा गमन, प्रभाकर महाराज पुण्यतिथी सोलापूर, निरंजन नाम सप्ताह शिंपेवाडी, चन्नबसवेश्वर रथोत्सव उळवी, जान्हवीदेवी यात्रा एरंडोली, केदारनाथ यात्रा केळोली, भैरवनाथ यात्रा अपशिंगे, संत निवृत्तीनाथ जयंती * **शुक्रवार, १४ फेब्रुवारी-** कालभैरवनाथ यात्रा गडहिंग्लज, भैरवनाथ यात्रा नुने (सातारा), गुरूनाथ बाबा दंडवते जयंती पुणे * **शनिवार, १५ फेब्रुवारी-** संत नरहरी सोनार पुण्यतिथी, गुरु सेवालाल महाराज जयंती (बंजारा), जानुबाई देवी यात्रा राजापूर, लोकनाथ स्वामी पुण्यतिथी पुणे, जनणीदेवी यात्रा आपटी.

मुहूर्त:- * **साखरपुडा-** १३ फेब्रुवारी * **डोहाळ जेवण-** १०, ११ फेब्रुवारी (१९ पर्यंत) * **बारसे-** १० फेब्रुवारी (१९ पर्यंत) * **जावळ-** १० फेब्रुवारी * **गृहप्रवेश-** १० फेब्रुवारी

मेष :- समाधान वाढेल

सप्ताहारंभी कर्मस्थानी रवी- बुधाची होणारी युती कार्यक्षेत्रात अपेक्षित प्रगती करणारी आहे. आर्थिक समस्यातून मार्ग निघाल्याने समाधान वाटेल. ज्ञानदान, बँक, विमा क्षेत्रात चांगल्या संधी लाभतील. फार विचार करीत बसू नका. कार्य करा, निश्चित चांगले फल प्राप्त होईल. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. १०, १२

वृषभ:- नव्या विचारांना चालना

भाग्यस्थानी रविवारी होणारी रवी- बुधाची युती अनुकूलता वाढविणारी आहे. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. कार्यक्षेत्राबाबत चिंता करीत बसू नका. नव्या विचारांना चालना मिळेल. बोलून वादाचे प्रसंग वाढवू नका. आत्मविश्वास वाढीस लागेल. अपेक्षित कामे घडतील. शुभ ता. ९, ११, १४

मिथुन:- नव्या कामांना गती

राशीतील वक्री मंगळामुळे उत्साह तसेच उतावीळपणाही वाढेल. आर्थिक व्यवहार विचारपूर्वक करावेत. उत्तरार्धात रवि- बुध भाग्यस्थानी येत आहेत. समस्यातून मार्ग निघत जाईल. नव्या कामांना गती मिळेल. धार्मिक, सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. स्थावर प्रश्न वाढवू नका. जुने येणे वसूल करण्यासाठी प्रयत्न करा. कोणत्याही बाबतीत फार आग्रही भूमिका ठेवू नका. शुभ ता. ११, १४

कर्क:- अडचणीवर मात कराल

सप्तमात रविवारी रवी बुधाची भीती होत आहे. नोकरीत सहकार्यांचे चांगले सहकार्य लाभेल. आर्थिक समस्या राहिल्या, तरी मार्ग निघत जाईल. सप्ताह उत्तरार्धात नवीन जबाबदारी स्वीकारू नका. कौटुंबिक जीवनात समाधान लाभेल. प्रकृतीच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करू नका. दूरचे प्रवास टाळावेत. गुंतवणूक विचाराने करावी. शुभ ता. १३, १४

सिंह:- अपेक्षित घटना

षष्ठ स्थानात रवि- बुधाची होणारी युती कार्यक्षेत्रात शुभ फलदायी ठरेल. अपेक्षित घटना घडल्याने समाधान वाटेल. आर्थिक कामे झाल्याने समाधान वाटेल. नव्या संधी लाभणार आहेत. अपेक्षित कार्यसिद्धी होईल. अडचणींवर मात कराल. नव्या विचारांना चालना मिळेल. भागीदारीच्या व्यवसायात अधिक लक्ष घालावे. नव्या ओळखी लाभप्रद ठरतील. शुभ ता. ११, १३

कन्या:- उष्णतेपासून त्रास

पंचमात होणारे रवि- बुधाची युती आर्थिक बाबतीत समाधानकारक राहील. कार्यक्षेत्रातील निर्णय विचाराने घ्यावेत. उष्णतेपासून त्रास संभवतो. काळजी घ्यावी, धार्मिक सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. अडचणींची चिंता नको. मार्ग निघत जाईल. नव्या ओळखी पारखून स्वीकारा. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. वादाचे प्रसंग टाळावेत. शुभ ता. ११,१२

तुला:- दगदग टाळावी

सुखस्थानी रवि- बुधाची युती होत आहे. स्थावर प्रश्न मार्गी लागेल. जुने येणे वसूल करून घ्यावे. नव्या कामांना गती मिळेल. नव्या संधीचे स्वागत करावे. सप्ताह उत्तरार्धापासून अनुकूलता वाढेल. उपासना घडेल. अडचणीवर मात कराल. दुसर्यावर फार विसंबून राहू नका. दगदग टाळावी. शुभ ता. ९, ११

वृश्चिक:- प्रकृतीच्या तक्रारी

पराक्रम स्थानी होणारे रवि- बुधाची युती उत्साहवर्धक घटना घडविणारी आहे. महत्त्वाची कामे पूर्वार्धात करून घ्यावीत. प्रकृतीच्या तक्रारी संभवतात. कौटुंबिक जीवनात समाधानकारक घटना घडतील. अंगीकृत कार्यात मनासारख्या घटना घडतील. दैनंदिन व्यवहारात विशेष लक्ष घालावे. अडचणीतून मार्ग निघत जाईल. शुभ ता. १२, १४

धनु:- सामंजस्य ठेवावे

धनस्थानात रवि- बुधाची युती होत आहे. आर्थिक प्रगतीच्या योजना मार्गी लावता येतील. सामंजस्य ठेवले तर कार्यहानी टाळता येईल. प्रशासन सेवेत असणार्यांना विशेष चांगला कालावधी आहे. संततीच्या हितसंबंधाकडे अधिक लक्ष द्यावे. अडचणीवर मात कराल. कौटुंबिक जीवनात स्वमतग्रह टाळावा. अन्यथा वाद वाढतील. कार्यक्षेत्रात प्रगती घडेल. चिंता नको. शुभ ता. १४

मकर:- नव्या कामांना गती

रविवारी राशीतच रवि- बुधाची युती होत आहे. त्यामुळे अंगीकृत कार्यात समाधानकारक यश मिळेल. रेंगाळलेले व्यवहार मार्गी लागतील. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. नव्या कामांना गती मिळेल. संतती संबंधात शुभ घटना घडतील. नव्या विचारांना चालना मिळेल. प्रगतीच्या घटना घडतील. शुभ ता. १०, १२

कुंभ:- कुचुंबणा दूर होईल

सप्ताह उत्तरार्धापासून मनासारखी प्रगती होईल. सप्ताहारंभी महत्त्वाची कामे विचाराने करावीत. चिकाटीने केलेली कामे अपेक्षित फलप्राप्ती मिळवून देणारी आहेत. प्रगतीचा टप्पा गाठता येईल. नव्या विचारांना चालना मिळेल. संततीशी मतभेदाचे प्रसंग टाळावेत. नव्या संधी लाभतील. प्रगतीचा मार्ग खुला होईल. कुचंबणा दूर होईल. शुभ ता. ९, १२

मीन:- निश्चित राहावे

धनस्थानी रवि- बुधाची युती होत आहे. त्यामुळे आर्थिक बाबतीत समाधानकारक घटना घडतील. महत्त्वाचे व्यवहार स्वतः लक्ष घालून मार्गी लावावेत. चांगल्या कार्यसिद्धीसाठी अधिक परिश्रमाची गरज भासेल. अडचणी आल्या तरी त्यातून मार्ग निघत जाईल. चिंता करू नका. फार दगदग करू नका. निश्चित राहावे. शुभ ता. ११, १४

!! शुभ भवतु !!

आम्लपित्त: कारणे व उपाय

वर्षादी ऋतुत स्वकारणांनी साचलेले पित्त नासते. त्याला आम्लपित्त असे म्हणतात. याचे वातज, पित्तज आणि काकवातज असे तीन प्रकार आहेत.

आजीचा बटवा
नारायण कारंजकर
भ्र. ९४२३७५८४०१

कारणे:-
विरुध्दान्न, आंबलेले अन्न, आंबट, दाह करणारे, पित्त वाढविणारे, अशा अन्नपानाचे सेवन केल्याने आम्लपित्त होते.

लक्षणे:-
अन्न न पचणे, घशाशी जळजळणे, मळमळ सुटणे, कडू व आंबट ढेकर येणे, अंग जड होणे, अन्नद्वेष होणे इत्यादी लक्षणे दिसतात. यांचे अधोगत आणि उर्ध्वगत असे दोन भेद आहेत.

अधोगत आम्लपित्ताची लक्षणे:-
तृषा, दाह, मोह, मूर्च्छा, घेरी, मळमळ, अंगाला गांधी, कानाला घाम, अग्निमांद्य, अंगास पिवळटपणा ही लक्षणे दिसतात. मुखावाटे काळे, तांबडे, दुर्गंधीयुक्त असे अनेक वर्णाचे पित्त पडते.

उर्ध्वगत अम्लपित्ताची लक्षणे:-
हिरवे, पिवळे, काळे, निळे, तांबूस, लाल, अत्यंत आंबट, बुळबुळीत व कफ निश्चित, स्वच्छ, खारट, तुरट इत्यादी रस असे पित्त मुखावाटे वांतीरुपाने पडते कधी कधी जेवलेले अन्न विदग्धावस्थेत आले असता अथवा जेवणापूर्वी कडू, आंबट अशी ओकारी होते. ढेकरही तशीच येते. गळा, कारव व ऊरही जळजळते, डोके दुखते इत्यादी लक्षणे दिसतात.

साध्यासाध्य विचार:-
हा विकार नवा असला तर प्रयत्नाने साध्य होतो. फार दिवसाचा असला तर कष्टसाध्य होतो आणि पथ्याने वागणाऱ्या मनुष्याचा आम्लपित्त रोग फार दिवसाचा जरी असला तरी प्रयत्नाने साध्य होतो.

विशेष सूचना:-
आम्लपित्तावर उपचार करताना फार विचारपूर्वक औषधे द्यावीत. दोष जवळच्या मार्गाने बाहेर काढावेत. यासाठी योग्य तो वमन विरेचन क्रिया करावी. कोष्ठशुध्दी झाल्यावर मग विचारपूर्व औषध योजना करावी.

आम्लपित्तावर उपाय:-
(१) बेलाच्या पानाचा रस दोन तोळे (सुमारे २० ग्रॅम) काढून त्यात खडीसाखरेची पूड घालून द्यावी. ४२ दिवस.
२) पळसपापडी व सुंठ १-१ मासा घेऊन तुपात भाजून त्यात पाव खडीसाखरेची पूड घालून संध्याकाळ ७ दिवस द्यावा.
३) मूठभर हरभऱ्याची डाळ संध्याकाळी पावशेर पाण्यात भिजत घालावी. सकाळी ती डाळ खाऊन अर्धे पाणी प्यावे.
४) शतावरी (दिवस मावळी) चा रस ४० तोळे, तूप ४० तोळे, दूध ४० तोळे सर्व कढवून तूप शिल्लक राहिले म्हणजे गाळून ठेवावे. रोज दोन वेळा १-१ तोळा तूप, खडीसाखरेची पूड घालून घ्यावे. हे औषध १४० तोळे द्यावे. तिखट, तेलकट व आंबट पदार्थ वर्ज्य करावे,
५) कावळीच्या मुळीची साल ३ मासे, विड्याच्या पानाच्या रसातून खावी. ७ ते १० दिवस.
६) तखडाच्या सालीचा रस ३ तोळे घ्यावा व तो खडीसाखरेची पूड घालून सात दिवस खावा.
७) लवंगा १ भाग, ज्येष्ठमध ५ भाग, वेलचीदाणे २ भाग व तवकीर ४ भाग याप्रमाणे जिन्नस घेऊन त्याचे चूर्ण करावे. दरवेळी ७ ते १४.
८) मिरे, सैंधव, खडीसाखर, कडुनिंबाच्या झाडाची फुले सर्व एकत्र वाढून रोज अर्धा तोळा या प्रमाणे ७ दिवस खावे.
९) काळे तीळ व ओवा दोन्ही कुटून सकाळ-संध्याकाळ २-२ तोळे खावे.
१०) दोन घोट पाणी कल्हईच्या पात्रात घेऊन त्यात दोन चिमटी बारीक मीठ घालून रात्री निजतेवेळी उशाशी ठेवावे. एक झोप होताच पिऊन पुन्हा झोपावे. दिवस १४ ते २३. पथ्य दूधच प्यावे.
११) कागदी लिंबाचा रस ५ तोळे, खडीसाखर ५ तोळे, टाकण खार लाही १ ग्रॅम, गुळवेलीचे सत्व अर्धा ग्रॅम सर्व एकत्र शिजवून अवलेह करून ठेवावा. दरवेळी १ तोळा याप्रमाणे घ्यावा.
१२) सोनभाव गाईच्या दुधात ३ दिवस, विड्याच्या पानाच्या रसात ३ दिवस खलून गजग्या एवढ्या गोळ्या करून ठेवाव्या. दरवेळी १ गोळी पाण्यातून घ्यावी दिवस ७-१४-२१.
१३) हत्तीच्या लिदीची राख १ तोळा घेऊन ती मधातून घ्यावी.
१४) नुसता लाकडी कोळसा घेऊन पूड करून अर्धातोळा पूड पाण्यात कालवून प्यावी.
१५) पेपरमिटाचे तेल ३ ते ५ थेंब साखरेतून द्यावे.
१६) जेवण झाल्यावर घशात जळजळते त्यास शंख भस्म दोन गुंजा लिंबू रसातून द्यावे.
१७) कच्ची तुरटी १ मासा, खडीसाखर दोन मासे घालून रोज खावी ३ ते ७ दिवस
१८) रोज सकाळी २ ग्रॅम पिंपळीचे चूर्ण मधातून खावे. दिवस ७.
१९) सोन्याचा वर्ख अर्धेपान, तूप १ तोळा, मध २ तोळे सर्व एकत्र करून द्यावे. दिवस २१.
२०) मोरचूदाची लाही अर्धा गुंज याप्रमाणे मधातून द्यावी.

आम्लपित्तास पथ्य:-
वमन, विरेचन, जुन्या साळीचा भात, मुगाचे वरण, गव्हाची चपाती, जव, तापवून निवलेले पाणी, साखर, करतेली, कारली, चाकवत, पडवळ, तांदुळजा यांच्या भाज्या, आवळे पिकलेले कवठ, डाळींब, मनुका, खजूर, गाईचे दूध, तूप, महाळुंग, लिंबू, द्राक्षे, अवळकाठी इत्यादी.

आम्लपित्तास अपथ्य वांतीचा वेग धारण करणे, तेल, तिखट, आंबट, खारट असले पदार्थ, सर्व प्रकारचे जडान्न, दही, पांढर्या तुरी, मध, हुलगे, शेळीचे दूध, तीळ, उडीद, ऊन घेणे, शेकणे, केळफूल, मीठ, अति उष्ण पदार्थ इ. वर्ज्य करावे.

पान २ वरून

धर्म रक्षावयासाठी। करणे आटी आम्हासी।।

आपल्या अभंग वाङ्मयातून सामाजिक व कौटुंबिक नीतिमूल्यांचा पुरस्कार करतात. बहतां जन्मा अंती। जोडी लागली हे हाती।। मनुष्य देहा ऐसा ठाव। धरी पांडुरंगी भाव।। बह केला फेरा। येथे सापडला थारा।। तुका म्हणे जाणे। ऐसे भले ते शाहाणे।। (तु. गा. १३५०) नाशिवंत देह एक दिवस जाणार असल्याने प्रत्येक मनुष्याने सत्कर्म करण्याची व देवाला आठवण्याची हीच खरी वेळ आहे.

क्षणाक्षणा हाचि करावा विचार। तरावया पार भवसिंधू।। नाशिवंत देह जाणार सकळ। आयुष्य खातो काळ सावधान।। मनुष्याच्या पापपुण्याच्या संचित क्रीयमानानुसार सुख-दुःख भोग भोगावे लागतात. जे काही घडत आहे ते संचित कर्मानुसार घडत आहे. त्याचे क्रीयमान आपल्या हाती नसल्याने सत्कर्म करून देवावर जरी भार घातला तरी तो आपल्या दुःखाचे निवारण करील. संसारातील दुःखांना कंटाळून वाममार्गाचा अवलंब करून जीव देण्याचे कारण नाही. तो केव्हा तरी जाणारच आहे, असा मोलाचा संदेश संत देतात. न लगे दया जीव सहज चि जाणार। आहे तो विचार जाणा कांही।। मरण जो मागे गाढवाचा बाळ। बोलिजे चांडाळ शुद्ध त्यासी।। तुका म्हणे कई होईल स्वहित। निधान जो थीत टाकू पाहे।। आज होणाऱ्या आत्महत्या थांबविण्यासासाठी संतांचे जीवनदायिनी असणारे तत्त्वज्ञान ब्रह्मयोगी आहे. फक्त त्यांच्या विचारांचे परिशीलन होण्याची गरज आहे. त्यांचे अभंग वाङ्मय जगासमोर सातत्याने मांडण्याची गरज आहे. निश्चितपणे त्यांच्या विचारांची जगाला गरज आहे. आत्महत्यांसारख्या गंभीर विषयाला संत तुकारामांनी अतिशय कौशल्याने हाताळले आहे. जीवन संपविण्याची वाईट इच्छा कोणीही मनात धरू नये. त्यापेक्षा हा देह परमार्थिक विचार अंगीकारून सत्कर्म करण्याकडे लावावा. देवाला मरण मागतो तो महामूर्ख आहे, असे ते म्हणतात. संत तुकारामांनी पदोपदी आपल्या कायिक-वाचिक साधनेने मानवाला सन्मार्ग दाखविला आहे. त्यांचे मनुष्य उत्थानाचे हे कार्य आध्यात्मिक इतिहासामध्ये अनन्यसाधारण आहे. जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती जगाचे कल्याण व्हावे हा उदात हेतू डोळ्यासमोर ठेवून सर्व संतांनी जे लोककल्याणाचे, समाजधनाचे महनीय कार्य केले त्या कार्याला जगात तोड नाही. संताचे हे कार्य त्याग भावनेने झालेले आहे. सभोवतालच्या समाजामध्ये जी अवनती माजलेली आहे, त्याला मुळासह खोदून काढणे आवश्यक आहे, असा हा संतांचा धर्म विचार स्पृहणीय व अनुकरणीय आहे.

पान २ वरून

एक प्रदीप्त विश्वजयी अभिनय यात्रा!

'माया मृग' व 'दुई भाई' या चित्रपटांनंतर त्यांना योगायोगानेच हिंदी चित्रपटात प्रवेश करण्याची संधी मिळाली ती हेमंतकुमार निर्मित बीस साल बाद या चित्रपटाद्वारे. बिन बादल बरसात, कैसे कहूं, कोहरा ही त्यांची सुरुवातीची चित्रसंपदा. पण, हे सर्व चित्रपट बंगाली निर्माते व बंगाली पृष्ठभूमीवर बेतलेले होते. मुंबईच्या तद्दन व्यावसायिक चित्रपटसृष्टीत बंबईया शैलीतील एप्रिल फूल, मेरे सनम' या चित्रपटातील त्यांच्या प्रस्तुतीने त्यांचे पाय मुंबईत स्थिरावले. मोहंमद रफी साहेबांच्या सुश्राव्य गीतांनी त्यांची प्रेमवीर ही प्रतिमा गडद केली व त्यांना एक व्यावसायिक मूल्य व ओळख प्राप्त करून दिली. आसरा, सगाई, ये रात फिर ना आयेगी, नाईट इन लंडन, वासना, कही दिन कही रात, किस्मत, इश्क पर जोर नही, शरारत या चित्रपटांतील त्यांच्या हलक्या-फुलक्या, एकसाची व गाताना विचित्र आविर्भाव करणाऱ्या भूमिका रसिकांच्या बऱ्यापैकी पसंतीस उतरल्या. छाकटे रूप व थोडेफार बरे अभिनय गुण या बळावर त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत बऱ्यापैकी बस्तान १९७० च्या दशकात बसवले होते. राजेश खन्नाच्या महावादळात त्यांचा पालापाचोळा झाला. 'कहते है मुझको राजा' हा तद्दन हास्यास्पद चित्रपट निर्माण करून व भरीसभर म्हणून दिग्दर्शित करून त्यांनी कारकीर्दीची धूळधाण केली. २०१४ च्या निवडणुकीत त्यांनी तृणमूल पक्षातर्फे दिल्ली लोकसभा मतदारसंघात निवडणूक लढवून आपले हसे करून घेतले. त्यांचे चिरंजीव बंगाली चित्रपटांमधील आधुनिक महानायक म्हणून ओळखल्या जातात, हीच त्यांच्यासाठी समाधानाची बाब! 'गरज सरो व वैद्य मरो' या म्हणीची मूर्तिमंत उदाहरणे म्हणजे प्रदीपकुमार व विश्वजित! त्यांच्या बाबतीत आये बहार बनके लुभाकर चले गये हेच खरे.. प्रतिमा हाच आधार आणि प्रतिमा हाच शाप..! (लेखक सिनेमाचे अभ्यासक आहेत.)

पान ५ वरून

हवामान बदलात उत्पादन...

यासोबतच पीक विविधतेला चालना देण्यासाठी भात आणि गहू याव्यतिरिक्त टोमॅटो, वांगी यांसारख्या उच्च मूल्याच्या भाज्या आणि पेरू, केळी आणि पपई यासारख्या फळांची लागवड केली जात आहे. यामुळे जमिनीची सुपीकता तर राहतेच; शिवाय शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्नाचे स्रोतही मिळतात. 'एमयूडब्ल्यू मॉडेल'चे उद्दिष्ट पाणी, माती आणि पोषक द्रव्ये यासारख्या नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करणेदेखील आहे. हवामान बदलाच्या वाढत्या प्रभावांना सामोरे जाण्यासाठी हे मॉडेल सौर ऊर्जा, बायोमास रिसायकलिंग आणि हरितगृह वायू उत्सर्जन नियंत्रित करण्यासाठी उपायांचा अवलंब करते. याव्यतिरिक्त जॅकफ्रूट, महोगनी आणि मोरिंगा यांसारख्या बहुउद्देशीय झाडांचादेखील मॉडेलमध्ये समावेश करण्यात आला आहे. ते हवामानातील लवचीकता वाढवण्यास आणि शेतकऱ्यांसाठी जोखीम कमी करण्यास मदत करतात. (लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)

पान ४ वरून

जीवनवेधी कलेचे ज्ञान करून देणारे...

वेगवेगळ्या ज्ञान शाखामुळे आणि वैचारिक लेखनामुळे वाचकाला मिळणाऱ्या यापेक्षा साक्षात्कारी स्वरूपाचे ज्ञान मिळाल्यास ते अधिक उपयुक्त आणि परिणामकारी असते असे करंदीकर म्हणतात. त्याचप्रमाणे माणसावर नैतिक संस्कार करण्याचे कार्य धर्म, कुटुंब आणि समाज इत्यादी सांस्कृतिक संस्था मार्फत होत असते. मात्र, साहित्य त्याला अधिक सुसंस्कृत बनवण्याचे कार्य करते. याचा अर्थ साहित्य हा माणसाला सुसंस्कृत बनवण्याचा चांगला पर्याय आहे.

भारतात सांस्कृतिकदृष्ट्या एक फार मोठी दरी आहे आणि ही दरी शहरात राहणाऱ्या सुशिक्षित वर्गाची सुसंस्कृतता आणि सामान्यतः खेड्यात राहणाऱ्या अशिक्षित बहुजन समाजाची सुसंस्कृतता यामध्ये आहे. या दोन्ही संस्कृती मुक्त नाहीत. जातीय आता निरक्षरता दैववाद आणि अंधश्रद्धा याने खेड्यातील संस्कृती व्याप्त आहे तर शहरातील संस्कृती पराकोटीचा व्यक्तिवाद, भ्रष्टाचार, व्यापारीवृत्ती आणि मूल्यांचे घसरण यांनी पोखरलेली आहे.

असे स्पष्टपणे सांगत साक्षर आणि निरक्षर किंवा ग्रामीण आणि शहरी संस्कृतीतील तफावत सुधीर रसाळ यांनी करंदीकरांच्या विचाराला विचारात घेऊन अधिक परखडपणे व्यक्त केली आहे. नागरी आणि ग्रामीण समाजात जी सांस्कृतिक दरी पडलेली आहे ही दरी बुजवणे आणि दोन्ही समाजात शिरलेले दोष नष्ट करणे याबाबत साहित्यिकांची जबाबदारी लेखकाने निश्चित केलेली दिसते. मराठी लेखकाची जबाबदारी स्वीकारत नाही असे करंदीकर म्हणतात. या सर्व बाबींचा विचार होत वर्तमान काळातही लेखकाने आपल्या जबाबदाऱ्या समजून घेत शिक्षित आणि अशिक्षित समाजाला अपूर्णत्वाकडून पूर्णत्वाकडे देण्याची भूमिका स्वीकारलीच पाहिजे असे मला वाटते.

वाङ्मयाच्या मूल्यासंबंधीचा आणि वाङ्मयकृतीच्या मूल्यमापन संबंधी विचार करताना ललित वाङ्मय जीवनदर्शनातून वाचकांवर ज्ञानात्मक आणि नैतिक संसार करते तसेच त्याला जीवनाच्या गुणदोषयुक्त आणि अपूर्ण स्वरूपाच्या साक्षात्काराच्या पातळीवरचे ज्ञान देते असे करंदीकरांचे मत आहे. त्याबाबत उलगडा करत असताना सुधीर रसाळ यांनी वाङ्मयकृतीच्या सफलतेबाबत सुतोवाच केलेले दिसून येते. तसेच करंदीकरांची भूमिका जीवन परिवर्तनवादी, वाचकांवर सुसंस्कृततेचा संस्कार करणारी असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

विंदा करंदीकर यांचे लघु निबंध या प्रकरणात सुधीर रसाळ यांनी करंदीकरांच्या लिखाणातील द्रोणाचार्य आणि अश्वत्थामा या दोन व्यक्तींचा उल्लेख केलेला दिसून येतो. त्याचप्रमाणे ते पोट या शब्दाच्या अवतरण चिन्हात अडकलेले दिसून येतात. द्रोणाचार्यांना पोटासाठी स्वतःला विकावे लागले, अश्वत्थामाही त्याच मार्गाने गेला असे करंदीकर म्हणतात. याचा गहन अर्थाने उलगडा करत असताना भारतीय संस्कृतीमध्ये ज्ञान आणि शिक्षण हे अगदी सुरुवातीपासून पोटार्थी होऊन धनिकांचे किंवा सत्ताधीशांचे गुलाम होऊन राहिलेले आहे असा अन्वयार्थ निघतो.

आदम आणि इव्ह यांच्या कथेच्या संदर्भातून धावणाऱ्या झाडाचे फळ खाल्ल्यामुळे वास्तवाचे ज्ञान झाले असणार तेंव्हा या रस्त्याचे वाहने स्वीकार असे करंदीकर सुचवतात. यातून ज्ञान हे प्रवाही असते त्याचप्रमाणे प्रवासातून भटकंतीतून त्याचप्रमाणे सतत कार्यरत राहिल्यामुळे ज्ञान वाटत जाते. त्यामुळे आपणही रस्त्याप्रमाणे प्रवाही राहिले पाहिजे. त्यामुळे आपले ज्ञान वाढते हा महत्त्वाचा विचार करंदीकरांनी दिलेला आहे असे आपल्या लक्षात येते. मामाचे घर या विंदा करंदीकरांच्या कथेचा संदर्भ देत सुधीर रसाळ यांनी मामाच्या घरी शिकायला राहायला गेल्यावर मामाच्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती त्याला कशी वेगवेगळ्या प्रकारे वागवते याचे वर्णन केले आहे ते सांगतात. त्यातून मामाच्या घरी शिकायला आलेल्या छोट्या भाच्याशी सर्वांचे वागणे आपले कौटुंबिक संस्कृती उभी करणारी असते, असे लेखक म्हणतात.

एकंदरीत विंदांचे गद्यरूप या पुस्तकामध्ये डॉ. सुधीर रसाळ यांनी विंदा करंदीकर यांच्या गद्य लेखनाचा विस्तृत आढावा घेतला आहे. त्यातून साहित्य विषयक आणि जीवन विषयक ज्ञान आणि शिक्षण यात साधना आणि अभ्यास यांचे महत्त्व अधोरेखित होते.

मानसिक लवचिकता

सकारात्मकतेचे तत्वज्ञान २५३

सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com



मन जितके लवचिक तितके ते परिस्थितीशी जुळवून घेते, आकलन बदलू शकते आणि बदलाला कवटाळू शकते. हा गुण समस्या-निवारणासाठी, भावनिक नियमनासाठी आणि विकासासाठी अत्यावश्यक मानला जातो.

आयुष्यातील क्लिष्ट क्षणांमधून होडी वल्हवत सहज सुटका करून घ्यायची असेल तर ही क्षमता विकसित करावी लागते. कृतिबद्ध पावले उचलली तर अस्वस्थतेला अर्थपूर्ण बदलांच्या मार्गातील मैलाचा दगड बनविणे शक्य होते. आकलन निरामय असावं याची जाण धीरे धीरे मूळ धरायला लागली आहे, हे बार्ट यांचे २०१८ सालचे निरीक्षण आहे. ते मानतात- आरोग्याच्या इतर निकषांबरोबरच निरामय आकलन साध्य करण्यासाठीचे विशेष प्रयत्न आता करायला हवेत.

आजवर मानसशास्त्राने उणिवांवर अधिक लक्ष केंद्रित केले आणि क्षमता विकसनाकडे तितकेसे लक्ष दिले नाही. मात्र १९९० च्या आसपास हा प्रयत्न सुरु झाला आणि क्षमतांच्या आधारे उणिवांवर मात कशी करता येईल यावर संशोधन सुरु झाले. या संदर्भात विचार, स्मृती, समस्या-निवारण ही मानवाची बलस्थाने असतात, हे हळूहळू ध्यानी आले. उदा. एकाग्रता, सुव्यवस्थितपणे वस्तू रचून ठेवणे ही मानवाची बलस्थाने ठरू शकतात. तसेच आहार, व्यायाम, निद्रा असे बाह्य घटकही निरामयतेचे स्तंभ बनू शकतात. या क्षमतांची यादी कितीही वाढू शकते आणि त्याबाबत कित्येकदा आपण अनभिज्ञ असतो. एकदा ही जाण विकसित झाली की त्यांचा वापर, विकास साधून आपण मेंदूचे कार्य आणि आकलन क्षमता दोन्ही सुधारू शकतो.

प्राप्त परिस्थितीशी जुळवून घेता येणे हे लवचिक मनाचे लक्षण असते आणि पुढे जाऊन ते यशाचे गमक बनते. गंमत म्हणजे हे आकलनाचे कौशल्य विकसित करायचे असेल तर कोडी, विविध खेळ यांच्या माध्यमातून वैचारिक मतभिन्नता साध्य करता येते. मानसिक चाकोरीत अडकलेल्या व्यक्तींना सुडोकू, शब्दकोडी, बुद्धिबळ अशा माध्यमांतून समस्या-निवारणाची तंत्रे आत्मसात करता येतात. असे मानसिक व्यायाम नवनव्या संकल्पनांना, नवसर्जनाला आणि विकासवेधी मनोरचनेला आधार देतात.

जगण्याच्या कठोर नियमांचे पुनर्लेखन करता येते. सुरुवात करावी लागते आपल्या आस्था बदलण्यापासून मग विचारांचे आवर्त बदलता येतात. मुळात हे काठिण्य कोठून येते? आपण स्वतःकडून अतर्क्य मागण्या सातत्याने करीत असतो. तसेच इतरांकडूनही अशाच अवास्तव अपेक्षा बाळगतो. याला वैचारिक मागण्या (डिमांड थिंकिंग) असे म्हणतात. असे भाव कठोर भाषेत असं केलंच पाहिजे किंवा असं कां नाही व्यक्त होतात.

काडीचीही असुविधा सहन न होण्याच्या सवयीने माणसे कठीण होत जातात. मला यश मिळालेच पाहिजे अन्यथा माझ्यावर अपयशी असा ठसा लागेल किंवा इतरांनी माझा आदर राखलाच पाहिजे, किंवा मी म्हणतो तसेच झाले पाहिजे नाहीतर मला जुळवून घेता येणार नाही वगैरे वगैरे!

अशा आस्था आणि मागण्या टोकाच्या असतात आणि त्यांचा वास्तवाशी संबंध असतोच असे नाही. तेथून समस्यांना सुरुवात होते. ही विचारसरणी तणावांना कारणीभूत ठरते, अतिविचारांची सवय लावते आणि अकारण चिंता करण्यामध्ये परावर्तित होते. मग इतरांशी विनाकारण झगडे सुरु होतात, चीड निर्माण करतात आणि मग तणाव निर्माण करणाऱ्या प्रसंगांमधून बाहेर पडणे जड जाते.

याउलट लवचिकता या जाणिवेतून उगम पावते की बऱ्याच गोष्टी मानवी नियंत्रणाबाहेर असतात. तेथे सहनशीलतेचा अंत पाहिला जाऊ शकतो आणि म्हणून त्यांचा विनातक्रार स्वीकार करणे एवढेच आपल्या हाती असते. मग अंतर्गत आणि बाह्य तणाव प्रसंग सुसह्य होतात, अनिश्चिततेचा सामना करणे जमते, स्वतःच्या क्षमतांवरचा विश्वास दुणावतो आणि मनःशांती प्राप्त होते. सुदैवाने सराव केला तर आपल्याला कठीण, घट्ट आस्था सापडतात आणि त्यांचे लवचिक पर्यायही. मग काठिण्याला पर्याय म्हणून मागण्यांऐवजी सुलभ प्राधान्यक्रम विचारात घेता येतात. त्यांतून स्वतःकडून तसेच इतरेजनांकडून वास्तववादी अपेक्षा ठेवता येतात. थोडक्यात काय व्हायलाच पाहिजे याची सक्ती न लादता काय व्हायला आवडेल याची निवड करता आली तर? उदा- माझा सन्मान झाला पाहिजे या अपेक्षेपेक्षा अधिक वास्तव, तर्कनिष्ठ आणि लवचिक विचार मी चांगले वागण्याचा प्रयत्न करीन म्हणजे लोक आपोआप माझा आदर करतील, आणि समजा तसे झाले नाही तरी, मला फरक पडत नाही.

विचारांचे पुनर्लेखन

स्वतःवर लादलेल्या मागण्या आणि अपेक्षा आपले जगणे कधीकधी बेहाल करून टाकतात. गंमत म्हणजे हे जाणवतेच असे नाही, इतके ते स्वयंचलित होऊन जातात. हवेच , समझोता नाही अशा टोकाच्या शब्दांचा वापर आपण जुळवून घ्यायला तयार नाही, हटवादी आहोत असा संदेश देत असतात. सगळे समान असतात म्हणून त्यांना योग्य अशीच वागणूक मिळायला हवी असे एखादे वाक्य आपल्या तोंडून नकळत जाते पण त्याच्या मागील शक्याशक्यतेचा विचार केला जातो का? अशी अवास्तव मानके आपल्या हातात नसलेल्या परिस्थितीवर लादून काय उपयोग? काय असावे आणि काय नसावे याचा विचार कधीतरी क्षम्य असतो.उदा.- मी मद्यप्राशन करून वाहन चालवू नये हा विचारांचा निरामय साचा आहे.

अर्थात असेच आणि हवेच असे शब्द/हट्ट बरेचदा तणावजन्य असतात. कारण त्यांचे पालन अध्याहृत असते आणि तसे काही कारणास्तव झाले नाही तर निराशा अथवा क्रोध पदरी येतो. सुदैवाने जीवनविषयक अशा आस्थांचे पुनर्लेखन शक्य असते. त्यांना लवचिक बनविता येते. वास्तवाची नोंद घेत, काही गोष्टी मनासारख्या होत नाहीत/होणार नाहीत हे मान्य करत पुढे जाणे अधिक श्रेयस्कर असते. एक सोप्पा उपक्रम करून बघा म्हणजे मानवी निवडी आणि मागण्या यांच्यातील भेद स्पष्ट होईल. मग असाध्य आणि स्वतःवर लादलेल्या मागण्यांपासून दूर जात अधिक सुलभ मार्ग कसे शोधता येतात हे जाणवेल.

पाऊल क्रमांक एक-

आधी स्वतःमधील अपरिवर्तनीय/पक्क्या आस्था, श्रद्धा हुडकून एका कागदावर लिहून काढाव्यात-

(१) मला परिपूर्णतेशीव्या काहीही नको आहे.

(२) मी यश संपादन करायलाच हवे.

(३) इतरांनी मला सन्मानपूर्वक वागवावे.

(४) सगळ्यांना माझ्याबद्दल अधिक माहिती असायलाच हवी.

(५) सगळ्यांना मी आवडायलाच हवा.

(६) माझाच दृष्टिकोन बाकीच्यांनी स्वीकारला पाहिजे.

(७) आयुष्य अवघड आणि क्लिष्ट असूच नये.

थोडा विसावा घेऊन वरीलपैकी एखादा विचार अपेक्षा अथवा मागण्यांमधून येतोय कां याचा शोध घ्यावा. खाली दिलेल्या जागेत तो लिहून काढावा-

पाऊल क्रमांक २-

या विचाराचे पुनरावलोकन करावे. मग शांतपणे, तो सुस्पष्ट होतोय कां हे बघावे.

आता खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत

(१) अशा ठाम, अपरिवर्तनीय आस्थेमुळे मनात काय विचारतरंग तयार होताहेत?

(२) अनिवार्य अशा काही अपेक्षा, मागण्या ज्यावर तुमचे नियमन नाही तयार होत आहेत का?

(३) या आस्था तुमच्यावर कोणत्या प्रकारे अवास्तव बंधने लादत आहेत?

पाऊल क्रमांक ३-

अदलाबदल- इथे एक नवी लवचिक, स्थितिस्थापकत्व असलेली श्रद्धा यंत्रणा तयार करून आधीच्या घट्टमुट्ट, पाळंमुळं रुजलेली आस्थेच्या जागी विराजमान करायची आहे. मागण्यांचे रूपांतर निवडींमध्ये, पर्यायांमध्ये करण्याची ही पायरी आहे. यांतून अवास्तवाकडून वास्तवाकडे प्रवास सुरु होऊ शकतो. म्हणजे मला यशस्वी होऊन सगळ्यांकडून आदर हवा असला तरीही मला माहित आहे कोणीच परिपूर्ण नसतो आणि तो प्रत्येकाला आवडतोच असे नसते. आपल्याला हवं ते सारंकाही मिळतंच असं नाही म्हणून त्याची इच्छा बाळगणे अतिरेकी ठरू शकते.

या परिस्थितीत असं व्हावं/असावं ही माझी इच्छा आहे-

पाऊल क्रमांक चार-

नव्या शिथिल विचारांबद्दल मत-

आता कमी त्रासदायक पर्याय निवडलेला आहे तर त्याचेही पुनरावलोकन करायला हवे. त्यासाठी स्वतःला काही प्रश्न विचारायला हवेत-

(१) नवीन लवचिक विचारसरणीने मनाची मरगळ कमी झाली कां?

(२) आता अधिक वास्तववादी चित्र तुमच्या डोळ्यांसमोर उभं राहिलं आहे कां?

(३) आता परिस्थिती कह्यात आली आहे असं वाटतंय कां?

पाऊल क्रमांक पाच-

अभिप्राय-

हा उपक्रम पार पाडल्यावर कसं वाटलं?

(१) दृष्टिकोनात काही सकारात्मक बदल जाणवतोय कां?

(२) निवड /पर्याय हा चांगला मार्ग आहे की अपेक्षा/मागण्यांचा?

(३) स्वतःसाठी आणि इतरांकडूनही अधिक सुयोग्य अपेक्षा ठेवण्याचा दृष्टिकोन कसा वाटला?

(४) या उपक्रमाने तुमच्या विचारसरणीवर काय प्रभाव पडला?

वानगीदाखल काही उदाहरणे - यांतून वैचारिक भेद स्पष्ट होतील.

जुना दृष्टिकोन

(१) मी या परीक्षेत पास झालो नाही तर मी जीवनात अनुत्तीर्ण झाल्यासारखे मला वाटेल. हे फारच भीषण असेल.

(२) मी यशस्वी व्हायलाच पाहिजे.

(३) माझ्या सहकाऱ्यांना माझ्याबद्दल कौतुक वाटायला हवे.

(४) माझा दृष्टिकोन सर्वमान्य व्हायला हवा.

(५) मी चुका करतो, मी निकम्मा आहे.

(६) सगळं कसं परिपूर्णच असायला हवं.

(७) मला ती पदोन्नती मिळायला हवी, मी त्याला सुयोग्य आहे.

(८) माझं म्हणणं सगळ्यांना पटायला हवं.

(९) माझ्या यादीत ठरविलेलं सगळं पार पडलं तरच मला समाधान वाटेल.

नवे पर्याय-

(१) या परीक्षेत मी उत्तीर्ण व्हायला हवे, पण अपयशी ठरलो तर लगेच माझ्यावर शिक्का मारला जाऊ नये. मीही सगळ्यांप्रमाणे चुका करू शकतो.

(२) मला माझ्या मनासारखं व्हावं असं निश्चित वाटतं, पण काही कारणवश तसं झालं नाही तरी आकाश कोसळून पडणार नाही.

(३) मी आवडावं असा अट्टाहास मी कधी धरणार नाही. मी सहकर्मीना आवडलो नाही तरी चालेल.

(४) इतरेजन माझ्याशी सदासर्वकाळ सहमत असावेत असा आग्रह मी धरणार नाही. मला आदर मिळालाच पाहिजे अशी माझी मागणी नसेल. मतभेदांचे स्वागतच आहे कारण त्यातून चर्चा होते आणि चर्चेतून विकासाकडे वाटचाल होते हे मला पटले आहे. आणि कोणाला माझे मत पटले नाही तरी ती व्यक्ती लगेच माझी शत्रू होत नाही.

(५) हातून चुका होणार नाहीत यासाठी मी आवश्यक ती खबरदारी बाळगेन, पण शेवटी मीही मनुष्यच आहे. कोणीच परिपूर्ण नसतो, तेव्हा माझ्यातील अपुरेपण माझी ओळख बनणार नाही अशी मला आशा आहे.

(६) सगळं चांगलं घडावं आणि कोणाचेही अहित चिंतू नये, हे खरं असलं तरी शेवटी जीवन अकल्पित असते आणि सगळीकडे माझे नियंत्रण असू शकत नाही.

(७) पदोन्नती मिळाली तर मला नक्कीच आनंद होईल, पण चांगले काम करणे एवढेच माझ्या हातात आहे, हे मी जाणून आहे. त्यामुळे पदोन्नती नाही मिळाली तरी मला चालेल. फक्त त्यामागची कारणे मला समजायला हवीत म्हणजे मी भविष्यात सुधारणा करू शकेन.

(८) इतरांच्या मतांवर माझे मूल्य ठरत नाही. मला सन्मान मिळाला नाही तर ती माझ्यातील कमतरता नक्कीच नसेल.

(९) ठरलेलं पार पडलं तर आनंदच आहे, पण तसं काही कारणाने झालं नाही तर लगेच मी स्वतःला हिणवणार नाही.

शरीराला, विचारांना, मनाला जितकी शिस्त आवश्यक असते तितकीच मानसिक लवचिकताही! मग अपेक्षाभंग होत नाहीत.

विशेषतः उतारवयात जेव्हा बरंचसं आपल्या मनाप्रमाणे साहजिकच होत नाही आणि पदोपदी मनाला, स्वभावाला मुरड घालावी लागते, तेव्हा लवचिक मानसिकता कामी येते अन्यथा घरात, दारात सर्वदूर वादविवाद होतात.

विमानी बैसले । तुका ब्रह्म ॥

(भाग-४८)

साधता संवाद
प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी(वतनी)
भ्र. ९४०३०२९१७८

ज्या वेळी अधर्माचा अतिरेक होईल आणि धर्माला ग्लानी येईल, सज्जनांचे हाल होतील, अपमान होईल आणि दुर्जनांचा सन्मान होऊन त्यांचा सुळसुळाट वाढेल, ज्ञानियांची हेळसांड होईल आणि अज्ञान्यास महत्त्व प्राप्त होईल, भ्रष्टाचार मातेल आणि शिष्टाचार मातीमोल होईल त्या त्या वेळी संत सामान्यातील सामान्य जीव होऊन अवतार घेतात आणि तुमच्या आमच्या सारख्या सामान्य जीवात एकरूप होऊन वावरतात. ते आपल्याशी एवढे एकरूप होतात की आम्हाला त्यांची साधी ओळखही पटत नाही किंवा त्यांना ओळखावे एवढी पात्रताही आमच्याही ठायी नसते कारण आम्ही या संसाराचा एक अविभाज्य अंग होऊनच जन्माला आलेलो असतो.

संत मात्र वरवर आमच्याशी एकरूप झाल्यासारखे वावरतात पण त्यांच्या अंतरात मात्र विश्वाच्या कल्याणाविषयी अत्यंतिक तळमळ आणि ओढ असते. कारण विश्वकल्याण आणि धर्मांचं रक्षण करणं एवढंच त्यांच्या जन्माची अर्थात अवताराचं प्रयोजन असतं. हे खुद्द जगद्गुरु श्री तुकोबारायांनीच सागितले आहे की,

आम्ही वैकुंठवासी आलो याचि कारणासी।।
बोलले जे ऋषी साचे वर्तावया ।।

आज हे सगळं सागण्याचं कारण म्हणजे नुकताच जगद्गुरु श्री तुकोबारायांचा जन्मदिवस नुकताच साजरा झाला. त्यानिमित्त हा लेखनप्रपंच...

हे विश्वची माझे घर... म्हणणारे, नुसतेच म्हणणारे नाही तर आपल्या आयुष्यात प्रत्यक्ष आचरणात आणनारे श्री ज्ञानेश्वर माऊली हे सारे विश्वच माझे घर आहे, माझे कुटुंब आहे असे मानतात. ही माऊलींची किती व्यापक कल्पना आहे. मग सर्वच संतांनी ह्या वसुधैव कुटुंबकम् ही संकल्पना साऱ्या जगाला सांगितली आहे. जगद्गुरु संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगातून समाजातील अनिष्ट चाली-रिती, अंधश्रद्धा यावर अतिशय परखडपणे प्रहार केलेला आहे. हे करत असतानाच हे जग नेमकं काय आहे?, या जगाचा धर्म कोणता आहे? हे जग कसं राहिलं म्हणजे सुखी समाधानी राहील याविषयी फार सुंदर भाष्य एका अभंगात त्यांनी केले आहे. तो म्हणजे

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म।
भेदाभेद भ्रम अमंगळ।।

हे सारं जगच विष्णुमय आहे आणि या जगाचा धर्म हा वैष्णवांचा आहे. मग इथे कसला आलाय भेदभाव? आणि जर असा भेद कोणी करत असेल तर ते फार अमंगल आहे. तेव्हा मुळात भेदाभेद हाच एक भ्रम आहे. तो दूर झाल पाहिजे. पुढे ते म्हणतात की, बाबांनो, तुम्ही वैष्णव आहात त्याचे भक्त आहात, तेव्हा तुम्ही भागवत ऐका आणि जे काही कर्म कराल ते हितकारक आणि सत्यच करा. पण हे करत असतांनाच त्यांनी एक वर्मही आम्हाला सांगितलं आहे, ते म्हणजे आपल्या कडून कोण्याही जीवाचा मत्सर किंवा निंदा नालस्ती चूकूनही घडू नये हेच त्या सर्वेश्वराच्या पुजनाचे खरे वर्म आहे हे ध्यानात घ्या. शेवटी ते म्हणतात की, बाबांनो, हे विष्णुमय जग आपलं एक वैश्विक कुटुंब आहे. हे कुटुंब म्हणजे एकाच देहाचे अवयव आहेत. या देहाच्या कोणत्याही अवयवाला दुखापत झाली तर साऱ्या देहाला त्याच्या वेदना होतात. त्याप्रमाणे आपल्याकडून कुणी दुखावले जाईल असे कर्म करू नका. आणि आपल्याला कुणी दुखावले तर त्याचं फारसं वाईटही वाटून घेऊ नका कारण सुख आणि दुःख हे दोन्ही या जीवाचे भोग आहेत ते भोगावेच लागतात. त्यांच्यापासून कुणाचीही सुटका नाही हे मनाला समजाऊन सांगा म्हणजे जगणं अधिक सुसह्य व सुंदर होईल.जगद्गुरुंनी प्रस्तुत अभंगातून किती मोलाचा उपदेश आम्हाला केला आहे. परवाच मी पहिल्यांदा देहुला गेलो होतो. तुकोबारायांचं दर्शन घेतलं त्यांचं ते ईश्वरीय सात्विक रूप डोळ्यात साठवत होतो, आणि का कुणास ठाऊक पण कळत नकळत माझे डोळे पणावले. शब्द बाहेर पडले... त्याच **विमानी बैसले तुका ब्रह्म** या अभंग रचने विषयी मी थोडे विवेचन करणार आहे.

सांगितले ज्यांनी । जगण्याचे बोल ।।
शब्दब्रह्म बोल । तुकोबांचे ।।१।।

खरं तर आपण फार भाग्यवान आहोंत की, आपल्याला हा मनुष्य जन्म लाभलेला आहे. कारण इतर जीव आहार, निद्रा, भय व मैथुन ह्या चारच गोष्टी करत असतात, कारण गतजन्मीच्या कर्माचे भोग भोगण्यासठीच त्यांचा जन्म झालेला असतो. त्यांना पाप-पुण्याचं किंवा सत्कर्म-कुकर्म यांच्याशी काहीही देणंघेणं नसतं. प्रारब्धातील भोग भोगायचे आणि भोग संपले की आल्या मुक्कामी निघून जायचं. पण माणसाचा जन्म याही पलीकडचा आहे. कारण याच जनन्मात मनुष्याला प्रारब्ध भोग भोगत पुण्य कर्म करून संचितात वाढ करता येते एवढंच नाही तर जन्म मरणाच्या फेऱ्यातून आपली सुटका करून घेऊन मोक्ष सुध्दा मिळवणे शक्य आहे. एवढं या मानवी जन्माचं महात्म्य आहे. पण केवळ अज्ञानामुळे या जन्माचं महत्त्व आपण जाणत नाही आणि अनमोल असा हा नरजन्म एकमेकांची निंदानालस्ती करण्यात आणि अहंकारात फुकाच वाया घालवतो, मातीमोल करतो. तुकोबारायांनी आपल्या प्रत्येक अभंगातून अतिशय तळमळीने सांगून आम्हाला जागे करण्याचा प्रयत्न केला आहे. ते सांगतात की अरे बाबांनो,

संसार दुःख मूळ चोहीकडे इंगळ ।
विश्रांती नाही कोठे रात्रंदिन तळमळ ।।

संसार हेच सर्व दुःखाचं मूळ आहे आणि हा संसार नाशवंत आहे. यात एका क्षणाची सुध्दा विश्रांती नाही. तुम्ही यात विनाकारण गुरफटून पडु नका. त्यापेक्षा परमार्थ करा. (क्रमशः)

वेध
प्रसन्न आठवले
भ्र.९०४९३५३८०९

ट्रम्प यांच्या आदेशांचा अर्थात एक्झिक्युटिव्ह ऑर्डर्सचा धडाका पाहिला की अमेरिकेतील नागरिकांना धडकी भरली असेल. कारण रोज काही ऑर्डर्स अशा एकूण ९ ते १० दिवसात आतापर्यंत ४४ च्या आसपास ऑर्डर्स ट्रम्प यांनी सही करून अंमलबजावणी साठी पुढे पाठवल्या आहेत. यालाच धरून, ट्रम्प यांनी सरळसरळ धमकी वजा आदेश काढून, जवळपास २० लाख सरकारी कर्मचाऱ्यांना ईमेलद्वारे आदेश वजा मेल पाठवला आहे. त्यात त्यांनी सर्व २० लाख कर्मचाऱ्यांनी आपणहून स्वमर्जीने नोकरीचा राजीनामा देऊन द्यावा असं लेखी मेलद्वारे लिहिलं आहे. एका साध्या वाक्यात त्यांनी मेलद्वारे आलेल्या त्याच मेलला प्रत्युत्तर म्हणून आपला राजीनामा, तेसुद्धा स्वखुशीने दिला असं लिहून द्यायचं आहे. जर त्यांनी स्वखुशीने राजीनामा दिला नाही, तर त्याच मेलमधे त्यांना धमकी वजा इशारा देण्यात आला आहे की, नंतर जे परिणाम होतील ते सहन करावे लागतील. वर यातून आपण २ बिलियन डॉलर्स सरकारी खर्च वाचवू, अशी मखलाशी सुद्धा केली आहे. या सेवानिवृत्तीच्या आदेशाविरुद्ध कर्मचारी न्यायालयात गेले आहेत. एकूण पूर्ण व्यवस्थेला ढवळून काढण्याची ही योजना आहे, असा सकृदर्शनी निष्कर्ष काढता येतो. जेणेकरून आजपर्यंत न झालेल्या चर्चा आता व्हाव्यात. व्यवस्था ढवळून निघावी. ज्यामुळे अनेक कायदे, नियम यांची पुन्हा एकदा पडताळणी होऊन, त्यातील किती कालबाह्य आहेत, याचा त्यांना अंदाज येईल. किंवा यातून त्यांची बेदरकार व हुकूमशाही वृत्तीचं दर्शन होतं. त्यापेक्षा जास्त माझ्या मते, त्यांना असलेल्या कायद्यातून, नियमातून आपण किती सहज सुटू शकतो, हे देखील पहायचं असेल. त्याचप्रमाणे न्यायव्यवस्था किती आपल्या अंकित राहते, याचाही अंदाज त्यांना येऊ शकेल. एक म्हणजे जरी यातून उद्या माघार घ्यावी लागलीच तरी, २० लाख कर्मचाऱ्यांवर कारवाई न करता निदान २, ४ लाख कर्मचारी नक्की घरी पाठवता येतील. त्यातून ट्रम्प व एलोन मस्क यांना आपल्या विरुद्ध असलेले आणि डीप स्टेटशी निगडित असलेले कर्मचारी हुडकून त्यांना नक्कीच घरी बसवता येईल. तसंच काही कर्मचारी घरी बसवले की उरलेल्या कर्मचाऱ्यांना धाकात ठेवणं सोप्पं जाईल. त्याशिवाय नस्ती युनियन बाजी सुद्धा ट्रम्प यांना बंद करायची असेल. कारण डाव्यांवर व त्यांच्या कोणत्याही प्रकारच्या चळवळीवर, ट्रम्प यांचा मनापासून राग आहेच. त्यामुळे अश्या प्रकारच्या गोष्टींना परस्पर चाप बसेल. दूसरा आदेश जो ट्रम्प यांनी जारी केला तो म्हणजे सर्व प्रकारची, देशांतर्गत व अनेक परकीय राष्ट्रात दिली जाणारी मदत अर्थात दिला जाणारा निधी, तत्काळपणें ९० दिवसांसाठी गोठवण्यात आला आहे. यावर खूप आरडाओरडा झाल्यावर वैद्यकीय स्वरूपाची दिली जाणारी मदत यातून वगळण्यात आली. या दिल्या जाणाऱ्या मदतीवर परखड भाष्य करताना ट्रम्प यांनी आधीच्या सरकारचे सुद्धा वाभाडे काढले आहेत.

कोणत्याही प्रकारचं नियंत्रण, चौकशी, तपासणी न करता अश्या प्रकारची मदत देशात बेकायदेशीर रहात असलेल्या illegal migrants यांना आणि देशाबाहेर जवळपास १८० देशात अमेरिकेहून दिली जायची. यावर परखड भाष्य करताना त्यांनी हे नमूद केलंय की, Am illegal migrants पैकी जवळपास सर्वच अमेरिकेकडून मिळणाऱ्या फुकट मदतीच्या बदल्यात आपल्याच देशात अशांतता दंगे करून, देशाची बरबादी करत आहेत. दुसरं म्हणजे मानवीय कारणाने देशाबाहेर दिल्या जाणाऱ्या या मदतीचा उपयोग हमास सारख्या संघटना, पुन्हा शस्त्रास्त्र घेऊन, अतिरेकी तयार करण्यासाठी वापरत आहेत. हा बाईडन सरकारचा अक्षम्य गुन्हा आहे, असही म्हणण्यास त्यांनी मागे पुढे पाहिलं नाही. अजूनही बरच काही घडत आहे, पण एकूण निर्णयांचा धडाका, अनेक गोष्टींवर परखड बोलण्याच धाडस, या सर्वात असलेला कमालीचा वेग, यातून त्यांच्यातील एक सुप्त हुकूमशहा दिसून येतो. ज्याअर्थी इतक्या धडाक्याने त्यांनी काम पहिल्या दिवसापासून सुरू केलं आहे, त्यावरून ट्रम्प यांचा उद्देश काही वेगळाच आहे, असा अंदाज येतो. म्हणजे कहीपे निगाहे और कहिपे निशाना असा त्यांचा प्लॅन असावा. त्याचप्रमाणे, कोलंबिया, ग्रीनलँड, पनामा आणि कॅनडा या आसपासच्या भुभागांना काबीज करून अमेरिकेचा विस्तार करण्याचा त्यांचा इरादा आहे.

ग्रीनलँडबद्दल डेन्मार्कच्याच पंतप्रधानांना फोन करून त्यांनी ग्रीनलँड कितीला विकत देणार अशी सरळ विचारणा केली आणि तसं न केल्यास आम्ही मिलिटरी ऑपरेशन करण्यास मागेपुढे पाहणार नाही, असा अप्रत्यक्ष इशारा सुद्धा त्यांनी दिला.

तंत्रज्ञानाच्या गैरवापराचा फटका

कोणत्याही तंत्रज्ञानाचे जसे फायदे असतात, तसे तोटेही असतात. तंत्रज्ञान, विज्ञान हे दुधारी शस्त्रासारखे असते. तंत्रज्ञानाच्या दुरुपयोगाचे परिणाम आता त्या व्यक्तीपुरते किंवा देशापुरते मर्यादित राहिलेले नाहीत, तर ते जागतिक झाले आहेत. चीनने कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून आणलेल्या 'डीपसीक' या तंत्रज्ञानाचा गैरवापर केल्याने जगातील गुंतवणूकदार लाखो कोटी रुपयांना बुडले आहेत. हे तंत्रज्ञान नेमके काय आहे?

नोंद

प्रा. जयसिंग यादव

आजचे जग हे तंत्रज्ञानाचे आहे. विशेष म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'च्या येण्याने तर तंत्रज्ञानात अद्‌भुत आणि विस्मयकारक बदल झाले आहेत. 'एआय'च्या मदतीने एका तासात होणारे काम अवघ्या पाच मिनिटांमध्ये होत आहे. 'चॅट जीपीटी', 'मेटा एआय' हे 'एआय' जगतातील अग्रणी मानले जातात; मात्र या सर्वांचीच झोप उडवणारी 'एआय' यंत्रणा चीनने आणली आहे.

चीनने या यंत्रणेला 'डीपसीक' असे नाव दिले आहे. विशेष म्हणजे हे तंत्रज्ञान येताच आता 'चॅट जीपीटी'सारख्या 'एआय' यंत्रणांची झोप उडाली आहे. 'डीपसीक'ची निर्मिती 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'च्या क्षेत्रातील अभूतपूर्व आणि प्रभावी घटना आहे,' अशा शब्दांमध्ये मार्क अण्ड्रिसेन यांनी 'डीपसीक'चे वर्णन केले आहे. हे अण्ड्रिसेन अमेरिकेच्या सिलिकॉन व्हॅलीतील भांडवली गुंतवणूकदार आणि अमेरिकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे सल्लागार आहेत. चीनचे हे नवीन कृत्रिम बुद्धिमत्तेचे मॉडेल अमेरिकेत सध्या आघाडीवर असलेल्या चॅट जीपीटीइतके चांगले असल्याचे 'डीपसीक'ने म्हटले आहे. शिवाय, ते विकसित करण्यासाठी लागणारा खर्च तुलनेने फार कमी असल्याचा दावा करण्यात आला आहे.

प्रतिस्पर्धी कंपन्या या प्रकारची ॲप, मॉडेल्स विकसित करण्यासाठी अब्जावधी डॉलर्सचा खर्च करतात; पण 'डीपसीक ॲप' ६० लाख डॉलर्सपेक्षाही कमी रकमेत विकसित करण्यात आले असल्याचा दावा या ॲपच्या संशोधकांनी केला आहे. 'डीपसीक' या चिनी कृत्रिम बुद्धिमत्ता कंपनीची स्थापना चीनमधल्या हांगझाऊ या आग्नेय भागातील शहरात झाली. कंपनी २०२३ मध्ये स्थापन झाली असली, तरी त्यांचे लोकप्रिय ॲप अमेरिकेत १० जानेवारी २०२५ ला लॉंच झाले. 'डीपसीक'ला भांडवली मदत करण्यासाठी लिआंग वेनफेंग यांनी 'हेज' या फंडाचीही स्थापना केली. त्यातून आलेल्या निधीतून ते 'डीपसीक'चा अर्धा खर्च भागवू शकले.

वेनफेंग ४० वर्षांचे असून माहिती आणि इलेक्ट्रॉनिक्स इंजिनीअर आहेत. त्यांनी 'एनव्हिडिया ए १००' या अमेरिकन कंपनीच्या चिपचे एक स्टोअर उभारले होते. 'एनव्हिडिया'च्या चिपची चीनला निर्यात करण्यावर आता बंदी आहे. तज्ज्ञांच्या मते, वेनफेंग यांच्याकडे जवळपास ५० हजार चिप संग्रही होत्या. त्यामुळेच त्यांना 'डीपसीक' लॉंच करता आली. स्वस्त आणि कमी दर्जाच्या चिप्सबरोबर जोडलेल्या या चिप्स अजूनही आयातीसाठी उपलब्ध आहेत.

अलिकडेच 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'च्या क्षेत्रातील तज्ज्ञ आणि चीनचे पंतप्रधान ली किआंग यांच्यातील बैठकीत लिआंग दिसले होते. 'डीपसीक'हे ॲप 'ॲपल स्टोअर'वर आणि कंपनीच्या वेबसाईटवर ऑनलाईन डाऊनलोडसाठी उपलब्ध आहे. ॲपची सेवा मोफत वापरता येत असल्याने अल्पावधीतच ॲपल स्टोअरच्या सर्वाधिक डाऊनलोड केल्या जाणाऱ्या ॲप्सच्या यादीत त्याने जागा मिळविली. सर्वाधिक रेटिंग मिळालेले मोफत ॲप म्हणूनही या ॲपला अमेरिकेत मान्यता मिळत आहे.

'चॅट जीपीटी'प्रमाणेच 'डीपसीक'मध्येही कृत्रिम बुद्धिमत्तेची मदत घेता येते. हे ॲप तुमच्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी आणि तुमचे आयुष्य चांगले करण्यासाठी बनवले गेले आहे, असे 'ॲपल स्टोअर'वर दिलेल्या ॲपच्या माहितीत म्हटले आहे. हे ॲप राजकीय प्रश्नांचे उत्तर देणे टाळते. ४ जून १९८९ रोजी चीनमधील तियानमेन चौकात घडलेल्या नरसंहाराविषयी विचारले असता 'डीपसीक'ने 'माफ करा. मी या प्रश्नाचे उत्तर देऊ शकत नाही.

मी लोकांना मदत करण्यासाठी आहे आणि कुणालाही त्रास होऊ नये अशी उत्तरे देण्यासाठी बनवण्यात आलेला कृत्रिम बुद्धिमत्ता असलेला सहकारी आहे' असे म्हटले. 'डीपसीक'च्या कमी खर्चाच्या दाव्याने आर्थिक बाजारात २७ जानेवारीला फार मोठी ढवळाढवळ केली. या घटनेमुळे नॅसडॅक कंपोझिट निर्देशांक तीन टक्क्यांनी खाली आला. त्याचा प्रभाव जगभरातील चिप मार्केट आणि डेटाचे व्यवस्थापन करणाऱ्या कंपन्यांना सोसावा लागला. याचा सर्वाधिक फटका 'एनव्हिडिया' या अमेरिकास्थित सेमीकंडक्टकर चिप बनवणाऱ्या कंपनीला बसला.

'डीपसीक'ची माहिती पुढे येताच 'एनव्हिडिया' कंपनीच्या शेअरची किंमत १७ टक्क्यांनी घसरली. त्यामुळे कंपनीचे एकाच दिवसात ६०० अब्ज डॉलर्सचे नुकसान झाले. अमेरिकेच्या इतिहासात कोणत्याही कंपनीला एका दिवसात सोसावे लागलेले हे सर्वाधिक नुकसान आहे. त्याआधी शेअर मार्केटच्या बाजारात 'एनव्हिडिया' पहिल्या क्रमांकावर असणारी कंपनी होती; मात्र सोमवारी कंपनीची किंमत ३.५ लाख कोटी डॉलर्सवरून २.९ लाख कोटी डॉलर्सवर आल्यामुळे ॲपल आणि मायक्रोसॉफ्ट यांच्यानंतर 'एनव्हिडिया' तिसऱ्या क्रमांकावर येऊन पोहोचली.

'एनव्हिडिया'ने तयार केलेल्या सेमीकंडक्टर चिप्सपेक्षा कमी गुणवत्तेच्या चिप्स 'डीपसीक'मध्ये वापरल्या जातात. मोठी गुंतवणूक आणि सर्वोत्तम दर्जाचा माल वापरूनच कृत्रिम बुद्धिमत्तेवर ताबा मिळवता येऊ शकतो, या समजुतीला 'डीपसीक'च्या यशामुळे तडा बसला आहे. त्यामुळे अशा चिपची भविष्यात किती गरज पडू शकते यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

'डीपसीक एआय' ने तंत्रज्ञानस्नेही तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात काम करणाऱ्यांचे लक्ष स्वत:कडे ओढून घेतले आहे. ॲप स्टोअरवर तर या 'डीपसीक'ने 'ओपन एआय' या कंपनीच्या 'चॅट जीपीटी'लाही मागे टाकले आहे. 'डीपसीक'ने दिलेल्या सुविधांकडे संपूर्ण जग आकर्षित झाले असून 'चॅट जीपीटी', 'मेटा एआय' यासारख्या कृत्रिम बुद्धिमत्तेवर काम करणाऱ्या प्लॅटफॉर्म्सची झोप उडाली आहे.

विशेष म्हणजे चीनी कंपनीने विकसित केलेले हे 'डीपसीक एआय' मोबाईल तसेच लॅपटॉपवरही वापरता येणार आहे. या 'एआय' तंत्रज्ञानाचा परवाना सध्या 'मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' (एमआयटी) या संस्थेकडे आहे. कुठल्याही अडचणींवर उत्तर शोधण्यासाठी हा एक खुला आणि मोफत असा मंच आहे. यावर वैयक्तिक तसेच कार्यालयीन समस्यांवर उत्तरे शोधता येतात. 'प्ले स्टोअर'वरून तसेच 'आयओएस स्टोअर'वरून हे ॲप इन्स्टॉल करता येते. अमेरिकेने चिप पुरण्यास बंदी घातल्यानंतर 'डीपसीक'ने सध्या लॉंच करण्यात आलेले 'एआय मॉडेल' हे 'एनव्हिडिया' कंपनीच्या कमी कार्यक्षमता असलेल्या एच ८०० चिपच्या मदतीने विकसित करण्यात आले असल्याचा दावा केला आहे. या कंपनीचा हा दावा म्हणजे अमेरिकेला एक प्रकारची चपराक आहे.

'डीपसीक एआय असिस्टंट'ने डाऊनलोडिंगच्या बाबतीत 'ओपन एआय'च्या 'चॅट जीपीटी'ला मागे टाकले आहे. 'डीपसीक' कोणकोणत्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकते, हे अद्याप नीट समजलेले नाही. 'डीपसीक' या चॅटबॉटमुळे अमेरिकन शेअर मार्केटमध्येही हाहाकार उडाला. अनेक टेक कंपन्यांचे शेअर्स गडगडले. भारतातही त्याचा परिणाम झाला. 'डीपसीक' या चॅटबॉटमुळे भारतीय शेअर बाजारात सूचिबद्ध झालेल्या काही टेक कंपन्यांचे शेअर्स गेल्या दोन ते तीन सत्रांमध्ये साधारण ५० टक्क्यांपर्यंत घसरले. म्हणजेच काही कंपन्यांच्या शेअर्सचे मूल्य हे साधारण ५० टक्क्यांपर्यंत खाली आले. घसरण झालेल्या कंपन्यांमध्ये अनंत राज, 'नेटवेब टेक्नॉलॉजीज इंडिया', 'झेन टेक्नॉलॉजीज' यांच्यासह इतरही काही कंपन्यांचा समावेश आहे. 'अनंत राज लिमिटेड' या कंपनीचे शेअर्स २० टक्क्यांनी घसरले.

या कंपनीला लोअर सर्किट लागले. 'नेटवेब टेक्नॉलॉजीज इंडिया लिमिटेड' या कंपनीच्या शेअरचे मूल्यदेखील १० टक्क्यांनी कमी होऊन १,४६०.३५ रुपयांवर बंद झाले. एकीकडे जगातील मोठमोठ्या कंपन्यांना आर्थिक फटका बसत असताना हुआंगची निव्वळ संपत्ती २०२३ च्या सुरुवातीपासून शुक्रवारपर्यंत सुमारे आठ पट वाढून १२१ अब्ज डॉलर झाली. दरम्यान, याच कालावधीत झुकेर बर्गची संपत्ती ३८५ टक्क्यांनी वाढून २२९ अब्ज डॉलर झाली आणि 'ॲमेझॉन'च्या जेफ बेझोस यांची संपत्ती १३३ टक्क्यांनी वाढून २५४ अब्ज डॉलर झाली.

'डीपसीक' आपले मॉडेल विकसित करण्यासाठी मोठ्या गुंतवणुकीवर आणि 'टॉप ऑफ द लाईन चिप्स'वर अवलंबून राहिले नाही. याचे मुख्य कारण म्हणजे चिनी कंपन्यांकडे शक्तिशाली 'जीपीयू' किंवा 'ग्राफिक्स प्रोसेसिंग युनिट्स'पर्यंत मर्यादित प्रवेश आहे.

अनेक पाश्चात्त्य कंपन्या त्यांच्यावर विसंबून राहतात. कारण अमेरिकेचे सरकार अत्यंत प्रगत चिप्सवर कठोर निर्यात नियंत्रणे लादते. त्याला आता 'डीपसीक' हा चांगला पर्याय आहे. चांगल्या कामासाठी हे तंत्रज्ञान वापरले, तर कुणाचा विरोध असणार नाही; परंतु चीनचा भर अमेरिकेला धडा शिकवण्यावर असल्याने त्यातून चांगले काही निष्पन्न होण्याची शक्यता नाही.

पुरोगामी आणि प्रतिगामी

विश्वसंचार

मल्हार कृष्ण गोखले

मुंबई विद्यापीठ हे भारतातील पहिले विद्यापीठ. त्याची स्थापना १८५७ साली झाली. यथावकाश आणखी विद्यापीठे निघाली. महाविद्यालये निघाली. त्या त्या विभागातली महाविद्यालये नजीकच्या विद्यापीठाला जोडण्यात आली. शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार व्हावा, अगदी खेडोपाडीसुद्धा शिक्षणाची गंगा पोचावी, या दृष्टीने असे करण्यात आले. शिक्षण स्वस्त आणि सोपे झाले. ब्रिटिशांनी भारतात शिक्षणाचा प्रसार केला, तो भारतीयांनी शिकून शहाणे व्हावे, ज्ञानी व्हावे, यासाठी नव्हे. त्यांना कारभार चालवायला रंगाने काळे, पण आचारविचाराने पक्के ब्रिटिश असे कारकून हवे होते म्हणून. तीच शिक्षण पद्धती चालू ठेवल्याची फळे आज आपल्यासमोर आहेतच.

भारतातल्या शेकडो विद्यापीठांमधून दरवर्षी लाखो कारकुनी मनोवृत्तीचे तरुण बाहेर पडतायत. कारकुनी मनोवृत्ती म्हणजे जे परकीय गोऱ्यांचे ते सगळे चांगले आणि जे आमचे ते सगळे वाईट, असा भयंकर न्यूनगंड बाळगणारी खुजी, कोती मनोवृत्ती. युरोपीय देश किंवा अमेरिकेत असा प्रकार नाही. तिथे शिक्षण सोपे आहे, पण स्वस्त नाही. तिथे राजकारणासहित जीवनाची सर्व क्षेत्रे शिक्षणाशी जोडलेली आहेत. शिक्षणावर समाजधुरिणांचे बारीक लक्ष असते, सर्व क्षेत्रांना लागणारे हुशार लोक नेमके हेरून उचलले जातात. त्यांच्या ज्ञानाचा, शिक्षणाचा समाजाला नीट उपयोग होईल, हे पाहिले जाते. समाजाचा, राष्ट्राचा मूलाधार शिक्षण असणे ही संकल्पना मुळात भारताचीच आहे. उदाहरणार्थ तक्षशिला विद्यापीठ घ्या. येशू ख्रिस्ताच्या जन्मापूर्वी ८०० वर्षे या विद्यापीठाची स्थापना तत्कालीन गांधार देशातल्या तक्षशिला या राजधानीच्या नगरात झाली.

भारतीय शिक्षण म्हणजे, सर्व ऐहिक गोष्टींकडे पाठ फिरवून मृत्यूनंतर मोक्ष मिळविण्याचे शिक्षण असा एक गैरसमज आहे. तो अर्थातच इंग्रजांनी मुद्दाम निर्माण केलेला आहे. तक्षशिला विद्यापीठात मुख्यतः १८ विषय शिकवले जात असत. म्हणजे आधुनिक भाषेत बोलायचे तर प्रत्येक विषयाचे एक याप्रमाणे १८ विषयांची १८ कॉलेज्स तिथे होती. वेद, इतिहास, पुराणे, गणित, नक्षत्रविद्या, भूतविद्या, सर्पविद्या, शरीर विज्ञानचिकित्सा, हस्तिविद्या, मृगया, आयुर्वेद, धनुर्वेद, मूर्तिकला, चित्रकला, शिल्पकला, युद्धकला अशा मुख्य विषयांबरोबरच असंख्य आनुवंशिक विषयही इथे शिकवले जात असत. पाश्चिमात्य विद्यापीठांमध्ये शिक्षणक्रमात प्युअर सायन्सेस आणि ॲप्लाईड सायन्सेस यांचा उत्कृष्ट समन्वय घातलेला असतो. तक्षशिला विद्यापीठातल्या विषयांच्या वरील यादीकडे पाहिल्यावर आपल्या लक्षात येईल की, तिथेही तसाच समन्वय उत्तमरीतीने साधण्यात आला होता. तिथली शिल्पकला म्हणजे दगडाची, मातीची शिल्पे बनवण्याची कला नव्हे. ती मूर्तिकला. तो वेगळा विषय होताच. पण शिल्पकला म्हणजे आधुनिक भाषेत अभियांत्रिकी म्हणजे तक्षशिला विद्यापीठाचा पदवीधर शिल्पज्ञ हा अभियंता किंवा इंजिनीअर असायचा.

साहजिकच तक्षशिलेच्या दिशेने सतत विद्यार्थ्यांचा ओघ वाहात असे. यात संपूर्ण भरतखंडातले विद्यार्थी तर असायचेच; पण किंपुरुषवर्ष आणि हरिवर्ष इथूनही विद्यार्थी यायचे. किंपुरुषवर्ष म्हणजे आफ्रिका खंड नि हरिवर्ष म्हणजे युरोपखंड. इसवी सन ५०० च्या सुमारास तक्षशिला विद्यापीठ हूण आक्रमकांनी उद्‌ध्वस्त केले. ही उद्‌ध्वस्त नगरी सध्या पाकिस्तानात आहे. तक्षशिलेइतकीच ख्यातकीर्त अशी मगध राज्यातली म्हणजे आजच्या बिहार प्रांतातली नालंदा आणि विक्रमशिला ही विद्यापीठे होती. इसवी सन १२०० मध्ये मुहम्मद तुघलखाचा सरदार बखत्यार खलजी याने ती दोन्ही जाळून नष्ट केली. भारतात विद्येचा असा विध्वंस होत असताना तिकडे इंग्लंडमध्ये एका विद्यापीठाची मुहूर्तमेढ रोवली जात होती. केम नावाच्या नदीवर केंब्रिज नावाचे एक टुमदार गाव होते. इ. स. १२८४ मध्ये तिथे एक कॉलेज स्थापन झाले. ख्रिश्चन धर्मात शिक्षण हे धार्मिक बाबींना जोडूनच असते. प्रथम चर्च येते. मग शाळा नि नंतर कॉलेज. या कॉलेजचे नाव ख्रिश्चनांचा सर्वश्रेष्ठ संत जो सेंट पीटर, त्याच्यावरून 'सेंट पीटर्स कॉलेज' असे ठेवण्यात आले. मग हळूहळू आणखीही कॉलेजेस निघाली आणि त्या सर्वांना जोडणारे असे केंब्रिज विद्यापीठ उभे राहिले. त्याची कीर्ती आज ७०० वर्षे उलटून गेल्यावरही जगभर दुमदुमते आहे. म्हणजे पहा. प्रथम एक कॉलेज निघाले. मग अनेक कॉलेजे निघाली आणि हळूहळू त्या सर्वांचा समन्वय साधणारी विद्यापीठ ही संस्था उत्क्रांत होत गेली. हीच प्रक्रिया अत्यंत नैसर्गिक आहे.

स्वामी विवेकानंद म्हणायचे की, ज्ञान हे प्रत्येक व्यक्तीच्या अंतरंगात असतेच. ते बाहेर काढणे, प्रकट करणे म्हणजे शिक्षण. ही प्रक्रिया जो घडवून आणतो, तो शिक्षक, 'टु एज्युकेट' या इंग्रजी क्रियापदाचा मूळ अर्थ 'टु ड्रॉ आऊट' म्हणजे बाहेर काढणे असाच आहे. म्हणजे शिक्षणाची जी मूळ हिंदू संकल्पना स्वामी विवेकानंदांनी सांगितली, तीच इंग्रजी भाषेचे जे कुणी आद्य रचनाकार असतील त्यांनाही अभिप्रेत होती. पण बहुधा म्हणूनच इंग्रजांनी भारतात मुद्दाम उफराटा प्रकार केला. प्रथम शाळा, मग कॉलेज आणि नंतर विद्यापीठ, अशी नैसर्गिक प्रक्रिया घडू देण्याऐवजी एकदम धाडकन विद्यापीठ स्थापन केले. नंतर कॉलेजेस आणि शाळा काढून स्वतःच्या सोयीची शिक्षण पद्धती भारतीयांच्या डोक्यावर थोपली.

स्वतंत्र भारतात आजही तेच चालू आहे. मुलांच्या अंतरंगातले दैवदत्त ज्ञान बाहेर काढून, त्यांच्या कलाकलाने त्यांना उमलू देण्याऐवजी बाहेरून त्यांच्या डोक्यात तथाकथित ज्ञान; ज्ञान नव्हे माहिती कोंबण्याचे कारखाने सर्वत्र सुरू आहेत. हिंदू धर्माने स्त्रियांना कायम दुय्यम मानले; किंबहुना त्यांना माणूस मानायलाच नकार दिला, असा इंग्रजांचा आणि आता इंग्रजी शिक्षित हिंदूंचा एक लाडका आरोप असतो. हिंदू धर्माने म्हणे स्त्रियांना दुर्बल, अशिक्षित आणि पुरुषांची आश्रित बनवून ठेवले. ठीक आहे. मग आता ग्रीक इतिहासकार काय म्हणतात पहा. मॅसिडोनियाचा राजा सम्राट अलेक्झांडर हा अनातोलिया, पॅलेस्टाईन, फिनिशिया, अरेबिया इत्यादी प्रदेश जिंकत इराणमध्ये घुसला. अत्यंत बलाढ्य अशा ससानियन राजवंशाच्या चुराडा उडवून त्याने इराणी साम्राज्य उद्‌ध्वस्त केले. आता तो भारतवर्षाच्या सीमेवर येऊन उभा ठाकला. तिथे त्याच्या प्रतिकारासाठी उभे होते 'आश्वकायन' नावाचे चिमुकले हिंदू गणराज्य. ३० हजार घोडेस्वार, ३८ हजार पायदळ आणि ३० हत्ती असलेल्या 'आश्वकायन' सैन्य दलाची प्रमुख होती कृपा नावाची स्त्री. या सैन्याने प्रचंड पराक्रम गाजवला. खुद्द अलेक्झांडरला प्राणघातक वार लागला.

सेनापती कृपासहित एकूण एक सैनिक ठार झाल्यानंतरच आश्वकायन गणराज्याने पराभव मान्य केला. शहाजीराजे भोसल्यांची पत्नी जिजाऊसाहेब आणि बालाजी विश्वनाथ पेशव्यांची पत्नी राधाबाई या स्त्रिया आपल्या पतींच्या नि विश्वविख्यात पुत्रांच्या राजकारणात सक्रिय भाग घेत असत. राणी अहल्याबाईंनी तर कित्येक वर्षे राज्यसकटच हाकला. बाईंच्या बुद्धीला आणि शिस्तीला शत्रू वचकून होतेच; पण अटकेपार झेंडे फडकवणारे राघोभरारीसुद्धा बाईंच्या स्त्री सेनेसमोर हतबल झाले होते. त्याच राघोभरारींची नंतरच्या काळात उगीचच बदनाम झालेली पत्नी आनंदीबाई हिला वाचनाचा अतिशय नाद होता. तिच्या खाजगी ग्रंथालयात अनेक उत्तमोत्तम ग्रंथ होते. दुसऱ्या बाजीरावांच्या घरातल्या नानासाहेब, रावसाहेब, तात्या टोपे इत्यादी मुलांबरोबर मनू तांबे हिलाही सर्व प्रकारचे उत्तम शिक्षण मिळाले होते. याच मनूने पुढे झाशी संस्थानची राणी बनून राज्य इतक्या उत्तम रीतीने चालवले की, इंग्रजांना तिच्या राज्यात बोट शिरकावता येईना. तिने स्त्रियांचे सैन्यही तयार केले होते आणि या स्त्री सैन्याने आधुनिकदृष्ट्या प्रशिक्षित समजल्या जाणाऱ्या इंग्रज सैन्याच्या तोंडाला फेस आणला होता. हिंदू धर्माने स्त्रियांना दुर्बल बनवले, असे म्हणणाऱ्या इंग्रजी शिक्षितांनी आणि त्यांच्या म्हणण्याला ब्रह्मवाक्य समजण्याचा भोटपणा करणाऱ्या तुम्ही-आम्ही, इंग्रजपूर्व भारतातल्या शिक्षण परिस्थितीचा खराखुरा अभ्यास करण्याची फार आवश्यकता आहे. या उलट ख्रिश्चन धर्मानेच स्त्रियांना कायम दुय्यम स्थान दिले आहे.

रोमन कॅथलिक पंथाचा सर्वोच्च प्रमुख पोप, ग्रीक ऑर्थेडिक्स पंथाचा प्रमुख पेट्रिआर्क आणि प्रोटेस्टंट पंथाचा प्रमुख कँटरबरीचा आर्चबिशप ही ख्रिश्चन धर्मपंथांमधली तीन सर्वोच्च पदे आजवर त्या पदांवर कधीही स्त्री आलेली नाही. ख्रिश्चानिटीत सुमारे १४०० उपपंथ आहेत. त्यापैकीही कुणाच्या प्रमुखपदी आजवर स्त्री आलेली नाही. ब्रिटनच्या ७०० वर्षांच्या लोकशाही राज्यात फक्त एकमेव स्त्री पंतप्रधान झाली ती म्हणजे मार्गरिट थॅचर.

अमेरिकेच्या सव्वादोनशे वर्षांच्या लोकशाहीत अजूनतरी कुणी स्त्री राष्ट्राध्यक्ष झालेली नाही. ब्रिटन हा देश लोकशाहीचा जन्मदाता. पण तिथे स्त्रियांना साधा मतदानाचा अधिकार मिळायला विसाव्या शतकाचे दुसरे दशक उजाडावे लागले आणि तो अधिकार मिळाला आंदोलन केल्यावरच. भारतात १८५७ च्या स्वातंत्र्यसमरात स्त्रिया होत्या. १९०५ ते १९११ पर्यंत चाललेल्या वंगभंग आंदोलनात स्त्रिया होत्या. क्रांतिकारकांमध्ये स्त्रिया होत्या. महात्मा गांधींनी तर आपल्या चळवळीत सुरुवातीपासूनच अगदी कटाक्षाने स्त्रियांना सहभागी करून घेतले होते. त्यामुळे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अगदी सहजपणे स्त्रियांनाही मतदानाचा अधिकार मिळाला. त्यासाठी वेगळे आंदोलन करावे लागले नाही.

१९६६ साली इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्यावर सर्वसामान्य हिंदू जनतेला त्यांचे अतिशय कौतुकच वाटले. उलट स्वतःला हिंदू न म्हणवणाऱ्या तथाकथित पुरोगामी समाजवाद्यांनी मात्र त्यांची 'गुंगी गुडिया' म्हणून टिंगल उडवली होती. १८५७ साली स्थापन झालेल्या मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. मेहरु बेंगॉली, डॉ. स्नेहलता देशमुख या कर्तबगार स्त्रिया येऊन गेल्या. त्या स्त्रिया होत्या म्हणून तो विशेष बातमीचा विषय झाला, असे नव्हे. १२८४ साली स्थापन झालेल्या केंब्रिज विद्यापीठाच्या प्रमुखपदी मात्र एक स्त्री यायला २००३ साल उजाडले होते. केंब्रिजमधल्या अनेक कॉलेजांपैकी 'गर्टन' आणि 'न्यूनहॅम' ही कॉलेजेस खास स्त्रियांसाठी होती. पण तरीही अधिकृतपणे ती विद्यापीठात आहेत असे समजले जात नसे.

पदवी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या स्त्रियांना पदवीदान समारंभात भाग घेण्याची परवानगी नव्हती. ही स्थिती तेराव्या शतकातली नव्हे; १९४५ पर्यंत हा नियम होता. मग तो बदलण्यात आला. २००३ साली प्राध्यापिका ॲलिसन रीचर्ड या केंब्रिज विद्यापीठाच्या कुलगुरू बनणार होत्या. त्याबरोबर अनेकांच्या भुवया उंचावल्या.

खरे तर प्रा. रीचर्ड मूळच्या केंब्रिजच्याच पदवीधर १९६८-६९ मध्ये त्यांनी केंब्रिजमधून मानववंशशास्त्राची पदवी घेतली होती. पण मग त्या अमेरिकेतल्या थेल विद्यापीठात गेल्या. म्हणजे एक स्त्री आणि त्यातून, आता केंब्रिजबाहेरची असणारी स्त्री कुलगुरू होणार, हे अनेक विद्वान इंग्रजांना मनोमन आवडले नव्हते. अर्थात ते रोखणेही त्यांना शक्य नव्हते. तेव्हा आता कारकुनी मनोवृत्ती झुगारून देऊन आपणच विचार करू या की, कोण प्रतिगामी नि कोण पुरोगामी; कोण प्रागतिक आणि कोण मागास; कोण बुरसटलेले नि कोण आधुनिक! (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)